सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, १९ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २०७ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

शरद पवार दुबईमध्ये दाऊदला भेटले : प्रकाश आंबेडकर

अकोला, १८ ऑक्टोबर : शरद पवार १९८८-९१ या काळात मुख्यमंत्री असताना त्यांनी केलेल्या एका दौऱ्यामध्ये त्यांनी दाऊद इब्राहिमची भेट घेतल्याचा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ऍड प्रकाश आंबेडकर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. आरोप प्रत्यारोप करण्यात येत आहेत. निवडणूक अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे सर्वे सर्वा ऍड. प्रकाश आंबेडकर यांनी एक खळबळजनक दावा केला आहे.

ऍड. आंबेडकर म्हणाले की, १९८८-९१ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार होते. त्यातील त्यांचा एक दौरा होता लंडनला. तिथून ते कॅलिफोर्नियाला गेले. तिथे ते दोन दिवस राहिले. त्यांची मीटिंग कोणासोबत झाली. त्याचा खुलासा त्यांनी केला पाहिजे. कॅलिफोर्नियामधून शरद पवार लंडनला पुन्हा आले. दोन दिवस लंडनमध्ये थांबले. तिथून दुबईला गेले आणि दुबईमध्ये त्यांची दाऊद इब्राहीमसोबत विमानतळावर भेट झाली. त्यांना तिथे सोन्याचा हार घालण्यात आला. १९८८-९१ या काळात शरद पवार मुख्यमंत्री होते. त्यामुळे त्यांना केंद्र सरकारची परवानगी असल्याशिवाय दौऱ्यावर जाता येत नाही. तेव्हा केंद्र सरकारने त्यांना कॅलिफोर्नियाच्या बैठकीत उपस्थित राहण्याची परवानगी दिली होती का ? शरद पवार यांना केंद्र सरकारने त्या वेळी परवानगी दिली असेल तर, मग दुबईत जाऊन दाऊद इब्राहिमला भेटण्याची परवानगी पण दिली होती का ? आणि त्या बैठकांचा अहवाल केंद्र सरकारला दिला होता का ? असे सवाल ड. आंबेडकर यांनी उपस्थित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५४ मध्ये सूचित केले होते की, चीन हे विस्तारवादी आहे. जर आपण आपली सुरक्षा करण्याच्या स्थितीत आलो नाही तर, चीन आपल्यावर हल्ला करू शकतो. बाबासाहेबांचे हे मत केंद्र सरकारने ऐकले नाही. त्याचा परिणाम आज आपल्या सर्वांना दिसत असल्याचेही आंबेडकर यांनी सांगितले. एकीकडे यूएस, कॅनडा आणि भारत यांच्यात अंतर्गत संघर्ष सुरू आहे. तर, दुसरीकडे इस्राईल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्ष येणाऱ्या काळात वाढणार अशी शंकाही आंबेडकर यांनी व्यक्त केली. पॅलेस्टाईन आणि इस्राईलची भांडणे चालू आहेत. आपले केंद्र सरकार आतून इस्राईलसोबत आहे आणि बाहेरून पॅलेस्टाईनसोबत आहे, अशी परिस्थिती असल्याचे म्हणत त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला.

भारताची आजची परिस्थिती आहे, ती १९९०-२००० सालासारखी दिसत आहे. मध्यंतरी बॉम्ब ब्लास्ट होत होता, कोणाला तरी गोळी मारली जायची ते काही दिवसांपासून पुन्हा सुरू झाल्याचे दिसत आहे, असेही त्यांनी या वेळी म्हटले. बाबा सिद्दीकी यांची हत्या सुद्धा त्यामुळेच झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात रस्त्याच्या टेंडरींगमध्ये भ्रष्टाचार : पवन खेडा

तब्बल १० हजार कोटींच्या गैरव्यवहाराचा केला आरोप

नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर : महाराष्ट्रात विविध रस्त्यांच्या निवादा वाटपात १० हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप काँग्रेसने केलाय. राज्यात निविदी काढताना निकषांमध्ये बदल करून २ कंपन्यांना टेंडर दिल्याचा आरोप काँग्रेस प्रवक्ते पवन खेडा यांनी आज, शुक्रवारी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

यावेळी पवन खेडा म्हणाले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार एका कंपनीला केवळ दोनच प्रकल्प मिळू शकतात. मात्र महाराष्ट्रात या प्रकरणात २ कंपन्यांना प्रत्येकी ४ प्रकल्प देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने केलेल्या कामांच्या तुलनेत बांधकाम खर्चात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. काही प्रकल्पांमध्ये बोगदा-अनुभव कलम जाणीवपूर्वक अटींमध्ये टाकण्यात आले जेणेकरून विशिष्ट कंपन्या निविदांसाठी पात्र होऊ शकतील आणि इतर कंपन्यांना वगळता येईल.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या किंमतीनुसार बांधकाम खर्चावर आधारित प्रकल्पांची वास्तविक किंमत १० हजार ८७ कोटी रुपये असायला हवी होती, मात्र महाराष्ट्र सरकारने २० हजार ९९० कोटी रुपये दिल्याचा आरोप खेडा यांनी केला. भाजपवर खंडणीचा आरोप करत खेडा यांनी भाजपची तुलना डी-कंपनीशी केली आणि भाजपचे वर्णन 'बी-कंपनी' असे केले, भाजप डी-कंपनीप्रमाणे लोकांकडून पैसे उकळत असल्याचे खेडा म्हणाले.

एमएसआरडीसीने एप्रिल २०२३ मध्ये पुणे रिंगरोड प्रकल्पासाठी पात्रता विनंती आमंत्रित करण्यास सुरुवात केली, ज्याची व्याख्या बोगदा प्रकल्प म्हणून करण्यात आली होती. यासाठी विविध कंपन्यांनी अर्ज सादर केले. कारण नसताना या प्रकल्पांना बोगदा प्रकल्प म्हणून सांगण्यात आले. जून २०२३ मध्ये, कंपन्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर एमएसआरडीसीने पुन्हा निविदा उघडल्या आणि २८ कंपन्यांनी अर्ज सादर केले. डिसेंबर २०२३ मध्ये २८ कंपन्यांची मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण झाली ज्यामध्ये १८ कंपन्या पुढील फेरीसाठी पात्र ठरल्या आहेत. यापैकी पात्र ठरलेल्या कंपनीने जुलै २०२३ मध्ये इलेक्टोरल बॉंडमध्ये देणगी दिली होती, असाही दावा खेडा यांनी केला.

आ. सतीश चव्हाण यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमधून सहा वर्षासाठी निलंबन

मुंबई, १८ ऑक्टोबर : जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका घेतल्यामुळे आणि पक्षशिस्त मोडल्याबद्दल आमदार सतीश चव्हाण यांना पक्षातून सहा वर्षासाठी निलंबित करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली आहे. १५ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती सरकारच्या विरोधात प्रतिमा मलिन करण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका छत्रपती संभाजीनगरचे आमदार सतीश चव्हाण यांनी घेतली होती. वास्तविक सर्व समाजघटकांना न्याय देण्याची भूमिका महायुती सरकारच्या कार्यकाळात घेतलेली आहे. असे असताना आमदार सतीश चव्हाण यांनी जाणीवपूर्वक शिस्तभंग केलेला असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसकडून ही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

विषारी दारूमुळे मरणाऱ्यांचा आकडा ४१ झाला

पाटणा, १८ ऑक्टोबर : बिहारच्या सारण आणि सीवान या २ जिल्ह्यांमध्ये विषारी दारू पिल्यामुळे मरणाऱ्यांचा आकडा ४१ झाला आहे. राज्यात १४ ऑक्टोबरपासून मृत्यूसत्र सुरू असून अजूनही ३५ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. तर ७ जणांची दृष्टी गेली आहे. गेल्या १३ ऑक्टोबर रोजी सिवानच्या भगवानपूर हाटमध्ये विकल्या जाणाऱ्या सॅशेत दारू अनेकांनी प्यायली होती. जिल्ह्यातील मसरख पोलिस ठाण्याच्या हद्दीतील इब्राहिमपूर गावात विषारी दारू प्यायल्याने दोघांचा मृत्यू झाला असून, अन्य दोघांवर उपचार सुरू असल्याचे सारण पोलिसांनी सांगितले.

आचारसंहितेमुळे योजनादूतांमार्फत प्रचार : प्रसिद्धीचे काम नाही

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १८ऑक्टोबर : भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निवडणुकीच्या आदर्श आचारसंहिता कालावधीत कोणत्याही शासकीय योजनांची प्रचार प्रसिद्धी करता येत नाही., त्यामुळे आचारसंहिता सुरू असेपर्यंत योजनादूतांमार्फत कोणत्याही प्रकारचे प्रचार प्रसिद्धीचे काम करण्यात येणार नाही. ,असे स्पष्टीकरण राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालयाकडून शुक्रवारी करण्यात आले.

विरोधी महाविकास आघाडीने याबाबत आजच मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यानंतर विभागाकडून हे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

महायुती सरकारने राज्य सरकारने केलेल्या विविध कामाची माहिती नागरीकापर्यंत पोहोचवण्यासाठी योजना दूत बनवली आहे. त्याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगार युवकांना यामध्ये काम देऊन मानधन तत्वावर सरकारी योजनाची प्रसिद्धी करण्याचे काम दिले जाणार आहे. मात्र निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे त्यांच्यावरही जबाबदारी सध्या सोपीता येणार नाही, सद्यस्थितीत योजनादूतांमार्फत प्रचार प्रसिद्धीचे कोणतेही काम नसल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिला जाणार नाही. यासंदर्भात जिल्हास्तरीय अंमलबजावणी यंत्रणांनाही सूचना देण्यात आल्या आहे.असे विभागाने कळविले आहे

विदर्भातील जागा देण्यास पटोलेचे ठाकरे गटाला' 'ना ना'!

काँग्रेस हायकमांडशी चर्चा करणार

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई, दि.१८ ऑक्टोबर - विधानसभा निवडणुकीसाठी मतदानासाठी अवघे ३१ दिवसाचा अवघी शिल्लक असताना महाविकास आघाडीतील प्रमुख दोन घटक पक्षांमध्ये वाद उफाळून आला आहे. काँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गटांच्या नेत्यांमध्ये विदर्भातील जागावाटपावरून वाद निर्माण झाला आहे .ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या समवेत बैठकीत सहभागी होण्यास बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आज मुंबईत वाय. बी .चव्हाण सेंटर येथे होणारी महाविकास आघाडीची नेत्यांची बैठक रद्द करण्यात आली .ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी थेट काँग्रेस हायकमांडशी चर्चा केली असून त्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेनिथला मुंबईत आले आहेत .उद्या दिवसभर मुंबईत थांबून ते चर्चा करणार आहेत.

राज्यात २० नोव्हेंबरला २८८ विधानसभेच्या जागावर व नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक होत आहे. त्यासाठी महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाचा फॉर्मुला अद्याप निश्चित झालेला नाही.

निर्णय घेण्यास राज्यातील नेते असमर्थ

जागा वाटपाबाबत समाधानकारक तोडगा निघणे महाविकास आघाडीसाठी आवश्यक आहे मात्र राज्यातील नेते निर्णय घेण्यास असमर्थ ठरत आहेत त्यामुळे आपण काँग्रेसच्या दिल्लीतील श्रेष्ठींशी चर्चा करत आहोत

: खा .संजय राऊत (ठाकरे गटाचे नेते)

मुंबई व कोकणात उद्धव ठाकरे गट तर पश्चिम महाराष्ट्र शरद पवार गटाला आणि विदर्भ व मराठवाडा विभागात काँग्रेसला सर्वाधिक जागा लढविण्याबाबत ठाम आहे. लोकसभा निवडणुकीत या आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला सर्वाधिक १३ जागा मिळाल्या व त्यांचा एक बंडखोर खासदारही विजयी झाला होता. त्यामुळे काँग्रेसने सर्वाधिक जागा लढवण्यावर ठाम असून विदर्भात लोकसभेत मिळालेल्या यशामुळे बहुतांशी जागा आपल्याकडे ठेवण्यासाठी आग्रही आहे त्याचबरोबर गुरुवारी रात्री विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत खास संजय राऊत व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यात वादावादी झाली.

राऊत काय बोलले समजले नाही

आघाडीतील तिन्ही पक्षाच्या नेत्यांना अंतिम निर्णय घेण्यासाठी आपापल्या सर्वोच्च नेत्यांची चर्चा करावी लागते. आमचे सर्वोच्च नेते दिल्लीत असल्यामुळे त्यांना सांगणे अपरिहार्य आहे. त्यामुळे संजय राऊत हे काय बोलत आहेत ते समजू शकत नाही :

: नाना पटोले (काँग्रेस प्रदेशाध्यक्ष)

आघाडीमध्ये २८८ पैकी जवळपास २१५ जागाबाबत एकमत झाले असून उर्वरित जागा व तिने पक्षाने जावा सांगितला आहेठाकरे गट विदर्भात नऊ ठिकाणी लढण्यासाठी इच्छुक आहे .मात्र काँग्रेसने त्यांना जास्तीत जास्त चार जागा सोडण्याची तयारी दर्शविली आहे त्यावरून एक होत नसल्याने कालची बैठक अर्धवट सोडण्यात आली .नाना पटोले हे आक्रमक भूमिका घेत असल्याने त्यांच्या उपस्थितीत जागावाटपाबाबत चर्चा न करण्याचा निर्णय ठाकरे गटाच्या नेत्यांनी घेतला आहे त्याबाबत शुक्रवारी संजय राऊत यांनी उघडपणे नाराजी दर्शविली पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की राज्यातील नेतृत्व निर्णय घेण्यास असमर्थ ठरत आहे. त्यांना वारंवार दिल्लीला यादी पाठवावी लागते. त्यामुळे आपण काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नई मुकुल वासनिक यांच्याशी चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे राहुल गांधी यांच्याशीही बोलणार आहे जेणेकरून जागा वाटपाचा प्रश्न लवकरात लवकर निकालात निघावा,'काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मात्र ठाकरे गटाबरोबर वादा बाबत फारसे बोलण्याचे टाळले. ते म्हणाले ,'राष्ट्रवादी गटाचे नेते अंतिम निर्णय घेण्यापूर्वी शरद पवारांशी बोलतात ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरेंची बोलतात त्याचप्रमाणे आम्हालाही आमच्या वरिष्ठ नेत्यांना बोलावे लागणार आहे त्यामुळे आम्ही तातडीने निर्णय घेऊ शकत नाही मात्र महाविकास आघाडीतील काही जागेचा तिढा लवकरच संपुष्टात येईल'.

आम आदमी पक्ष महाराष्ट्रात दोन जागा लढविण्यास इच्छूक!

सिंधुदुर्ग, १८ ऑक्टोबर : आम आदमी पक्ष महाराष्ट्र विधानसभेच्या दोन जागा लढविण्यासाठी इच्छूक असल्याचे आम आदमी पक्षाचे गोवा राज्य प्रदेशाध्यक्ष अमित पालेकर यांनी म्हटले आहे. परंतु महाराष्ट्रात इंडिया आघाडीला कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल असे ते म्हणाले. कुडाळ येथे ते पत्रकार परिषदेत बोलत होते. आजकालच्या राजकारण्यांची भाषा घसरली आहे. शिवराळ झाली आहे, अशी खंत देखील पालेकर यांनी यावेळी व्यक्त केली. कुडाळच्या हॉटेल यशधरामध्ये झालेल्या या पत्रकार परिषदेवेळी सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष विवेक ताम्हणकर, जिल्हा सचिव मीली मिश्रा, युवा जिल्हाध्यक्ष आदित्य बटावले, जिल्हा कार्यकारिणी सदस्य दीपेश आजवेलकर उपस्थित होते. अमित पालेकर म्हणाले की, उबाठा शिवसेना, काँग्रेस शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासोबत आमची इंडिया आघाडी आहे आणि या इंडिया आघाडीमध्ये आम्ही घटक पक्ष असल्यामुळे या ठिकाणी महाविकास आघाडीचे सरकार येण्यासाठी विविध ठिकाणी आम्ही सहभाग घेणार आहोत.

आचारसंहितेतील निर्णय, महामंडळांवरील नियुक्तांची चौकशी करा

अंबादास दानवें यांचे निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना पत्र

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई , दि.१८ ऑक्टोबर- विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारने महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर एका दिवसात २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसेच २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असे पत्र दानवे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना लिहिले आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता १५ ऑक्टोबरला जाहीर करण्यात आली. मात्र सरकारने शासनाच्या संकेतस्थळावर एका दिवसाततब्बल २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले आहेत. त्यामध्ये अनेक वित्तीय आणि धोरणात्मक निर्णयांचा समावेश असून सत्ताधारी पक्षाला निवडणूक प्रक्रियेत अप्रत्यक्ष फायदा मिळणार आहे. त्यानंतर १६ ऑक्टोबरला आणखी ३० ते ४० शासन निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले. निवडणूक आयोगाने याबाबत तातडीने कारवाई करण्याचे संकेत दिल्यानंतर, मध्यान्हानंतर शासन निर्णय संकेतस्थळावरून हटविण्यात आले आहेत. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते संशयास्पद असल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आल्या आहेत. निवडणूकीत या राजकीय बंडखोरी रोखण्याच्या दृष्टीने त्या करण्यात आल्या. त्यामुळे याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन आचारसंहितेनंतर घेतलेले सर्व निर्णय रद्द करुन बेकायदेशीररित्या निर्णय घेणाऱ्या दोषी व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी , मागणी पत्रात केली आहे.

पुण्यातील दोन रूपालींचा वाद दादांच्या कोर्टात; स्वतंत्रपणे मांडले गाऱ्हाणे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१८ ऑक्टोबर : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील दोन रूपाली ताईंचा वाद आता दस्तर खुद्द पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर मांडण्यात आला आहे पक्षाच्या महिला अध्यक्ष व राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर व पुण्यातील नेत्या ड. रूपाली ठोंबरे यांच्यातील वादामुळे फाईन विधानसभा निवडणुकीवेळी पक्षात दोन गट पडल्याचे चव्हाट्यावर झाले आहे. त्यामुळे दोन्ही रूपालींनी आज स्वतंत्रपणे मुंबईत अजित पवार यांची भेट घेऊन आपली गाऱ्हाणी मांडली. त्याचबरोबर पुण्यातील शहराध्यक्ष दीपक मानकर यांनीही आज पवार यांची भेट घेऊन आपली नाराजी बोलून दाखवली. त्यामुळे अंतर्गत वादाबाबत अजित पवार आता काय निर्णय घेतात व नाराज नेत्यांची कशी समजूत काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

रूपाली चाकणकर यांची नुकतीच पुन्हा एकदा महिला आयोगाच्या अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली त्याबाबत रूपाली ठोंबरे या नाराज असून त्यांनी एकाच व्यक्तीला किती पदे देणार पक्षात अन्य लाडक्या बहिणीही आहेत अशी नाराजी बोलून दाखवली होती त्यावर चाकणकर यांनी बाहेरून आलेल्यांनी जास्त सांगण्याची गरज नाही असा प्रतिउत्तर दिले होते त्यांच्यातील वाद चांगलाच रंगला असताना अजित पवार यांनी आज दोघींना मुंबईत बोलवून घेतले त्यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा करून म्हणणे ऐकून घेतले , रूपाली ठोंबरे यांनी सुमारे दीड तास त्यांच्याशी चर्चा केली त्यानंतर चाकणकर ही स्वतंत्रपणे जाऊ आपले मत मांडले .दोघींना अजित पवार यांनी आपण कोणावरही अन्याय करणार नाही ,मात्र थोडे सांभाळून घ्या, निवडणुका होईपर्यंत संयम बाळगा,असा त्यांना सल्ला दिला असल्याचे समजते. मात्र त्यांच्यातील वाद कितपत मिटतो? हे आता थोड्या दिवसातच समजून येणार आहे.

भाजपा सरकारची कामे, पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडा : खा. सुधांशु त्रिवेदी

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१७ ऑक्टोबर:

काँग्रेस सरकारच्या काळात देशात ठिकठिकाणी होणाऱ्या बॉम्बस्फोटांचे प्रकार आता थांबले आहेत. केंद्रातील एनडीए सरकारने आणि राज्यातील महायुती सरकारने देश आणि राज्याच्या विकासाचे, जनहिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. प्रवक्त्यांनी आपल्या सरकारची कामे, पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडावी, असे प्रतिपादन भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते खा. सुधांशु त्रिवेदी यांनी गुरुवारी केले.

भाजपा प्रदेश प्रवक्ते आणि जिल्हा प्रसिद्धीप्रमुखांच्या कार्यशाळेत खा. त्रिवेदी बोलत होते. यावेळी राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ल, आ. अतुल भातखळकर, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक, राष्ट्रीय माध्यम समन्वयक के. के. उपाध्याय, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.

त्रिवेदी म्हणाले की, विकास हा केंद्रबिंदू ठरवत भाजपा सरकारने देशात आणि राज्यात अनेक महत्वाचे, दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेतले आहेत. जोपर्यंत प्रवक्ते आणि प्रसिद्धी प्रमुख म्हणून आपण हे मुद्दे मतदारांसमोर मांडणार नाही तोवर ते तळागाळापर्यंत पोहोचणार नाहीत. मतदारांना सरकारची धोरणे कळण्यासाठी, पक्षाची बाजू व काम प्रभावीपणे मांडले पाहिजे.

के. के. उपाध्याय यांनी प्रसारमाध्यमांच्या बदलत्या स्वरूपाबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की पत्रकारांशी बातचीत करताना आपण पक्षाच्या वतीने बोलत आहोत, याचे भान ठेवणे महत्वाचे असते. निवडणूक प्रचारादरम्यान प्रसार माध्यमे आणि सोशल मीडियामार्फत सरकारच्या, पक्षाच्या कामांचा तपशील जनतेसमोर मांडता येईल, असे प्रेम शुक्ल यांनी सांगितले.

आ. अतुल भातखळकर यांनी सांगितले की, प्रवक्त्यांनी सरकारने केलेली कामे प्रसारमाध्यमांच्या मार्फत जनतेपर्यंत पोहोचवताना त्यासंदर्भात संपूर्ण अभ्यास करावा. पुढील एक महिना प्रचाराच्या दृष्टिने अतिशय महत्वाचा असून सर्व प्रवक्ते, जिल्हा प्रसिद्धी प्रमुखांनी एकाच दिशेने नियोजनपूर्वक काम करावे, अशी सूचना प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली.

भाजपाच्या जाहीरनाम्यात रयतेच्या सूचनांचा विचार : सुधीर मुनगंटीवार

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१७ ऑक्टोबर : छत्रपती शिवाजी महाराजांच्या संकल्पनेत असलेला महाराष्ट्र घडवण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटिबध्द असून त्यासाठी सर्वसामान्य जनतेच्या सूचनांचा स्वीकार करत येत्या काही दिवसातच पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित होणार असल्याची माहिती वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मनगुंटीवार यांनी गुरुवारी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या जाहीरनाम्यासाठी सहकार, बाल कल्याण, ज्येष्ठ नागरिक कल्याण, सामाजिक न्याय यासह १८ महत्वाच्या घटकांचा विचार करण्यात आला आहे. त्याचबरोबर भाजपाशासित राज्यांतील उत्तम तरतुदीही समाविष्ट केल्या जातील. जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांची अंमलबजावणी कशा पद्धतीने होते आहे हे पाहण्यासाठी विभागनिहाय समित्या नेमण्यात येतील. अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीचे सारे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टिनेही व्यवस्था केली जाईल, अशी माहितीही मुनगंटीवार यांनी दिली. ते म्हणाले की, भाजपा सरकारच्या काळात संपूर्ण शक्तिनिशी काम करण्यात आले. त्यामुळे भाजपा सरकारच्या कार्यकाळात दरडोई उत्पन्नात वाढ झाली. गेल्या ५४ वर्षांत जे झाले नाही ते आमच्या साडेसात वर्षांच्या कालावधीत झाले.

भाजपाचा जाहीरनामा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित राहणार नसून कायमस्वरुपी त्यात वाढ होत राहील.

डॉ. संजय रोडगे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार

सेलू : नाशिक येथील मराठवाडा सामाजिक फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा मराठवाडा भूषण पुरस्काराने श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे सन्मानित करण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या विविध नाविन्यपूर्ण कामगिरीबद्दल त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्राबरोबरच विविध क्षेत्रांमध्ये बहुमूल्य योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो असे आयोजकांनी सांगितले.

शिक्षण महर्षी डॉ. संजय रोडगे यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेमध्ये केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल जसे की, मराठवाड्यातील पहिली ज्ञानतीर्थ विद्यालय मराठी माध्यमाची डिजिटल शाळा सुरू करणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या एल. के. आर. आर. प्रिन्स इंग्लिश सीबीएसई स्कूल या इंग्रजी शाळेचा ठसा उमटविणे, सेलु तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना अपूर्वा पॉलिटेक्निक या महाविद्यालयाच्या माध्यमातून व्यावसायिक शिक्षणाचे दालन उभे करणे, आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी या महाविद्यालयाच्या माध्यमातून औषधनिर्माण शास्त्र पदवी आणि पदविकाचेही शिक्षण सुरू केले. कोविड काळामध्ये आपल्याच स्वतःच्या संस्थेमध्ये शरदचंद्रजी पवार कोविड केअर सेंटरच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना आरोग्य सेवा देऊन त्यांच्याबद्दल जपलेल्या माणुसकी अशा विविध कार्याची दखल घेऊन मराठवाडा सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांनी शिक्षण महर्षी डॉ. संजय रोडगे यांना पुरस्कार बहाल केला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. या यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी, सर्व घटक संस्थेचे प्राचार्य, शिक्षक वृंद व इतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले.

भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी पवित्र ग्रंथाची निर्मिती करणारे आद्यकवी : गुणवंत मिसलवाड

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

आपल्या या भारत देशामध्ये, जगामध्ये मानव कल्याणासाठी अनेक संत, महंत, ऋषीमुनी होऊन गेले त्यापैकीच एक म्हणजे ५५०० वर्षापूर्वी त्रेतायुगात भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांनी रामायण घडण्याअगोदर रामायण या पवित्र ग्रंथाची निर्मिती करणारे महान आद्यकवी म्हणजे भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १७ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता रघुकुल रित सदा चली आयी, प्राण जाऐ पर वचन न जाई, रामायण महाकाव्य रचनाकार, संस्कृतचे आद्यकवी भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांची जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त अभिवादन सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांनी २४ हजार श्लोक, ७ अध्यायामध्ये रामायण या ग्रंथाची रचना केली असून, पौराणामध्ये चार वेद, सहा शास्त्र, १८ पुराणांपैकी रामायण हा एक ग्रंथ असून याच ग्रंथावर आधारित प्रभू श्रीरामाच्या जीवनातील कालक्रमानुसार बालकांड, आयोध्याकांड, अरण्यकांड, सुंदरकांड, युद्धकांड, उत्तरकांड अशा सहा भागांमध्ये विभागले गेले असून आजघडीला आपण सर्वांनीच तुम्ही- आम्ही सर्वजण भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांचा आदर्श घेऊन समाजाप्रती- देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक श्रीनिवास रेणके, पाळीप्रमुख मनोहर माळगे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वरिष्ठ लिपीक नितीन मांजरमकर, गुलाम रब्बानी सौ. रेखा माचीनवार, सुनीता हुंबे, प्रियंका खरात, वैष्णवी गंदेवार, वाहक दिगंबर जटाळे, चालक जी.पी. कोकरे, कृष्णा पवार, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ पंडित वसंतराव गाडगीळ यांचे निधन

पुणे, १८ ऑक्टोबर : पुण्यातल्या शारदा ज्ञान पीठमचे संस्थापक आणि ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक पंडित वसंतराव गाडगीळ यांचे वृद्धापकाळानं निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. आज, शुक्रवारी सकाळी वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

संस्कृततज्ज्ञ मंडळी आणि गाडगीळ परिवाराचे नातेवाईक, मित्र आणि शिष्यवर्ग या प्रसंगी उपस्थित होते. पंडित गाडगीळ यांनी धर्म, संस्कृती, आणि इतिहास या क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

त्यांच्या निधनाने शास्त्र, संस्कृती आणि अध्यात्मिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पंडित गाडगीळ यांचे योगदान आणि त्यांची बौद्धिक वारसा पुढील पिढ्यांना प्रेरणा देईल, असा विश्वास संस्कृत विद्वानांनी व्यक्त केला आहे. संस्कृत भाषेच्या प्रचार प्रसारासाठी पंडित वसंतराव गाडगीळ यांच व्यक्तिमत्व समर्पित होत. प्राचीन संस्कृत ग्रंथ, वेद उपनिषदे यांचा त्यांचा गाढा अभ्यास होता .

टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत अध्यापन , शारदा ज्ञानपीठाची स्थापना, शारदा संस्कृत मासिक , दर वर्षी पुण्यात ऋषीपंचमी निमित्त ८० वर्षांवरील तपस्वी, विद्वान, व्यक्तींचा सत्कार आदि विविध कार्य त्यांनी केल . ते संस्कृत भाषेत संभाषण करत असत आणि संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी त्यांनी देशा परदेशात शेकडो व्याख्याने दिली. आपल्या प्रदीर्घ जीवनात संस्कृती आणि धर्माच्या क्षेत्रातील अनेक ग्रंथांची निर्मिती केली, ज्यामुळे भारतीय विद्या संचिताला एक नवे दालन उघडले आहे.

जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघात एकूण ४३८ मतदान केंद्र; दोन संवेदनशील

जिंतूर :- १५ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे त्यानुसार महाराष्ट्रात एकाच टप्प्यात मतदान होणार आहे.

महाराष्ट्र विधानसभा सार्वजनिक निवडणूक २०२४ चे नाम निर्देशन पत्र दाखल करण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर २०२४ आहे तर नामनिर्देशन भद्राची छाननी ३० ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख ०४ नोव्हेंबर असणार आहे. मतदान २० नोव्हेंबर रोजी पार पडणार असून मतमोजणी दिनांक २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

जिंतुर विधानसभा मतदारसंघात १ लाख ९८ हजार ९३२ पुरूष, १ लाख ८६ हजार ४४० महिला, ११ तृतीयपंथी आणि सैन्य दलातील ९४ असे एकूण ३ लाख ८५ हजार ४७७ मतदार आहेत. तसेच शहरी ८३ व ग्रामीण २५५ असे एकूण ४३८ मतदान केंद्र असून ०२ केंद्र संवेदनशील असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार राजेश सरोदे यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी नायब तहसीलदार प्रशांत राखे, युवराज पौळ व आदी कार्मचारी यांची उपस्थिती होती.

निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सरोदे यांनी सांगितले की, जिंतूर मतदारसंघाअंतर्गत दिव्यांग मतदार संख्या १ हजार २६७, ८५ वर्षेपेक्षा अधिक वयाचे ७ हजार ९९१ आणि १८ ते १९ वर्षे वयोगटातील ९ हजार ९४ मतदार आहेत. १ हजार पुरूष मतदारांच्या तुलनेत एकूण ९३७ स्त्रिया असे लिंग गुणोत्तर प्रमाण आहे असे सांगितले आहे. जिंतूर सेलू विधानसभा निवडणुकीचे स्ट्रांगरुम व मतमोजणी ठिकाण जिंतूर औंढा रोडवरील आयटीआय जिंतूर येथे करण्यात आले आहे.

यावेळी मतदानाचा टक्का वाढावा म्हणून विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत तसेच मतदारांचा निवडणुकीत अधिकाधिक सहभाग वाढवा म्हणून नाम निर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांक पासून वोटर सिलीप चे मतदारांना बीएलओ मार्फत वाटप करण्यात येणार आहे. २०१९ च्या जिंतूर-सेलु विधानसभा निवडणुकीत ७२.८८% मतदान झाले असल्याची माहिती तहसीलदार राजेश सरोदे यांनी दिली.

राजन तेलींचा भाजपाला रामराम, शिवबंधन बांधले

मुंबई, १८ ऑक्टोबर - माजी आमदार राजन तेली यांनी भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सावंतवाडी विधानसभा प्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राजीनामा पत्रात एकाच कुटुंबाला एक लोकसभा, दोन विधानसभा आणि त्यांच्या कलानेच चालणाऱ्याला तिसऱ्या विधानसभा मतदारसंघात उमेदवारी देणे मला योग्य वाटत नाही. ही घराणेशाही मला मान्य नाही, असे म्हटले आहे. यामुळे कोकणातील गडाला उद्धव ठाकरे यांनी भगदाड पाडल्याची चर्चा आहे. दरम्यान त्यांनी मुंबईत मातोश्रीवर ठाकरे गटात प्रवेश केला. त्या निमित्ताने ते अनेक वर्षांनी स्वगृही परतले.

कोकण आणि शिवसेना हे एक जीव - उद्धव ठाकरे

राजन तेली यांच्या पक्षप्रवेशावेळी माजी मुख्यमंत्री ठाकरे, गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसेनेत आज पाच पक्षप्रवेश झाले आहेत. चांगले कार्यकर्ते, माणसं शिवसेनेत येत आहेत. राजन तेली आमचाच. पण मधल्या काळात त्याची दिशाभूल झाली होती. मात्र, आपण ज्या दिशेत जात आहोत ती आपली दिशा नाही हे त्याच्या लक्षात आले. त्यामुळे तो स्वगृही आला आहे. राजन जसे आले तसे दिशा बदलून इकडे तिकडे गेलेले ते मोठ्या संख्येने इकडे येत आहेत. राज्यातील वातावरण बदलायला लागले आहे, असे मी म्हणणार नाही ते बदलले आहे.

ओबीसी-मराठ्यांची एकजुट समाजभेद्यांचा पराभव करणार - हेमंत पाटील

मुंबई, १८ ऑक्टोबर : राज्यात विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे. काही राजकीय पक्षाचे नेते गुडघ्याला बाशिंग बांधून सत्तेत येण्याची स्वप्न रंगवत आहेत. परंतु, केवळ राजकारणासाठी ओबीसी आणि मराठा समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या समाजभेद्यांना या निवडणुकीत मतदार राजा धोबीपछाड देईल, असे भाकित इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आयएसी) राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी शुक्रवारी वर्तवले. गेल्या काही काळामध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरक्षणाच्या मुद्दयावरून सामाजिक तेढ निर्माण करण्यात आली. ओबीसी विरूद्ध मराठा असा संघर्ष पेटवण्यात आला. परंतु, आता पुरोगामी महाराष्ट्रात समाजासमाजात दरी निर्माण करणार्यांना जनताच घरचा रस्ता दाखवेल, असा विश्वास हेमंत पाटील यांनी व्यक्त केला.

ओबीसी-मराठा बांधवांच्या प्रश्नांना योग्य न्याय देण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारी देतांना प्रामुख्याने ओबीसी-मराठा समाजाच्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला, तर राजकीय प्रतिनिधित्वाचा समतोल साधला जाईल. या समाजाच्या लोकसंख्येच्या आधारे त्यांना उमेदवारी द्यावी, असे आवाहन देखील त्यांनी यानिमित्ताने केले.

मनोज जरांगे पाटील येत्या दोन दिवसांमध्ये त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट करतील. परंतु, ओबीसी-मराठा समन्वय समिती जरांगेच्या भूमिकेनूसार पुढील राजकीय निर्णय घेईल. किमान २५ ओबीसी उमेदवार देण्याची मागणी असून याअनुषंगने जरांगे यांच्यासोबत बोलणी सुरू असल्याचे पाटील म्हणाले. जरांगेनी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला तर आठवड्याभरात मतदार संघानिहाय उमेदवारांची यादी जाहिर होण्याची शक्यता देखील पाटील यांनी व्यक्त केली.

जिंतुर - सेलू मतदार संघातील कमी केलेले ४००० मतदारांचे नावे यादीत समाविष्ट करा : विजयराव भांबळे

जिंतूर:- जिंतुर - सेलू मतदार संघातील राजकीय हेतूतून कमी केलेले ४००० मतदारांचे नावे तात्काळ मतदान यादीत समाविष्ट करा म्हणून मा.आ.विजयराव भांबळे साहेब व खां.संजयजी जाधव साहेब यांनी जिल्हाधिकारी परभणी यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

जिंतूर सेलू मतदार संघात ज्या मतदारांनी लोकसभा निवडणुकीत मतदान केले, त्या ४००० मतदारांची नावे भाजपच्या काही नेत्यांनी व कार्यकरत्यानी ७ नंबरचा फॉर्म परस्पर दाखल करून हेतुपरस्पर मतदार यादीतील नावे कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. ती नावे कमी करण्यात येऊ नये तसेच बाहेर राज्यातील व इतर जिल्ह्यातील रहिवाशी असणारे लोकांचे मतदार यादीत बोगस कागद पत्राच्या आधारे (जसे की उदा. आधार कार्ड, शिधापत्रिका, लाइटबिल खाडाखोड करून) मतदारांची नावे वाढविण्याचे काम सुरू आहे. ती नावे वाढविण्यात येऊ नयेत. महाविकास आघाडीच्या विचारांचे मतदारांची नावे कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात हयात असणाऱ्या मतदारांची नावे मयत यादीत टाकून नावे कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे आशा प्रकारचे प्रयत्न करण्यात येऊ नये तसेच सेलू व जितुर तालुक्यासह सेलू शहर व जिंतुर शहरात आशा प्रकारचे प्रयत्न करणे सुरू आहेत. वरील पातळीवर आशा प्रकारचे प्रयत्न करत असतील तर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सेलू जिंतुर मतदारसंघात शहरी व ग्रामीण भागात नावे कमी करण्याचा प्रयत्न होत आहे तो होऊ नये व बोगस नावे यादीत टाकण्यात येऊ नये याची खबरदारी घेण्यात यावी अन्यथा महाविकास आघाडी जिंतूर-सेलू यांच्याकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल अशा ईशारा एका लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी (निवडणूक) परभणी यांना देण्यात आला.

यावेळी खां.संजय (बंडू) जाधव, मा.आ.विजयराव भांबळे, विनायकराव पावडे, ई. उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

कि.क्र. प्र.ढ्ह २५/११/२४

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १५७/२४

१/-छाया विजय हुंडीवाले, वय ४५ वर्षे रा. गुम्मी, ता. व जि. बुलडाणा २/- सुनिता गंगाधर चोपडे, वय ३८ वर्षे रा. रोहीणखेड, ता. मोताळा, जि. बुलढाणा ३/- सविता गणेश साखरे, वय ३५ वर्षे रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर ४/- सरला सचिन कुल्ही, वय ३२ वर्षे, चैत्यनवाडी, ता. मलकापूर जि. बुलढाणा ५/- लताबाई राजेंद्र गोडबे, वय ५७ वर्षे, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, ६/- शुभम राजेंद्र गोडबे, वय २९ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ७/- वैभव राजेंद्र गोडबे, वय २९ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ८/- ईश्वर राजेंद्र गोडबे, वय २९ वर्षे, रा. वरीलप्रमाण.

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी यह सचिन सु.लि सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे करिता अर्ज दाखल केलेला आहे. मयत डिगंबर नामेद्वप्पा गोडवे यांचा दिनांक ०५/०८/२००९ रोजी मयत कुरुणाबाई डिंगवर गोडंबे याचा दिनांक १५/०७/२०२० मौजे सावळदबारा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ८ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते हे मयत डिगंबर नामेवप्पा गोडबे मयत पुरुणबाईडिंगवरगोडवे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल आजरोजी दिनांक) ८/६/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६६/२०२४.

अर्जदार : १. अंजनाबाई रामदास मगरे, वय, ७४ वर्षे, धंदा, घरकाम, २. रमेश रामदास मगरे, वय, ४६ वर्षे, धंदा, मजुरी, ३. सुरेश रामदास मगरे, वय. ४१ वर्षे, धंदा, मजुरी, सर्व रा. ठाणा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, ४. पुष्पाबाई सुनिल सरोदे, वय. ४९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. वसई, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, ५. अनिताबाई राजु खरात, वय. ३५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. सुभानपुर, ता. भोकरदण, जि. जालना

-विरुध्द-

गैरअर्जदार - कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत रामदास मोतिराम मगरे हे दि. १३/०४/२०२४ रोजी सायन हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल कॉलेज, मुंबई येथे त्यांचा मृत्यु झालेला असून, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व ५ हे मयत रामदास मोतिराम मगरे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी

हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- २५/११/२०२४.

आज दि. १७/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव

जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

नि.क्रं.

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६३/२०२४.

यशोदाबाई भ्र. विठठल दामधर, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रामकृष्णा विठठल दामधर यांचा दिनांक ०७/०५/२०२० रोजी आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत रामकृष्णा विठठल दामधर यांचे वारस असुन मयत रामकृष्णा विठठल दामधर यांच्या नावे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सोयगांव येथे खाते क्रं. २०२२०९०२९७४ मध्ये रक्कम रुपये ४२,८६०.७२/- रक्कम आहे व सदर रक्कम काढण्यासाठी अर्जदार यांना वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १६/११/२०२४

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ४४५/२०२४

अर्जदार:- १. सुरेखा किशोर दळवी, वय. ३६ वर्ष धंदा. शेती २. महेश किशोर दळवी, वय. २२ वर्ष धंदा. शेती दोघे रा. नारायणपूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, अर्जदार नं. १ यांचे आजे-सासरे व अर्जदार नं. २ यांचे पंजोबा नामे सुकाजी लिंबाजी दळवी हे दि. १६/०८/१९७६ रोजी मौजे तांदूळवाडी ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. असे की, मयत सुकाजी लिंबाजी दळवी यांचा मुलगा तसेच अर्जदार नं. १ यांचे सासरे व अर्जदार नं. २ यांचे आजोबा नामे भानुदास सुकाजी दळवी हे देखील नारायणपूर बु. ता. गंगापूर येथे दि.२५/१०/२०११ रोजी मयत आहेत व अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ यांचे वडिल नामे किशोर भानुदास दळवी हे देखील त्याअगोदरच दि.२०/०८/२००७ रोजी मौजे नारायणपूर बु. ता. गंगापूर येथे मयत झाले असल्याने अर्जदार यांच्या शिवाय मयत सुकाजी लिंबाजी दळवी, भानुदास सुकाजी दळवी व मयत किशोर भानुदास दळवी यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत सुकाजी लिंबाजी दळवी, भानुदास सुकाजी दळवी व मयत किशोर भानुदास दळवी यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी व इतर शासकीय कामासाठी, आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत सुकाजी लिंबाजी दळवी, भानुदास सुकाजी दळवी व मयत किशोर भानुदास दळवी यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्धीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत सुकाजी लिंबाजी दळवी, भानुदास सुकाजी दळवी व मयत किशोर भानुदास दळवी यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, क. स्तर, (मा. इंगोले सर) न्यायालय गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

१८/१०२४

दि.कि. अर्ज नं. २५३/२०२४

अर्जदार - १) द्वारकाबाई सूर्यभान उबाळे वय ७१ वर्ष धंदा शेती रा. वरखेड ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) सुभाष सूर्यभान उबाळे वय ३५ वर्ष धंदा शेती रा. वरखेड ता. गंगापूर जिल्हा औरंगाबाद ३) निकिता रावसाहेब खाजेकर, वय ४१ वर्ष धंदा घरकाम रा. रामाई नगर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) भिमाबाई संतोष सिरसाठ वय ३४ वर्ष धंदा घरकाम रा. मुदेश वाडगाव ता. गंगापूर. जि. औरंगाबाद ५) सविता शिवाजी सोनवणे वय ३२ वर्ष, धंदा घरकाम रा. पळसखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद ६) नानासाहेब सूर्यभान, उबाळे, वय २८ वर्ष, धंदा शेती रा. वरखेड ता. गंगापूर जि. औरंगाबाद ७) इंदुबाई पावलस उबाळे वय ९३ वर्ष धंदा निरंक रा जोगेश्वरी वाळुज ता गंगापुर जि औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार - निरंक

असे की, अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. संजय के. घाटविसावे यांचे मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला की, असे की, अर्जदार नं. १ चे पती व २ ते ६ यांचे वडील अर्जदार नं ७ यांचा मुलगा हे दिनांक ८.७.२०११ रोजी त्यांच्या मूळ गावी मौजे वरखेड ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. अर्जदार नं. १ द्वारकाबाई उबाळे ही पत्नी आहे. अर्जदार न. २ ते ६ ही आपत्य म्हणजेच मुलं मुली आहेत. अर्जदार नं ७ हि आई आहे त्यांचे ते एकमेव वारस असल्याचा दावा करतात व मयत सूर्यभान पावलस उबाळे यांचे वारस प्रमाणपत्र पत्राची मागणी करत आहेत. तरी सदर अजीवर कोणाचाही अक्षय काहीही आक्षेप/उजर काही असल्यास ३० दिवसांच्या आत जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून कोटीत नोंदवावा. अन्यथा निर्विवाद समजून पुढील आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक १०/१/२०२४

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर ता. गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर.) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद

सिव्हील एम.ए.क: ४६१ / २०२४

८-

अर्जदार - १) शकुंतला शिवाजी मोरे, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पुरी, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद २) सतिष शिवाजी मोरे, वय : ३८ वर्षे, धंदा नोकरी, रा. सदर... ३) शारदाबाई काकासाहेब दुबीले, बय १ ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. जोगेशवरी, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. ४) योगीता दत्तात्रय बाराहाते, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंप्री (शिंगी), ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. ५) संदीप शिवाजी मोरे, वय ३१ वर्षे, धंदा- नोकरी, रा. पुरी, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक -:

प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VII & 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे वावत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) न्यायालय गंगापुर यांच्या न्यायालयात वॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी ॲड. अनंत खवले पाटील यांच्या मार्फत अर्ज सादर केला असुन अर्जदार क.१ ही अर्जदार क. २ ते ५ यांची आई असुन अर्जदार क.१ चे पती म्हणजेच अर्जदार क. २ ते ५ यांचे वडील नामे शिवाजी धोंडीराम मोरे हे दि.०८/०९/२०१४ रोजी मौजे पुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झाले असुन त्यांना अर्जदार क. १

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

आनंदऋषी हॉस्पिटलच्या रुग्णसेवेत भंडारी परिवाराच्या दुसऱ्या पिढीचे योगदान - आशा भंडारी

अहमदनगर, १८ ऑक्टोबर : व्याधीने ग्रासलेल्या दीन-दुबळ्या रुग्णांना आनंदऋषी हॉस्पिटल नवजीवन देण्याचे काम करीत आहे.आरोग्य शिबिर घेऊन सर्वसामान्यांना आधार दिला जात आहे. सर्वसामान्यांच्या व्याधी मुक्तीसाठी रुग्णसेवेच्या आरोग्य मंदिरात रुग्णसेवेसाठी भंडारी परिवारातील दुसऱ्या पिढीचे योगदान सुरु असल्याचे प्रतिपादन आशा भंडारी यांनी केले. जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये स्व.डॉ.पोपटलाल भंडारी व स्व. राजीबाई रायचंद भंडारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ डॉ.आशिष भंडारी व भंडारी परिवाराच्यावतीने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी आशा भंडारी बोलत होत्या. आशा भंडारी म्हणाल्या की, स्व.डॉ.पोपटलाल भंडारी यांनी मिरजगाव येथे ३० वर्ष आरोग्यसेवा दिली.पंचक्रोशीतील फॅमिली डॉक्टर म्हणून त्यांची ख्याती होती.त्यानंतर ते आनंदऋषीजी हॉस्पिटलचे पहिले डॉक्टर म्हणून रुजू झाले.त्यांच्या स्वर्गवासानंतर आमचा मुलगा डॉ. आशिष भंडारी हे रुग्णसेवेचा वारसा पुढे चालवत आहे.हॉस्पिटलच्या पायाभरणीपासून भंडारी परिवार या हॉस्पिटलचा अविभाज्य अंग बनला आहे.भंडारी परिवारावर कायम आचार्य श्रींची कृपा व प्रबुध्द विचारक आदर्शऋषी महाराज यांचे आशिर्वाद असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटल चालवणे अत्यंत अवघड काम असून,यामध्ये एकही घडलेली चूक एखाद्याच्या जीवावर बेतू शकते.मात्र आनंदऋषी महाराजांच्या आशिर्वादाने डॉ. आशिष भंडारी सर्व हॉस्पिटलचे व्यवस्थापन उत्तमपणे बघते आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटलची प्रगती झपाट्याने सुरु असून,विविध विभाग कार्यान्वीत होऊन दर्जेदार आरोग्यसेवा सर्वसामान्यांना मिळत आहे.त्यांचे वडील देखील चांगले डॉक्टर होते.त्यांनी हॉस्पिटलच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले.हॉस्पिटलच्या उभारणीपासून भंडारी परिवाराचे योगदान राहिले असल्याचे त्यांनी सांगितले.

अजय मुथा म्हणाले की, आनंदऋषी हॉस्पिटलच्या माध्यमातून सुरु असलेला मानवसेवेचा वसा भंडारी परिवार पुढे घेऊन जात आहे.डॉ. आशिष भंडारी सर्व यंत्रणा हाताळून निष्ठेने कार्य करत असून,हॉस्पिटलचा कणा म्हणून त्यांची भूमिका व योगदान आहे.सर्वसामान्यांना आधार देण्यासाठी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर सारखा महत्त्वाचा विभाग सुरू झाला आहे.या विभागात तज्ञ डॉक्टर व अद्यावत आरोग्य यंत्रणा सेवेसाठी सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पोलिसांनी परराज्यांतील नागरिकांची चारित्र्य पडताळणी करावी - चाकणकर

पुणे, १८ ऑक्टोबर : राज्यातील कोपरखैरणे, उरण, बदलापूर आणि पुण्यातील बोपदेव घाट परिसरात लैंगिक अत्याचार प्रकरणातील सर्व आरोपी परराज्यांतील आहेत. अशा घटनांमुळे पुण्यासह महाराष्ट्राची बदनामी होत आहे. त्यामुळे पोलिसांनी परराज्यातून येणाऱ्या नागरिकांची चारित्र्य पडताळणी करावी. तसेच, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पोलिसांकडून उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिली. बोपदेव घाटातील तरुणीवर लैंगिक अत्याचार प्रकरणाबाबत चाकणकर यांनी आयुक्तालयात पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेतली. या वेळी गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. चाकणकर म्हणाल्या, बोपदेव घाट लैंगिक अत्याचारासारख्या घटना पुन्हा घडू नयेत, याबाबत पोलिसांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

विरुद्ध दिशेने आल्यास वाहन सहा महिन्यांसाठी होणार जप्त

पुणे, १८ ऑक्टोबर - शहरात वर्दळीच्या कालावधीत अवजड वाहनांवरील बंदीची वाहतूक पोलिसांकडून कठोर अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच, ट्रिपल सीट, ड्रंक ण्ड ड्राईव्ह आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोहीम राबविण्यात येत आहे. गेल्या १५ दिवसांत सुमारे २५ हजार वाहनचालकांवर कारवाई केली असून, दोनशेहून अधिक वाहने जप्त केली आहेत. विरुद्ध दिशेने वाहन चालविल्यास सहा महिन्यांसाठी वाहन जप्त करण्यात येईल, असा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.शहरात भरधाव आणि वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यात विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. अशा बेशिस्त वाहनचालकांवर वचक राहावा, यासाठी वाहतूक शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात येत आहे. गेल्या १५ दिवसांत दोनशेहून अधिक वाहने जप्त करण्यात आल्याचे अमितेश कुमार यांनी सांगितले.

महायुती पुणे शहर व जिल्ह्यातील विधानसभेच्या सर्व एकवीस जागा जिंकणार - संदीप खर्डेकर

पुणे, १८ ऑक्टोबर - महाराष्ट्राचे लोकनेते देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेजी , राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खा. डॉ. मेधा कुलकर्णी या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीतील सर्व घटक पक्षांमध्ये योग्य समन्वय राखत पुणे महानगर,पुणे ग्रामीण जिल्हा समन्वयक म्हणून विधानसभेच्या सर्व एकवीस जागा जिंकण्याचा मी संकल्प केला आहे असे संदीप खर्डेकर म्हणाले.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर यांची या महत्वाच्या पदावर नियुक्ती केल्याचे जाहीर केल्यावर संदीप खर्डेकर यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली. मी पंचवीस वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्यरत असून पुणे शहर प्रचार प्रसिद्धी प्रमुख, पुणे शहर भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष, शहर उपाध्यक्ष, शहर सरचिटणीस अश्या विविध पदांवर काम केले असून सध्या प्रदेश प्रवक्ता म्हणून जबाबदारी पार पाडत असताना नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुणे, बारामती व शिरूर मतदारसंघात महायुतीचा समन्वयक म्हणून काम केले आहे. पक्ष संघटनेत निष्ठेने दिलेली जबाबदारी पार पाडत असल्यामुळे मा. देवेंद्रजी फडणवीस, मा. चंद्रशेखर बावनकुळे, मा. चंद्रकांतदादा पाटील यांनी ही महत्वाची जबाबदारी सोपविली असल्याचे ही संदीप खर्डेकर म्हणाले.केवळ राजकीय पक्षच नव्हे तर विविध ज्ञाती संस्था, सामाजिक संस्था / संघटना यांच्याशी ही संपर्कात असून ह्या सर्वांना सोबत घेऊन महायुतीच्या प्रचारात त्यांचा सक्रिय सहभाग असेल, असेही खर्डेकर म्हणाले.

मी जिल्ह्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या विद्यमान लोकप्रतिनिधी, प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी संपर्कात असून महायुतीचे उमेदवार जाहीर झाल्यावर प्रत्येक मतदारसंघात महायुतीचे मेळावे, बैठका घेऊन सर्व एकवीस उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करेन असेही संदीप खर्डेकर म्हणाले. महायुतीतील सर्व सहयोगी पक्षांचे कार्यकर्ते निवडणुकीसाठी सज्ज असून राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार स्थापन होईल असा विश्वास ही संदीप खर्डेकर यांनी व्यक्त केला.

अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासाठी वेळेत उपस्थित रहावे : डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

जालना,(जिमाका) दि. १८ :- जिल्ह्यात मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी आणि इतर मतदान अधिकारी म्हणून ९ हजार ८५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तरी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण विधानसभानिहाय पाच ठिकाणी दोन सत्रात सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. तरी नियुक्त केलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासाठी वेळेत उपस्थित रहावे, गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जालना जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयामधील कार्यरत असलेल्या एकुण १४ हजार ७२० अधिकारी-कर्मचाऱ्यांची माहिती ऑनलाईन पोर्टलवर भरण्यात आली आहे. यामध्ये गट-अ ४२५, गट-ब ८९२, गट-क १२५९० आणि गट-ड ८१३ असे एकुण १४७२० अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यापैकी पहिल्या प्रशिक्षणाचे आदेश ९ हजार ८५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांना संबंधित तहसील कार्यालयाकडून तामिल करण्यात आले आहेत. मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी २ व ३ यांच्यासाठी पहिल्या प्रशिक्षणात सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत व दुपारी २ ते ५.३० वाजेपर्यंत राहिल. मतदान अधिकारी २ व ३ यांच्यासाठी सकाळच्या सत्रात प्रत्यक्ष यंत्र हाताळणीचे ज्ञान व दुपारच्या सत्रात प्रशिक्षण देण्यात येईल. तर मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष यांना सकाळच्या सत्रात प्रशिक्षण व दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष यंत्र हाताळणीचे ज्ञान देण्यात येईल. अशी माहिती उपजिल्हाधिकारी तथा कर्मचारी व्यवस्थापन समितीच्या नोडल अधिकारी नम्रता चाटे यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघात बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. प्रथम प्रशिक्षण ९९- परतूर विधानसभा मतदारसंघासाठी परतूर येथील भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी नाट्यगृहात होणार आहे. १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघासाठी घनसावंगी येथील राजेगाव रोडवरील मॉडेल महाविद्यालयात होईल. १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी जालना येथील देऊळगाव राजा रोडवरील सेंन्ट मेरी हायस्कुलमध्ये होईल. १०२-बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघासाठी बदनापूर येथील साक्षी मंगल कार्यालयात होईल. आणि १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी भोकरदन येथील सिल्लोड रोडवरील समृध्दी लॉन्समध्ये आयोजन करण्यात आले आहे. असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

ध्येयविरहीत शिक्षणप्रणाली राष्ट्रासाठी घातक : डॉ. मनमोहन वैद्य

'अरूण रंग' पुस्तकाचे प्रकाशन

पुणे - भौतिक प्रगतीसाठी उत्पन्नाचे साधन चांगले असायलाच हवे. मात्र तेच जीवनाचे ध्येय होऊ शकत नाही. समाज परिवर्तन हे आयुष्याचे ध्येय असायला हवे. दुर्दैवाने आजची शिक्षण प्रणाली ध्येयविरहीत झाली असून, साध्याला अधिक महत्त्व दिले जात आहे. ध्येयविरहीत शिक्षणप्रणाली राष्ट्रासाठी घातक आहे असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य डॉ. मनमोहन वैद्य यांनी व्यक्त केले.

टिळक रस्ता येथील श्रीगणेश सभागृहात 'विवेकानंद केंद्र, कन्याकुमारीच्या महाराष्ट्र प्रांता'च्या वतीने आयोजित 'अमृत मिलन' सोहळ्यात डॉ. वैद्य बोलत होते. कार्यक्रमात केंद्राचे जीवनव्रती विश्वास लपालकर यांच्या अनुभवांवर आधारीत 'अरूण रंग' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सुनिल कुलकर्णी आणि कांचन जोशी यांनी विश्वास लपालकर यांच्याशी संवाद साधला. कार्यक्रमाला रा.स्व. संघाचे अखिल भारतीय सह-प्रचार प्रमुख प्रदीप जोशी, विवेकानंद केंद्राचे महासचिव भानुदासजी, विवेकानंद केंद्र मराठी प्रकाशन विभागाचे सचिव सुधीर जोगळेकर, केंद्राचे महाराष्ट्र प्रांताचे प्रमुख अभय बापट उपस्थित होते. अरूण रंग या पुस्तकाचे शब्दांकन दिलीप महाजन यांनी केले.

जीवनातील ध्येय आणि साध्य यात अंतर असल्याचे डॉ. वैद्य यांनी सांगितले. ते म्हणाले, डॉक्टर किंवा अभियंता बनविणे हे शिक्षणाचे साध्य असू शकते पण ध्येय नाही. समाज परिवर्तन हेच शिक्षणाचे ध्येय असायला हवे. एक व्यक्ती म्हणून आपले जीवन यशस्वी होण्यापेक्षा सार्थकी होणे आवश्यक आहे. समाजाचे सामाजिक भांडवल वाढवित राहणे, म्हणजे जीवन सार्थकी लागेल. असेही ते म्हणाले.

लखलखत्या दिव्यांच्या उजेडात आपला दिवा लावण्यापेक्षा, जिथे अंधार आहे, अशा ठिकाणी कार्य करावे, या भावनेने पूर्वांचलात जीवनव्रती म्हणून काम केल्याचे लपालकर यांनी यावेळी सांगितले. स्वामी विवेकानंदांचे कार्य प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. कारण आजच्या समाजाची अवस्था प्रत्येकाने उत्तिष्ठ जागृतः व्रत घेणे आवश्यक आहे, असे मत भानुदासजी यांनी व्यक्त केले.

प्रूवांचलाबाबत खोटा नॅरेटीव्ह

आदिवासी समाज हा आपल्यापेक्षा जास्त संघटीत आणि सुसंस्कृत असल्याचे मत प्रदीप जोशी यांनी व्यक्त केले. ते म्हणाले,देशाच्या पूर्वांचल भागाबद्दल स्थानिकांपेक्षा बाहेरील नागरीकांनीच जास्त अपप्रचार करत खोटा नॅरेटीव्ह उभा केला. स्वतःचे कायदे, संस्कृती, नवतंत्रज्ञान आणि भाषा समृद्धीचा विचार असलेला आदिवासी समाज हा अधिक समृद्ध आहे. त्यांच्यातील सकारात्मक आणि सृजनात्मक गोष्टी उर्वरीत भारतीयांपर्यंत पोहोचायला हव्यात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेंद्र बोरकर यांनी केले.

रायपूर परिसरात चोरीचे सत्र सुरूच

शेतकऱ्यांमध्ये दहशत, चोरट्यांना जेरबंद करण्याचे आव्हान

सेलू : मागील काही दिवसांपासून रायपूर (ता. सेलू) परिसरात चोरीचे सत्र सुरूच आहे. काही महिन्यांपूर्वीच एका शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीवरील जनरेटर चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना ताजी असतानाच चोरट्यांनी पुन्हा एका शेतकऱ्यांच्या विहिरीतील विद्युत पंप चोरून नेल्याची घटना रविवारी (ता. १३) उघडकीस आली. चोरीच्या या वाढत्या घटनामुळे शेतकऱ्यांत चोरट्यांबद्दल दहशत निर्माण झाली असून, पोलिसांनी वाढत्या चोरीला आळा घालून गुन्ह्याची उकल लवकर करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, रायपूर येथील रामेश्वर गाडेकर यांनी शेतातील विहिरीवर ७० हजार रुपये किमतीचे असलेले जनरेटर बसवले होते. मात्र चोरट्यांनी काही दिवसातच ते जनरेटर चोरून नेल्याची घटना घडली. ही घटना ताजी असतानाच आता येथील शेतकरी सुभाष काकडे यांनी सेलू पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मी शेत गट नं २२८ मध्ये मुख्यमंत्री सौर पंप योजनेतून विहिरीमध्ये स्पॅन कंपनीची ३५ हजार रुपये किमतीची मोटार बसविली होती. सध्या रब्बी हंगामातील हरभरा पिकाला पाणी देण्यासाठी मी १३ ऑक्टोबरला विहीरीवर गेलो असता मोटारीचे केबल वायर व पाण्यातील मोटार विहिरीत दिसून आली नाही. त्यामुळे मोटार शोधण्याचा प्रयत्न केला असता विहिरीतील पाण्यामध्ये ३५ हजार रुपये किमतीची असलेली मोटार व २ हजार रूपये किमतीचे वायर केवल असे ३७ हजार रूपयाचे चोरट्यांनी नुकसान केले आहे. याबाबत सेलू पोलिस ठाण्यात

अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान चोरलेल्या वीज मोटार भंगारात विकल्या जात असून, अशा या मोटार चोरीमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले असून विहिरीवर सध्या शेतकऱ्यांना रात्र जागून काढण्याची वेळ आली आहे. यामुळे चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी विशेष पथकाची निर्मिती करून गुन्ह्याची लवकर उकल करण्यासाठी पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहेत.

पोलीसगस्त वाढवावी

रायपूर परिसरातील वाढत्या चोरीच्या घटना रोखण्यात पोलिसांना अपयश येत आहे. रात्रीची गस्त मंदावली आहे. गत महिनाभरापासून चोरट्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारी, केबल वायर, जनरेटर चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी. रामेश्वर गाडेकर, जिल्हा उपाध्यक्ष राँ.काँ. (शरद पवार गट)

संजीवनीच्या अलीमोहम्मद शेखची राज्य व्हॉलिबॉल संघ निवड चाचणीसाठी निवड

अहमदनगर, १८ ऑक्टोबर - क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या वतीने सोलापुर येथे विभागीय व्हालीबॉल स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तेथे पुणे विभागा अंतर्गत सात संघ आले होते.यात संजीवनी ज्युनिअर कॉलेजचा संघ उपविजयी झाला होता.या सात संघातुन पुणे विभागाचा एक संघ तयार करण्यात आला.यात संजीवनीच्या अलीमोहम्मद फिरोज शेखची निवड झाली.यातुन त्याची संपुर्ण राज्याच्या संघासाठी निवड चाचणी साठी निवड झाली आहे. तेथे त्याची निवड झाली तर शेख हा राज्याच्या व्हॉलीबॉल संघातील खेळाडू असेल,अशी माहिती संजीवनी ज्यु.कॉलेजच्या वतीने देण्यात आली आहे.

सोलापुर येथे झालेल्या विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धांमध्ये संजीवनीच्या संघाने अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व केले होते.तेथे अलिमोहम्मदने उतकृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्यामुळे त्याची पुणे विभागाच्या संघात निवड झाली आहे.आता तो पुणे विभागाच्या संघातून आपले खेळाचे कौशल्ये धाराशिव येथे दाखविणार आहे. तेथे राज्यातुन एकुण आठ संघ येणार असुन या आठ संघातील उत्कृष्ट खेळाडूंमधुन राज्याचा संघ तयार होईल.तेथेही त्याची राज्य संघासाठी निवड होवु होईल,अशी आशा आहे. तसे झाले तर राज्याच्या संघात संजीवनीचा खेळाडू असेल.संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी अलिमोहम्मदचे अभिनंदन करून पुढील निवडी साठी ही शुभेच्छा दिल्या आहे. तसेच प्राचार्य डॉ.रावसाहेब शेंडगे यांचेही अभिनंदन केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मनुष्यबळाची पहिली सरमिसळ संपन्न

नगर दि.१८-विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ मतदारसंघात नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांची विधानसभा मतदारसंघ क्षेत्रनिहाय सरमिसळ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली. या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, मनुष्यबळ व्यवस्थापन समन्वयक अतुल चोरमारे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी गजानन नकासकर उपस्थित होते. नगर जिल्ह्यांतर्गत बारा विधानसभा क्षेत्रासाठी ४ हजार ९३२ मतदान केंद्राध्यक्ष, ४ हजार ७६१ प्रथम मतदान अधिकारी तसेच ४ हजार ९०१ पुरुष व ६ हजार २१५ महिला अशा इतर मतदान अधिकाऱ्यांची सरमिसळ संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात आली. सर्व नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना २७ ऑक्टोबर रोजी त्यांच्या विधानसभा मतदारसंघांमध्ये पहिले प्रशिक्षण देण्यात येणार आहे

परवाना धारकांना शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध; शस्त्र जवळच्या पोलिस ठाण्यात जमा करावेत

जालना, दि. १८ :- भारत निवडणुक आयोगाच्या सुचनानुसार जालना जिल्ह्यामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ चा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यंत, परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करण्यात येत आहेत. तरी असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलिस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी तसेच सराफा यांच्या व्यतिरिक्त तसेच मा. उच्च न्यायालयातील जुन्या रिट पिटीशन २००९/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन इतर सर्व परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास आदेशान्वये बंदी घालण्यात आली आहे. शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र जवळच्या पोलिस ठाण्यात जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एका आठवड्याचे आत संबधितांचे शस्त्रे परत करण्यात यावेत. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील पादचारी पुलाच्या उभारणीनिमित्त वाहतुकीच्या मार्गात बदल

जालना,(जिमाका) दि. १८ :- जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील फुट ओव्हर ब्रिजची उभारणीनिमित्ताने अंबड चौफुली-मोतीबाग जाणारा रस्ता रविवार दि.२० ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजेपासून ते २१ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री १ वाजेपर्यंतच्या वेळेत बंद ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ कलम ३६ अन्वये राष्ट्रीय महामार्ग ७५३ वरील अंबड चौफुली-मोतीबाग ते छत्रपती संभाजीनगर चौफुली मार्गावरील वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत.

पर्याय मार्ग म्हणून बीड-अंबडकडून येणारी वाहतुक व छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतुक ही जालना येथील मंठा चौफुली-नाव्हा चौफुली-देऊळगाव राजा चौफुली- कन्हैयानगर-भोकरदन चौफुली बायपास मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे जाईल. सदरचे आदेश दि.२० ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजेपासून ते २१ ऑक्टोबर २०२४ रोजी १ वाजेपर्यंतच्या कालावधीत पुलाची उभारणी पुर्ण होईपर्यंत लागू राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

'मागेल त्याला सौर कृषीपंप' या महावितरणच्या वेबसाईटला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

पुणे, १८ ऑक्टोबर - मागेल त्याला सौर कृषीपंप' या महावितरणच्या वेबसाईटला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातत्तील १४ हजार ९७१ शेतकऱ्यांनी यासाठी नोंदणी केली असून ५ हजार ४७३ कृषिपंपासाठी शेतकऱ्यांनी पाच किंवा १० टक्के रक्कम भरलेली आहे. आत्तापर्यंत १ हजार ७६३ सौर कृषीपंप कार्यान्वित करण्यात आले असून ३ हजार ६९५ सौरकृषी पंप बसवण्याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. राज्य सरकारने मागेल त्याला सौर कृषीपंप ही योजना शेतकऱ्यांसाठी सुरू केली आहे.त्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज करता यावा यासाठी महावितरणने वेबसाईट तयार केली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी महावितरणच्या वेबसाईटला उदंड प्रतिसाद मिळाला आहे. राज्य सरकारच्या या योजनेत शेतकऱ्यांना जमिनीच्या क्षेत्रफळानुसार तीन ते साडेसात एचपीपर्यंतचे पंप मंजूर होतात. शेतकऱ्यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा सर्व संच केवळ दहा टक्के रक्कम भरून मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के आहे. शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून सबसिडीच्या स्वरूपात मिळते. सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने एकदा संच बसविला की, शेतकऱ्याला २५ वर्षे हक्काचे व स्वतंत्र सिंचनाचे साधन मिळते. शेतकरी पारंपरिक ग्रीडमधून मिळणाऱ्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहत नाही तसेच त्याला बिलही येत नाही. सिंचनासाठी केवळ दिवसा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या सोईचे होते. राज्य सरकारने ही योजना जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांकडून तिला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आणखी अडीचशे पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

पुणे, १८ ऑक्टोबर : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधानसभेसाठी संधी न दिल्यामुळे नाराज असलेल्या मानकर यांच्या आणखी अडीचशे पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले. त्यामुळे पक्षाच्या विविध पदांवरुन राजीनामे देणाऱ्यांची संख्या आता ८५० वर पोचली असुन शनिवारपर्यंत ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य पदासाठी पुण्यातुन शहराध्यक्ष मानकर यांची वर्णी लागावी, यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली होती. मात्र, मानकर यांना डावलण्यात आले, परिणामी पहिल्याच दिवशी ६०० पदाधिकाऱ्यांनी सामुहीक राजीनामा देत नाराजी व्यक्त केली. तर गुरुवारी देखील २५० जणांनी राजीनामा दिला आहे.

आदर्श आचारसंहिता लागू होण्याच्या ४८ तासात जिल्ह्यातील २४ हजार ९६९ जाहिराती काढल्या

नगर दि. १८- विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासूनच्या ४८ तासामध्ये जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच खाजगी मालमत्तेवरील भित्तीपत्रके, घोषणा फलक, रंगविलेल्या जाहिराती, कोनशिला, झेंडे काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसरातील ११ हजार ६४१, सार्वजनिक ठिकाणच्या ९ हजार ५०२ तर खाजगी मालमत्तेवरील ३ हजार ८२६ अशा एकूण २४ हजार ९६९ जाहिराती काढण्यात आल्या असल्याची माहिती आचारसंहिता कक्षातर्फे देण्यात आली आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८६४, सार्वजनिक ठिकाण ३९१ तर खाजगी मालमत्तेवरील ३२० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.

संगमनेर मतदारसंघ कार्यालय परिसर ८१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ८८, खाजगी मालमत्तेवरील २५५, शिर्डी मतदारसंघ कार्यालय परिसर ९१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ६४१, खाजगी मालमत्तेवरील ३५१, कोपरगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ९५४, सार्वजनिक ठिकाण ६१९, खाजगी मालमत्तेवरील ३०९, श्रीरामपूर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १३१, सार्वजनिक ठिकाण १ हजार ५५० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.

नेवासा मतदारसंघ कार्यालय परिसर ३२४, सार्वजनिक ठिकाण ५७७, शेवगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ८५४, सार्वजनिक ठिकाण ९३७, खाजगी मालमत्तेवरील १ हजार ७२३, राहुरी मतदारसंघ कार्यालय परिसर २५४, सार्वजनिक ठिकाण १४१, खाजगी मालमत्तेवरील २१, पारनेर

अग्रलेख...

पवार, पंचनामा आणि प्रगती पुस्तक...

केवळ विरोधकांचाच नव्हे, तर शरद पवार यांनी ज्या अन्य पक्षांना सोबत घेऊन महाविकास आघाडीची मोट बांधली आहे, त्या पक्षांचादेखील पवार यांच्या उक्ती आणि कृतीवर ठाम विश्वास नसल्याने अलिकडे ते जी काही वक्तव्ये करत आहेत, त्यामुळे एक तर त्यांचे मनोरंजन होत असावे किंवा नव्या काळजीची काजळी त्यांच्या मनावर उमटत असावी. महाराष्ट्राला मार्गावर आणल्याखेरीज मी स्वस्थ बसणार नाही, अशा आशयाचे वक्तव्य त्यांनी केले, तेव्हा विरोधकांसोबतच जनतेचेही बरे मनोरंजन झाले असेलच; पण पवार यांच्यासोबत असलेल्या महाविकास आघाडीतील त्यांच्या सहकारी पक्षांच्या नेत्यांच्याही भुवया काहीशा उंचावल्या असतील. शरद पवार हे राजकारणातील सर्वाधिक बेभरवशाचे नेते म्हणून ओळखले जातात. त्याची त्यांना स्वतःसही जाणीव आहे. आपल्या या ओळखीविषयी त्यांनी काही वेळा आपली भूमिकाही स्पष्ट केलेली आहे. कदाचित आपली ही ओळख राजकारणातून पुसली जाऊ नये यासाठीही ते प्रयत्नशील असावेत, म्हणूनच त्यांची कृती आणि उक्ती यांमधील अंतर स्पष्ट होऊनही ते जपण्याचाच त्यांचा प्रयत्न असावा. पाच वर्षांपूर्वी पवार यांच्या पक्षाला सत्तास्थापनेचा कोणताही कौल जनतेने दिलेला नव्हता. तेव्हा आपल्या पक्षास सत्ता स्थापन करण्यात रस नाही, आपल्याकडे पुरेसे संख्याबळ नाही त्यामुळे आपण सत्ता स्थापन करू शकत नाही, अशी स्पष्टोक्ती त्यांनी केली होती. पुढे काही तासांतच, पवारांनीच आघाडीची मोट बांधण्यात पुढाकार घेत शिवसेना-भाजपाच्या नैसर्गिक युतीला कात्रजचा घाट दाखविला. पवार यांच्या राजकारणात कात्रजच्या घाटाचे महत्त्व मोठे आहे. मुंबईहून पुणेमार्गे बारामतीस जाताना कात्रजच्या घाटाचा वळणावळणाचा बिकट रस्ता पार करावा लागत असे, तेव्हापासूनच त्यांचा या मार्गावर एवढा प्रवास झाला आहे की, त्यामुळे या घाटातील प्रत्येक वळण त्यांना तोंडपाठ झाले आहे, असे गमतीने म्हटले जाते. यातील विनोदाचा भाग सोडला, तरी याच कात्रजच्या घाटाचा पवार यांनी राजकारणात बेमालून वापर केला. पवारांनी कात्रजचा घाट दाखविलेले अनेक नेते महाराष्ट्रात आजही आपल्या त्या अनुभवाची मनोमनी उजळणी करत असतात, असेही म्हटले जाते. भारतीय जनता पार्टीमध्ये असताना पवार यांच्या राजकारणावर आणि कारभारावर कोरडे ओढणारे काही नेते स्वपक्षातून बाहेर पडल्यावर पवार यांच्या वळचणीस गेले आणि तिथे त्यांना या कात्रजच्या घाटाचा चांगला अनुभवही आला, हे महाराष्ट्राने पाहिले आहे. म्हणूनच महाराष्ट्राला मार्गावर आणल्याखेरीज मी स्वस्थ बसणार नाही, असे पवार यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केले, तेव्हा आता त्यांची पुढची खेळी नेमकी कोणती असणार, महाराष्ट्राला नेमक्या कोणत्या मार्गावर नेण्याचा त्यांचा इरादा आहे आणि पवार यांना अपेक्षित असलेल्या मार्गाची नवी दिशा कोणती असेल अशा अनेक शंका त्यांच्या सहकाऱ्यांना व आघाडीतील अन्य नेत्यांप्रमाणेच सत्ताधारी युतीमधील काही नेत्यांच्या मनातही निश्चितच दाटल्या असतील. पवार यांना राजकारणाचा सहा दशकांहूनही अधिक काळाचा अनुभव असल्याने व त्यांचे राजकारण बहुशः महाराष्ट्रातच पोसलेले असल्याने, त्या राजकारणात महाराष्ट्राचा मार्ग कोणता होता, आता महाराष्ट्र कोणत्या मार्गावर आहे आणि पुन्हा त्यास मार्गावर आणण्याचा हा इरादा महाराष्ट्रास कोणत्या नव्या मार्गावर नेणार, असे अनेक प्रश्न आता परस्परांस विचारले जाऊ लागले आहेत. या राजकारणात त्यांचे सहकारी पक्ष त्यांना कशी साथ देणार आहेत, याची पुरेशी स्पष्टता झालेली नाही. स्वतः पवार हे निवडणुकीच्या राजकारणात उतरले असले, तरी त्यानंतरच्या सत्ताकारणात मात्र त्यांना महाविकास आघाडीच्या सल्लागाराचीच भूमिका पार पाडावी लागणार आहे, हे स्पष्ट आहे. सर्वाधिक वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविलेल्या या नेत्यास आपल्या पक्षाची स्वबळावर सत्ता स्थापन करणे केव्हाच साध्य झालेले नव्हते आणि सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदावर असताना महाराष्ट्राचा मार्ग वेळोवेळी कसा भरकटला होता, तेही महाराष्ट्राने अनुभवलेले आहे. मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या जखमा अजूनही सामान्य माणसाच्या मनात ओल्या आहेत; प्रत्यक्षात घडलेल्या त्या घटनांच्या संख्येत एकाची भर घालून जनतेची दिशाभूल करण्याच्या त्यांच्या अजब तर्कटातून त्या वेळी त्यांनी नेमके काय साधले, हे आजही त्यांना पटवून देता येत नाही. अशा अनेक भूमिकांतून पवार यांच्या राजकारणाची संदिग्धता आणि महाराष्ट्राचा मार्ग भरकटविण्याची नीती उघड झालेली आहे.

गोवारी समाजाच्या मागण्यांसाठी या समाजाने केलेल्या आंदोलनाच्या आठवणी अजूनही महाराष्ट्राच्या मनात वेदनेप्रमाणे ठसठसत आहेत. येत्या २३ नोव्हेंबरला महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांची मतमोजणी सुरू होईल; नेमक्या त्याच दिवशी त्या दुर्दैवी घटनेस ३० वर्षे पूर्ण झालेली असतील. २३ नोव्हेंबर १९९४ या दिवशी नागपूरला विधिमंडळ अधिवेशनात आरक्षणाच्या मागणीला वाचा फोडण्यासाठी गोवारी समाजाचे शेकडो आंदोलक नागपुरात दाखल झाले होते, पण सरकारने त्या आंदोलनाची वेळीच दखल घेतली नव्हती. संध्याकाळच्या वेळी विजेची एक जिवंत तार तुटून आंदोलकांच्या अंगावर पडल्याचे निमित्त होऊन अनेक आंदोलक होरपळले आणि झालेल्या गोंधळात गोळीबाराचेही आवाज मिसळले. हक्क मिळविण्याच्या मागणीसाठी आलेल्या ११४ गोवारी बांधवांनी आपल्या रक्ताचे शिंपण करून दिलेल्या त्या लढ्याची साधी दखलही तातडीने घेतली गेली नव्हती, अशी खंत आजही अनेक जण व्यक्त करतात. महाराष्ट्र कोणत्या मार्गावर चालला आहे, याची चिंता त्या घटनेनंतर गडद झाली, तेव्हा पवार हेच राज्याचे सर्वेसर्वा होते आणि ही दुर्घटना घडल्याचे उभ्या राज्यास कळल्यानंतरही ते तातडीने मुंबईकडे निघण्यासाठी विमानतळावर रवाना झाले होते. त्या दुर्दैवी घटनेचे वर्णन 'हत्याकांड' असेच अजूनही केले जाते. महाराष्ट्राला मार्गावर आणण्याच्या आणाभाका घेणाऱ्या नेत्यांच्या कारकीर्दीत राज्याचा मार्ग कसा भरकटला होता, याची अनेक उदाहरणे विरोधक उघडपणे देतात आणि त्यांच्या आतल्या गोटातील नेते कुजबुजत्या सुरात देतात. म्हणूनच महाराष्ट्राला मार्गावर आणल्याखेरीज मी स्वस्थ बसणार नाही, असे शरद पवार यांनी जाहीर केले, तेव्हा अनेकांच्या हृदयाची धडधड वाढली.

राजकारणात सावधपणा हे मोठे अस्त्र असते. शरद पवार यांना समजून घेण्यासाठी शंभर जन्म घ्यावे लागतील, असे संजय राऊत एकदा म्हणाले होते. भारतीय जनता पार्टीचे तत्कालीन अध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांनी तर पवार यांच्या राजनीतीवर पीएचडी करण्याचा इरादाही बोलून दाखविला होता. त्यामुळे त्यांच्या राजकीय उक्ती वा कृतींची अनाकलनीयता अनेकांनी बिनशर्तपणे मान्य केलेली असल्याने महाराष्ट्राला मार्गावर आणण्याची त्यांची नवी खेळी महाविकास आघाडीच्या पंचनाम्याच्या मार्गातून पुढे जाणार की महाराष्ट्राकरिता ते आपला स्वतंत्र मार्ग आखणार, याकडे महाविकास आघाडीचे लक्ष लागणे साहजिकच आहे. याच आघाडीने अलिकडेच सत्ताधारी महायुतीच्या कारभारावर टीका करून निवडणुकीचा नारळ फोडला. पंचनामा म्हणून जे काही मुद्दे याद्वारे पुढे आणले गेले, त्याची विश्वासार्हता पवार यांच्या राजकारणासारखीच आहे. कोणतीही एखादी बाब वारंवार मतदारांच्या मनावर बिंबविली तर ती खोटी असूनही खरी वाटू लागते व संभ्रम तयार होतो, ही नीती लोकसभा निवडणुकीच्या काळात बेमालूमपणे वापरण्यात राजकीय पक्षांना यश आले होते. त्या पंचनाम्याचा मुखवटा याच नीतीवर बेतलेला असल्याने संभ्रम माजविणे हीच नीती नव्या निवडणुकीसाठी समोर आणली जाईल, अशीच चिन्हे दिसत आहेत. दुसरीकडे महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या महायुतीने गेल्या अडीच वर्षांच्या आपल्या कारकीर्दीचे प्रगती पुस्तकच जनतेसमोर ठेवले आहे. त्यातील वास्तविकता तपासण्याकरिता मतदारास लांब जावे लागत नाही. ज्याचा लाभार्थी म्हणून जे स्वानुभवातून प्रत्यक्ष अनुभवता येते, अशा अनेक बाबी प्रगती पुस्तकात मांडल्या गेल्या आहेत. एका बाजूला महायुतीने निवडणुकीच्या प्रचारासाठी विकासाच्या मुद्याचा मार्ग निवडलेला असताना दुसरीकडे संभ्रम माजविण्याचा मार्ग आखण्याची तयारी सुरू झालेली दिसते. म्हणूनच महाराष्ट्राला त्या मार्गावर आणल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही या भूमिकेचा अर्थ मतदारांनीच वेळीच ओळखायला हवा.

जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

महाभारत ते भारत (६)

चक्रवर्ती सम्राट भरताच्या भारताची द्वापारयुगात एक आणि कलियुगात एक अशा दोन फाळण्या झाल्यात. द्वापारयुगात 'हस्तिनापूर' आणि 'इंद्रप्रस्थ' अशी दोन राज्ये निर्माण झाली होती. आधुनिक भारतात हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशी दोन राज्ये निर्माण झाली आहेत. आपसात सलोखा राहावा, अखंड संघर्ष असू नये, प्रत्येकाला त्याच्या कल्पनेप्रमाणे, परंपरेप्रमाणे, धर्माप्रमाणे राज्य कारभार करता यावा, प्रगती करता यावी या शुद्ध हेतूने वरील दोन्ही घटना घडल्यात वा घडविण्यात आल्यात, असे आपण म्हणू. पण याने आसुरी संपदेच्या दुष्ट, दूषित महत्त्वाकांक्षी 'धृतराष्ट्री' मनोवृत्तीत काही फरक पडला काय, या प्रश्नाबाबत महाभारताचे आणि आधुनिक भारताचे उत्तर नकारात्मकच आहे. कारण स्वत:शिवाय इतरांचे अस्तित्वच न मानणे, त्यांचे राज्य, संपत्ती, मुलींचा अपहार करणे, त्यांना नष्ट करणे वा धर्मांतरित करणे हाच जर या वृत्तीचा स्थायीभाव असेल तर त्यांच्याकडून चांगूलपणाची अपेक्षा ठेवणेच व्यर्थ आहे. दोन्ही युगातील ऐतिहासिक वाटचालीने हे सत्य अधोरेखित केले आहे.

कुत्र्याचे शेपूट वाकडेच! : 'कुत्र्याचे शेपूट शेवटी वाकडेच राहते,' अशी एक म्हण आहे. स्वामी विवेकानंदांनी याचे वेगळ्या संदर्भात विवेचन करताना असे म्हटले आहे की, कुत्र्याचे शेपूट तुम्ही कितीही प्रयत्न करा ते वाकडेच राहते. त्याला सरळ करण्यासाठी तुम्ही त्याला एखाद्या नळीत महिनाभर ठेवा, पण ती नळी काढताच पुन्हा जसेच्या तसेच वाकडे झालेले तुम्हाला ते आढळेल. कारण वाकडेपण हा त्याचा 'स्वभाव' आहे आणि 'स्वभावो दुरतिक्रमः' असतो, हा प्रकृतीचा नियम आहे. त्याला अनुसरून कौरवांनी सत्य वचनी, सोशिक, सात्त्विक पांडवांना वनातही त्रास दिलाच ना? 'मृगये'च्या निमित्ताने मुद्दाम वनात जाणे, त्यांच्यासमोर वैभवाचे प्रदर्शन करून हिणवणे, डिवचणे, मुद्दाम शीघ्रकोपी दुर्वास मुनींना त्यांच्या शेकडो शिष्यांसह भिक्षेला पाठविणे इत्यादी; त्याचप्रमाणे विभाजनानंतर भारताच्या बाबतीत पांडवांप्रमाणे सोशिक, सोज्वळ, सात्त्विक असलेल्या हिंदूंवर अत्याचार करणे, जाळपोळ, लुटालूट, कत्तल करून पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून त्यांना निर्वासित करणे, कबालियांच्या निमित्ताने आक्रमण करून काश्मीरचा भाग हडपणे, भारतावर तीन युद्धे लादणे, दहशतवादी हल्ले करणे या सर्व गोष्टी काळ भिन्न असला, युग भिन्न असले, तरी एकाच 'वृत्ती'च्या निदर्शक आहेत. त्या दोन्ही वृत्तींचा ध्येयवाद एकच आहे. पूर्व युगातील ध्येयवाद निदर्शक घोषणा होती- 'हंसके लिया हस्तिनापूर, लढके लेंगे इंद्रप्रस्थ.' आजचा त्यांचा ध्येयवाद आहे- 'हंसके लिया पाकिस्तान, लढके लेंगे हिंदुस्तान.' असा हा 'महाभारत ते भारत'- धृतराष्ट्री मनोवृत्तीचा सुडाचा प्रवास आहे. कौरव-पांडवांमध्ये सलोखा व्हावा यासाठी विदुरापासून तो भीष्माचार्यापर्यंत आणि वेदव्यासांपासून तो भगवान श्रीकृष्णांपर्यंत अनेकांनी मनापासून प्रामाणिक प्रयत्न केले. भगवान श्रीकृष्णांनी तर शेवटच्या शिष्टाईच्या वेळी पांडवांच्या वतीने फक्त पाचच गावांची मागणी केली होती, पण दुर्योधनी वृत्तीने ती धुडकावून तर लावलीच; त्याचबरोबर सुईच्या अग्रावर मावेल इतकी भूमीदेखील तुम्हाला मिळणार नाही म्हणून धमकावले व अपमानित करून घालवून दिले. तसलाच प्रकार आधुनिक भारतातही घडलेला आपल्याला दिसतो.

काँग्रेसच्या स्थापनेपासूनच विभाजनाची तयारी : भारताच्या स्वातंत्र्यासाठी सनदशीर पद्धतीने, अहिंसात्मक मार्गाने प्रयत्न करण्यासाठी सन १८८५ मध्ये काँग्रेसची अधिकृत स्थापना झाली. स्वातंत्र्य आंदोलनाच्या स्थापनेपासूनच काँग्रेसने मुसलमानांच्या बाबतीत कसलाही दुजाभाव ठेवला नव्हता. त्याचे प्रतिबिंब काँग्रेसच्या १८८५ च्या अधिवेशनात उमटले. सर्वधर्मसमभावाच्या उदात्त हेतूने या अधिवेशनात 'हिंदू राष्ट्र' याऐवजी हिंदी राष्ट्रीय ऐक्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे हिंदू आणि मुस्लिम या दोन जमातींचे ऐक्य होईल आणि आपल्या देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात त्यांचा सहयोग घेता येईल, हा त्या मागचा एक चांगला उद्देश होता. पण प्रारंभापासूनच अलगाववादी (सेपरेटिस्ट) मनोवृत्तीच्या मुस्लिम पुढाऱ्यांनी त्याला कडाडून विरोध केला. अलिगड युनिव्हर्सिटीचे संस्थापक सर सय्यद अहमद म्हणाले- हिंदुस्थानात राहणाऱ्या विभिन्न जातीचे व पंथाचे लोक एकाच राष्ट्राचे आहेत, हे मला अजिबात मान्य नाही. अशी धारणा असलेल्या नॅशनल काँग्रेसला माझा विरोध आहे. कारण काँग्रेसची उभारणी हिंदुस्थानला एक राष्ट्र समजण्याच्या खोट्या पायावर झाली आहे. २४ जानेवारी १८८८ तेव्हापासूनच द्विराष्ट्र सिद्धांताचे विषारी बी पेरले गेले आणि त्याला पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान ही घवघवीत पण धृतराष्ट्री मनोवृत्तीची कटु फळे आलीत. सन १९४७ च्या फाळणीच्या वेळी दोन्ही प्रदेशांतील हिंदूंची त्या जहरी, जिहादी, विषारी ज्वाळांमध्ये होरपळ झाली. आज बंगालमध्ये तेच घडते आहे. त्यांचा ध्येयवाद स्पष्ट आहे. या निमित्ताने त्यांना बंगाल निर्हिंदू-काफररहित करून 'दारूल सल्तनत'चे दारूल इस्लाम करायचे आहे. सर्व हिंदूंना निर्वासित करून भारतात हाकलून द्यायचे आहे, नाहीतर धर्मांतरित करून आपली संख्यावृद्धी करायची आहे.

पाकिस्तान प्रेरणेचा इतिहास : सन १९३० च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात अध्यक्षीय समारोपात सर अहमद इक्बाल यांनी पंजाब, सरहद्द प्रांत, सिंध आणि बलुचिस्तान यांचे मिळून एक राज्य निर्माण करावे, अशी संकल्पना मांडली. त्यांच्या त्या कल्पनेला केम्ब्रिजमध्ये शिकत असलेल्या रहिमत अली या तरुणाने लगेच कागदावर जणू नकाशाच्या रूपाने रेखाटले आणि त्याचे नामाभिधानही करून टाकले 'पाकिस्तान!' पी फॉर पंजाब, अ फॉर अफगाणिस्तान, के फॉर काश्मीर, एस फॉर सिंध आणि 'स्तान' फॉर बस्तुचिस्तान मिळून मुस्लिमांची पुण्यभूमी - पाकिस्तान! आणि हिंदुस्तान म्हणजे काफरांची भूमी, दारूल हरब. त्याला 'दारूल सल्तनत करणे, गजवा-ए-हिंदुस्तान' त्यासाठी मुल्ला-मौलवी घसे ताणून, आरडाओरडा करीत अखंड किंचाळत असतात- 'हे अल्ला के बंदो! उठो हात में अवजार लो, हमने आठसौ वर्ष भारतपर राज किया है, वह फिरसे हांसील करो।' (बांगलादेशमधील एका मौलवीचे भाषण) आणि भरतवंशीय भारतवासी म्हणजे हिंदू समाज अजूनही आपल्या 'योगनिद्रे'तून जागा व्हायला तयार नाही. सन १९३० च्या ठिणगीचा 'वणवा' झाला. देशाची फाळणी झाली. त्या वणव्यात लक्षावधी हिंदूंची होरपळ झाली. आजही त्याचे चटके सहन करीत हिंदू समाज भीतिग्रस्त भावनेने जगतच आहे.

ही अवस्था हिंदू समाजाने आपणहून ओढून घेतली आहे. सहस्रावधी वर्षे त्यांनी राष्ट्रधर्माकडे, समाजधर्माकडे नुसते दुर्लक्षच नव्हे, तर त्याची उपेक्षा, अवहेलना, टिंगलटवाळीच केली आहे. महर्षी व्यासांनी महाभारताच्या उपसंहारात कळवळून याबाबत इशारा देताना म्हटले आहे की- 'ऊर्ध्वबाहू' करून मी अखंडपणे तुम्हाला सांगून राहिलो आहे की, 'बाबांनो या (राष्ट्र-समाज) धर्माची उपासना करा. त्यानेच तुम्हाला अर्थशक्ती, सुरक्षितता जगात मान्यता प्राप्त होईल. शत्रू-मित्र विवेकाची प्राप्ती होईल. तुमची राजधानी सुरक्षित राहील. तुमच्या समाजातील द्रौपदीसारख्या मातृशक्तीच्या वस्त्राला हात घालण्याची हिंमत कुठलाही दु:शासन करणार नाही.' पण लक्षात कोण घेतो?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

वेध

संजय रामगिरवार

म्हणे, आम्ही खनिज विकास निधी देतो कशासाठी?

चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या संख्येत कोळशाच्या आणि लाईमस्टोनच्या खाणी तसेच अन्य खनिज उद्योगही आहेत. या उद्योगांच्या २० किलोमीटर परिघात प्रदूषण नियंत्रणाची आणि विकासाची कामे व्हावी, असे अपेक्षित आहे. त्यासाठी या जिल्ह्याला खनिज विकास निधी मिळतो. अन्य खनिज उद्योगांसह सर्वात मोठे क्षेत्र असलेली वेकोलिसुद्धा या निधीत आपला वाटा देते. मात्र, या खाणीच्या परिसरात असलेल्या इरई व झरपट नदीच्या प्रदूषणाचा विषय चव्हाट्यावर आहे. तशी जनहित याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल असून त्यावरील सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे सध्या हा विषय ऐरणीवर आहे. आम्ही रॉयल्टी देतो, त्याचे तुम्ही काय करता, असा अजब प्रश्न वेकोलिने जिल्हा प्रशासनाला न्यायालयात सादर केलेल्या अहवालाद्वारे विचारल्याचे यानिमित्ताने पुढे आले आहे. खरे तर, हा प्रश्न औचित्यपूर्ण नसला तरी तो गंभीर चिंता व्यक्त करणारा आहे कारण रॉयल्टी देणे म्हणजे प्रदूषण पसरवण्याचा परवाना मिळविणे नव्हे, हेच मुळात समजून घेण्याची गरज आहे. तसा प्रतिप्रश्नही ज्यांनी जनहित याचिका दाखल केली ते माजी खासदार नरेश पुगलिया यांनी जाहीरपणे केला आहे.

या खनिज निधीच्या वापराचा विषय या निमित्ताने पुढे आला ते बरेच झाले. कारण सन २०२३-२४ या वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात ६९३ कोटी रुपयांचा खनिज विकास निधी शिल्लक आहे. खाणींच्या २० किलोमीटरच्या अंतरात त्याचा वापर होणे आवश्यक असताना या निधीच्या वापराची दिशाच चुकली की काय, असा दुसरा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

इरई नदीच्या परिसरात वेकोलिच्या बऱ्याच खाणी आहेत. त्या खाणींच्या ओव्हरबर्डनमुळे या नदीचे पात्र निमुळते झाले असून नदीची खोलीही प्रभावित झाली आहे, असे मत खुद्द महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभाग, जल बांधकाम विभाग, चंद्रपूरचे पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिकेचे आयुक्त, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड तसेच चंद्रपूरचे जिल्हाधिकारी यांनीच व्यक्त केल्याने या विषयाकडे गंभीरतेने बघणे आवश्यक आहे. असे असताना, आम्ही रॉयल्टी देतो; त्यातून तुम्ही नदीचे प्रदूषण नियंत्रित का करीत नाही, असा प्रश्न वेकोलि व्यवस्थापकाने विचारणे म्हणजे खूपच झाले. खरेच रॉयल्टी निधी म्हणजे, प्रदूषण पसरवण्याचा परवाना आहे का, या प्रश्नावर गंभीरपणे चिंतन होणे गरजेचे आहे.

रॉयल्टी देणे किंवा सीएसआर निधीतून परिसरातील विकास कामे करणे हे खाण व्यवस्थापनाचे कर्तव्यच आहे. निधी देऊन ते काही मेहरबानी करीत नाहीत. हे खरे आहे की, खनिज विकास निधीतून खाणीच्या २० किलोमीटर परिसरात विकासाची, प्रदूषण नियंत्रणाची व नदीच्या पाण्याची पातळी अबाधित राखण्याची कामे व्हायलाच हवी, पण अनेकदा ते होत नाही. आता मात्र चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी न्यायालयात दिलेल्या अहवालातून इरई नदीचे प्रदूषण दूर करण्यासाठी अल्प व दीर्घकालीन सूचना सुचविल्या आहेत. इरईच्या वर्धा नदी संगमापर्यंतच्या १६ किमी लांबीमध्ये झुडपे व गाळ काढून नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करणे. नदीकाठच्या वस्त्यांमध्ये आणि खाली जमिनीवर यापुढे कोणतेही बांधकाम होणार नाही, याची अंमलबजावणी करणे. खाणीतून उत्खनन केलेली माती इरई नदीच्या लाल रेषेबाहेर टाकणे, त्या मातीवर झाडे लावणे यासह अनेक अल्पकालीन सूचना त्यांनी सुचवल्या. त्यावर तातडीने काम व्हावी, अशी अपेक्षा न्यायालयानेही व्यक्त केली. त्यामुळे या जनहित याचिकेच्या निमित्ताने का होईना, ही सगळी कामे व्हावी आणि या नदीच्या प्रदूषणाचा, पर्यायाने खाण परिसरातील प्रदूषणाचा विषय निकाली निघावा, अशी अपेक्षा करणे गैर नाही. २०१६-१७ पासून १२९१.०२ कोटींची रॉयल्टी जमा केली आणि ३१५.४९३ कोटींचे योगदान जिल्हा खाण निधीमध्ये दिल्याचा दावा वेकोलिने केला आहे. ही रक्कम राज्य सरकारकडे जमा करण्यात आली असली, तरी या निधीचा सरकारने वापर केला आहे की नाही, हे वेकोलिला माहीत नसल्याचे त्यांनी अहवालात नमूद केले आहे. वादी आणि प्रतिवादींच्या या युक्तिवादात इरई नदी मात्र गुदमरत आहे. चंद्रपूर महानगराची जलवाहिनी असलेली ही नदी आपल्या अस्तित्वासाठी वर्षोन्वर्ष संघर्ष करीत आहे. 'माझा नाला होऊ देऊ नका होऽऽऽ' असा आक्रोश करीत आहे. तो शासन, प्रशासन आणि प्रदूषण पसरवणाऱ्या खाण व्यवस्थापनाच्या कानावर पडत असेल का, हाच मुळात चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

९८८१७१७८३२

प्रासंगिक

मोरेश्वर बडगे

...आता शंखनाद झाला आहे!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. २० नोव्हेंबरला निवडणूक आहे आणि २३ तारखेला निकाल हाती येतील. सत्तारूढ महायुती आणि विरोधी महाविकास आघाडींमध्ये होणाऱ्या या बहुपक्षीय निवडणुकीकडे महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचेही लक्ष लागलेले आहे. महाराष्ट्राची निवडणूक या आधी कधीही एवढी चुरशीची झालेली नव्हती. यंदा राजकारण तर आहेच; सामाजिकदृष्ट्या कप्पे-कंगोऱ्यांची म्हणून या निवडणुकीबद्दल प्रचंड उत्सुकतादेखील आहे. अनेकांच्या राजकीय अस्तित्वाचा निकाल लावणारी ही निवडणूक असेल. या निवडणुकीत युती-आघाडीने मुख्यमंत्रिपदाचा चेहरा दिलेला नाही. चेहरा मागणारे उद्धव ठाकरे सध्या हार्ट पेशंट आहेत. त्यामुळे ठाकरे प्रचाराच्या रणधुमाळीत उतरण्याची शक्यता कमीच आहे. शरद पवार जुन्या भंगार नेत्यांच्या शोधात वणवण फिरताहेत. राहिला काँग्रेसचा प्रश्न. हरयाणात लागलेल्या शॉकमधून काँग्रेसला अजून स्वत:ला सावरता आलेले नाही. महायुतीशी दोन हात करायला मैदानात आहे कोण? विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्याच्या जेमतेम तीन दिवस आधी निकाल लागणार आहेत. त्यामुळे नवे सरकार स्थापन करण्यासाठी केवळ तीन दिवस मिळू शकतील. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक वादळे आली. भाजपा आणि शिवसेना युतीने गेली निवडणूक जिंकली होती. मात्र, निकालानंतर उद्धव ठाकरे हे काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या मांडीवर बसले. आता उद्धव त्यांच्या पायाशी आहेत तो भाग वेगळा. अडीच वर्षांतच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत बंड झाले. एकनाथ शिंदे ४० आमदार घेऊन बाहेर पडले. भाजपाने शिंदेंकडे मुख्यमंत्रिपद देऊन महायुतीचे सरकार बनवले. दीड वर्षापूर्वी अजित पवार यांनी आपले काका शरद पवार यांच्या विरोधात बंड केले. अजितदादाही महायुतीत आले. त्यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले. दोन-दोन बंड महाराष्ट्राने पाहिले. राजकारणाची पातळी प्रचंड खालावली. नवनव्या शिव्या ऐकायला मिळाल्या. सामान्य माणूस या वातावरणाला कंटाळला आहे. सोबत लढायचे, नंतर फोडाफोडी करायची, कसेही करून सत्ता मिळवायची या मानसिकतेचा लोकांना वीट आला आहे. मतदानाचा पूर्वीसारखा उत्साह राहिलेला नाही. सरळ, सभ्य, प्रामाणिक राजकारणी लोकांना आवडत नाहीत का? आवडत असेल तर राजकारणाचा सध्याचा माहोल बदलण्याची संधी या निवडणुकीने चालत आली आहे.

भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या घोषणेचे 'शंखनाद' या शब्दात स्वागत केले आहे. हा शंखनाद आहे स्वार्थी, ढोंगी, नाटकी राजकारण्यांच्या विरोधात. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी 'फेक नॅरेटिव्ह' चालवला. देशाची घटना बदलवण्यासाठी नरेंद्र मोदींना चारसो पार जागा हव्या आहेत, असा प्रचार केला. आता महायुती सरकारने आणलेल्या योजनांची टिंगलटवाळी चालवली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणून सरकारने महिलांना दरमहा १५०० रुपये पाठवणे सुरू केले आहे. तुम्ही लिहून ठेवा, ही एकटी योजना महायुती सरकारला पुन्हा एकदा सत्तेत पोहोचवणार आहे. सरकारने मुंबई प्रथमच टोलमुक्त केली आहे. या एका निर्णयाने ठाकरे सेनेला मुंबईमध्ये एखादी जागा जिंकतानाही दमछाक होणार आहे. पण विरोधकांची पोटदुखी वेगळी आहे. तिजोरी रिकामी केली अशी आदळआपट त्यांनी चालवली आहे. विरोधक किती गोंधळले आहेत, याचा हा नमुना आहे. खरेच रिकामी तिजोरी विरोधकांना मिळणार असेल तर शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन ते कसे देत आहेत? आम्ही सत्तेत येताच या सरकारच्या सगळ्या योजना रद्द करू, असे उबाठाचे सुप्रीमो उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्यात सांगितले. उद्धव ठाकरे यांची ख्याती मुळातच 'स्थगिती मुख्यमंत्री' अशी राहिली आहे. मुंबईमध्ये मेट्रो रेल्वेच्या आरे शेडच्या कामाला ठाकरेंनी स्थगिती दिली होती. शिंदे सरकारने ती उठवली आणि आज मेट्रो तिकडे धावताना दिसते आहे. त्यामुळे आता लोकांनी निर्णय करायचा आहे. स्थगिती सरकार आणायचे की मजबूत गतिमान सरकार आणायचे? एक सांगू का? लोकांचा निर्णय झाला आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा महायुतीला बुडवेल, असा मोठा विश्वास महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे. मनोज जरांगे पाटील गेली वर्षभर मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन चालवत आहेत. जरांगे पाटील कोणाच्या इशाऱ्यावर काम करीत आहेत, हे आता त्यांचेच लोक सांगत आहेत. फडणवीस यांच्या विरोधात जरांगे आग ओकतात. मात्र, शरद पवारांच्या विरोधात एक शब्द काढत नाहीत. याचा अर्थ स्पष्ट आहे. मराठ्यांना तसे आरक्षण कायद्याने देता येत नाही, दिले तर कोर्टात ते रद्द होईल हे नीट ठावूक असताना जरांगे का हट्टाला पेटले आहेत? आता ते बाहेर येत आहे. २० तारखेला मराठा समाजाची बैठक आहे. त्यात लढायचे की पडायचे, याचा निर्णय होईल. निर्णय काय होणार? जो व्हायचा, तो आधीच ठरला आहे. मला शरद पवारांचे आश्चर्य वाटते. स्वत:च्या मुलीला महाराष्ट्राची पहिली महिला मुख्यमंत्री करायच्या नादात किती वाहवत गेले आहेत शरद पवार? पवार यांचे वय आज ८४ वर्षे आहे. पण आपण ९० व्या वर्षापर्यंत थांबणार नाही, असे नुकतेच ते बोलले. महाराष्ट्राचा चेहरामोहरा मला बदलायचा आहे, असे पवार म्हणाले. मग गेली ६० वर्षे चलती होती तेव्हा पवारांनी काय आलू छिलले? आता चेहरामोहरा बदलणार म्हणजे महाराष्ट्राला कुठल्या ब्युटी पार्लरमध्ये नेणार? भंकसगिरी आहे. स्वतःचा सांगता येईल असा या पवारांचा एकही ड्रिम प्रोजेक्ट नाही. महायुतीचे लोक काही करताहेत तर त्याबद्दलही त्यांना असूया आहे. आतली गोष्ट सांगतो. उद्धव ठाकरे आता शरद पवारांच्या मनातून उतरले आहेत. पवारांना देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री होऊ द्यायचे नव्हते. त्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवून गेम केला. मात्र, आता शरद पवार उद्धव यांना मोजायला तयार नाहीत. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा महाविकास आघाडीने जाहीर करावा, असा हट्ट उद्धव यांनी खूप लावून धरला. पण शरद पवारांनी भीक घातली नाही. कसे घालतील? थोरल्या काकां

आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे करा –जिल्हाधिकारी पाठक

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ साठी भारत निवडणूक आयोगातर्फे राज्यात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम (ता.१५) घोषित करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात निवडणुकीची आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या दृष्टीने आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आदर्श आचारसंहिताबाबत सर्व कार्यालय प्रमुख, पथक प्रमुखांची बैठक श्री. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, बीड विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, एनआयसीचे वरिष्ठ वैज्ञानिक भाऊसाहेब बांगर यांची उपस्थिती होती. आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून पहिल्या २४, ४८ व ७२ तासांत करावयाच्या कार्यवाहीबाबत, नेमण्यात आलेल्या विविध पथकांकडून करावयाच्या कार्यवाही बाबतचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी पाठक यांनी घेतला. त्याचबरोबर आदशर् आचारसंहितेचे पालन करणे, विविध कार्यान्वित पथके आणि त्यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत आवश्यक त्या सूचनाही सर्व अधिकाऱ्यांना श्री. पाठक यांनी केल्या. श्रीमती जाधव, श्री. सूर्यवंशी, श्री. सोळंके यांनीही आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन उपस्थित सर्व कार्यालय प्रमुख, अधिकाऱ्यांना केले.

भोजराज पालीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भवानीनगर दुर्गोत्सव मंडळाचे सामाजिक कार्य कौतुकास्पद

कोजागिरी पोर्णिमेदिनी महाप्रसाद वितरण;३७ वर्षापासून उपक्रम सुरू

परळी वैजनाथ-भवानीनगर दुर्गोत्सव मंडळाचे संस्थापक आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. ३७ वर्षांपासून भाविकांना महाप्रसाद वितरण आणि विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. आज बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पोर्णिमादिवशी, मंडळाने हजारो भाविकांना महाप्रसादाचा वितरण केला. याबरोबरच, दांडीया, विविध स्पर्धा, आरोग्य शिबीर यांसारख्या उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष हरीश रामदेव पालीवाल, उपाध्यक्ष गणेश सुनील शिरसाठ, सचिव रवी केशरमल गोड, कोषाध्यक्ष राहुल अशोक उपाडे, कार्याध्यक्ष विजय अशोक जाधव, आणि संस्थापक सदस्य गजराज पालीवाल, महेश केंद्रे, डॉक्टर तुषार पिंपळे, संदीप चौधरी, बालासाहेब गवळी, महादेव इंगळे, राम आंधळे, विशाल सुगरे, ईश्वर मुंडे, कैलास जोगदंड, गोविंद मस्के, आदिनाथ जाधव, हनुमान सिताबराव, आणि यशराज पालीवाल यांनी विशेष मेहनत घेतली. या उपक्रमाला भवानीनगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि परळीकरांनी या सामाजिक कार्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. भवानीनगर दुर्गोत्सव मंडळाने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक योगदानाचे उदाहरण प्रकट केले आहे.

गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.१८ ऑक्टोबर

मराठवाड्यातील फार्मसी कॉलेजमधील नेहमीच विविध उपक्रमासाठी अग्रेसर असलेले गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माजलगाव यावेळेस विद्यार्थ्यांसाठी जॉब प्लेसमेंटचे आयोजन करत आहे. उत्तम शिक्षणा बरोबर कुशल विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी शिवशक्ती ग्री टेक लिमिटेड नांदेड या कंपनी मध्ये विविध पदांसाठी दि.२२/१०/२०२४ वार.मंगळवार वेळ ११:०० ते १:०० या दिवशी कॅम्पस प्लेसमेंट चे आयोजन करण्यात आले आहे. या पदासाठी कार्यक्षेत्र हे परभणी व बीड जिल्हा असेल. तसेच वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगासह भविष्य निर्वाह निधी, कौटुंबिक निवृत्ती वेतन, ए.ऊ.ख, वार्षिक बोनस, ग्रॅच्युइटी, मेडिक्लेम, अपघाती विमा,असेल. सदरील पदासाठी पदवीधर विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल तरी सर्वांना आवाहन करण्यात येते की या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

त्रिरत्न बौद्ध महासंघ माजलगाव च्या वतीने नवोदित धम्मचारी सत्कार व वर्षावास समारोपाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.१८ ऑक्टोबर

त्रिरत्न बौद्ध महासंघ या जागतिक धर्म चळवळीचे सदस्य म्हणून आपल्या माजलगावचे भूमिपुत्र धम्ममित्र बन्सी रणदिवे यांची धम्मचारी दीक्षा दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी उर्गेन संघरक्षित ध्यान भावना केंद्र वारकवाडी जिल्हा नांदेड येथे झाली आहे. त्यानिमित्त त्यांचा सत्कार समारंभ तसेच *भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म* या ग्रंथ वाचनाचा समारोप समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक,जय भीम नगर, माजलगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान धम्मचारी सत्यदीप (पुणे) हे भूषविणार आहेत. प्रवचन धमचारी मंजूचित्त (पनवेल) यांचे होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे धम्मचारी सामसिद्धी (पुणे) धम्मचारी ज्ञान संभव (पुणे) यांची उपस्थिती लाभणार आहे. दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी दुपारी १२:००वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक जय भीम नगर माजलगाव या ठिकाणी हा समारंभ पार पडणार असून. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांना भोजनदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्रिरत्न बौद्ध महासंघ माजलगावचे अध्यक्ष धम्मचारी अमोलरत्न सर्व धम्ममित्र आणि जय भीम नगर येथील महिला मंडळ यांनी केले आहे.

कलाम यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी उज्वल भविष्याकडे वाटचाल करावी; उपप्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जीवन व कार्य हे सर्वांना प्रेरणादायी असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी उज्वल भविष्याकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन उपप्राचार्य प्रा.डी. जी.निकाळजे यांनी केले. येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यलयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यलयाचे उपप्राचार्य प्रा.डी. जी.निकाळजे यांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके वाचनास उपलब्ध करून देण्यात आली. याप्रसंगी आइक्यूएसी समन्वयक डॉ.योगिता लांडगे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना उपप्राचार्य निकाळजे म्हणाले की, जास्तीत जास्त पुस्तकाचे वाचन केल्याने सामाजिक जाणिवा विकसित होतात. आज माहिती व तंत्रज्ञाच्या युगामध्ये माणूस इतका संकुचित बनला आहे कि त्याचे वाचनाकडे दुर्लक्ष झाले आहे. सोशल मीडिया माध्यमे चांगले आहेत मात्र ग्रंथालयात बसून वर्तमानपत्रे, नियतकालिके, प्रेरणादायी पुस्तके, स्पर्धा परीक्षांची पुस्तके याचे वाचन होण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले व वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

सौ.के.एस.के.महाविद्यालयात महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार घालून जयंती साजरी करण्यात आली

कर्मचारी प्रतिनिधी डॉ.पल्लवी इरलापल्ले यांनी यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना म्हणाल्या की,रामायण या महाकाव्याची रचना महर्षी वाल्मिकी ऋषी यांनी केली.ते एक महान लेखक होते. वाल्मिक यांचा जन्म अश्विन महिन्याच्या पोर्णिमेच्या दिवशी झाला होता.या दिवसाला हिंदू धार्मिक दिनदर्शिकेत वाल्मिकी जयंती म्हणतात.या वर्षी वाल्मिकी जयंती १७ ऑक्टोंबर रोजी साजरी करतात.महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनातून खूप काही शिकण्यासारखे आहे. त्यांचे व्यक्तिमत्व सामान्य नव्हते. त्यांच्या आयुष्यातील एका घटनेने प्रेरित होऊन त्यांनी आपल्या जीवनाचा मार्ग बदलला.त्यांनी महान ग्रंथ रामायणाची संस्कृत भाषेत निर्मिती केली असे यावेळी प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.पल्लवी इरलापल्ले यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.बळीराम राख यांनी केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,प्राचार्य ,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालींदर कोळेकर आदीसह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

९९९९ दिव्यानी कोजागरी पौर्णिमा निमित्त संतोषी माता, गायत्रीमाता व सर्व देवी देवतांची अदापुरे परिवारकडून महापूजा,आरती संपन्न

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

पेठ बीड येथील संतोषीमाता मंदीर येथे दर पोर्णीमेला सकाळी ८:४५ वा. राज्यमाता गौमातेची आरती होणार आहे.आज गुरुवार पोर्णिमेनिमित्त सकाळी ८ :३० ला सर्व गोभक्तांनी सहपरीवार गोमातेच्या आरतीसाठी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संतोषीमाता संस्थान बीड यांनी केले आहे.११११ दिव्यानी कोजागरी पौर्णिमा निमित्त संतोषी माता, गायत्रीमाता व सर्व देवी देवतांची पूजा व आरती अदापुरे परिवाराकडून संपन्न झाली याप्रसंगी परिसरातील महिला पुरुष भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. मंदिर समितीच्या वतीने उपस्थित भाविक भक्तांचे स्वागत करण्यात आले

काळा पैसा वापरला जात असल्यास माहिती देण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये काळा पैसा वापरला जात असल्याची माहिती, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल याबाबत विश्वसनीय माहिती असल्यास ती नि:संकोचपणे द्यावी, असे आवाहन नागपूरच्या आयकर प्रधान संचालक कार्यालयाचे आायकर उपसंचालक (तपास) अनिल खडसे यांनी केले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

माहिती पाठविण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-०३५५, १८००-२३३-०३५६, छायाचित्रे, व्हिडिओ इत्यादी पाठविण्यासाठी व्हाटसअप क्र. ९४०३३९०९८०, इमेल nagpur.addldit.invincometax.gov.in, nashik.addldit.invincometax.gov.in आहेत. निवडणुकी दरम्यान काळ्या पैशांचा वापर रोखण्यासाठी प्राप्तीकर विभागास सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

श्री क्षेत्र महाजनवाडी येथे फिरता नारळी श्री संतएकनाथ महारजकृत भावार्थ रामायण कथेला प्रारंभ

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

श्री क्षेत्र अयोध्याधाम येथील श्रीराम मंदीरास व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठेस येत्या २२ जानेवारी २०२५ ला एक वर्ष पुर्ण होत आहे. तरी श्री राम मंदीर व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून बीड तालुक्यातील श्री क्षेत्र महाजनवाडी येथे आजपासून महाराष्ट्रातील प्रथमच फिरता नारळी श्रीएकनाथ महाराजकृत भावार्थ रामायण कथेला प्रारंभ होत आहे. तसेच बीड जिल्ह्यातील ५१ गावातील श्री हनुमान मंदीरामध्ये प्रत्येक गावात शनिवार ते शनिवार असा आठ दिवस श्री भावार्थ रामायण कथा सोहळा संपन्न होत असून त्यामुळे प्रत्येक गावागावत भक्तीमय व प्रसन्न वातावरणाची निर्मिती होवून श्रीराम नामाचा गजर होईल.

गेली ५० वर्षापासून श्रीक्षेत्र महाजनवाडी येथे श्री भवार्थ रामायण कथेचे दरवर्षी नियमीत आयोजन करण्यात येते.यंदा मात्र श्री क्षेत्र अयोध्याधाम येथील श्रीराम मंदीर व प्रभु श्रीरामाच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिनाचे औचित्य साधून श्री भावार्थ रामायण सेवा समितीच्या वतीने फिरता नारळी श्री एकनाथमहाराजकृत भावार्थ रामायण कथेचा शुभारंभ अश्विन कृ.१ शुक्रवार दि.१८ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ठिक ७ वा. श्रीसंतएकनाथ महाराजांचे १४ वे वंशज श्री एकनाथ पदाश्रित ह.भ.प.पू योगीराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत श्री हनुमान मंदीर श्री क्षेत्र महाजनवाडी ता.जि.बीड येथे संपन्न होत आहे. तरी बीड जिल्ह्यातील रामायणाचार्य वाचक,सूचक व श्रीमराभक्त मंडळींनी मोठ्या संख्येने या फिरत्या नारळी श्रीएकनाथमहाराकृत भावार्थ रामायण कथेच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित रहावे. असे आवाहन श्री भावार्थ रामायण सेवा समिती व निमंत्रक विष्णूदासजी महाराज सुरवसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

जयंत पाटील यांच्याकडे महाराष्ट्राची जबाबदारी

◆ **इस्लामपूर, १८ ऑक्टोबर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले. मागील २४ दिवसांपासून सुरू असलेल्या शरद पवार गटाच्या शिवस्वराज्य संवाद यात्रेची सांगता जयंत पाटील यांचा बालेकिल्ला असलेल्या इस्लामपूर येथे बुधवारी सायंकाळी करण्यात आली. यावेळी पवार यांनी उपरोक्त संकेत दिले.

इस्लामपूरमध्ये आयोजित सभेत शरद पवार यांनी थेट जयंत पाटील यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करीत एकप्रकारे ते महाराष्ट्राचे नेतृत्व करतील, असे सांगितले. त्यामुळे महाविकास आघाडीत शरद पवार गटाकडून मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार ठरला असल्याची चर्चा रंगली आहे.

मागील काही दिवसांपासून काँग्रेस आणि ठाकरे गटात मुख्यमंत्रिपदावरून कलगीतुरा रंगला आहे. महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्यात यावा, अशी मागणी उबाठा गटाकडून सातत्याने केली जात आहे. उद्धव ठाकरे यांनीही, जो चेहरा जाहीर केला जाईल, त्याच्या पाठीशी आपण उभे राहू, अशी भूमिका घेतली आहे. शरद पवार गटाकडून मात्र भूमिका स्पष्ट करण्यात आली नव्हती. आता शरद पवार यांनी जयंत पाटील यांच्या रूपात एकप्रकारे चेहरा समोर आणला आहे. सभेला संबोधित करताना शरद पवार म्हणाले की, मला एका गोष्टीचा आनंद आहे की, आज जयंत पाटील ज्या पद्धतीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हिंडत आहेत, काम करीत आहेत, लोकांना विश्वास आणि दिलासा देत आहेत, त्यांच्या या प्रयत्नांच्या पाठीशी तरुण पिढी एका विचाराने निश्चित उभी राहील आणि जे स्वप्न आपल्या मनात महाराष्ट्राबद्दल आहे, त्याची पूर्तता झाल्याशिवाय राहणार नाही. मला आनंद आहे की, जयंत पाटलांसारख्याच्या नेतृत्वात उद्याचा महाराष्ट्र घडवण्याची जी आपण तयारी सुरू केली आहे त्याची जबाबदारी मी त्यांच्या खांद्यावर सोपवत आहे.

◀ *(वृत्तसंस्था)*

मविआत २०० जागांवर मतैक्य : शरद पवार

◆ **पुणे, १८ ऑक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ पैकी २०० जागांवर महाविकास आघाडीमध्ये मतैक्य झाले असल्याची माहिती ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गुरुवारी दिली.

सातारा जिल्ह्यातील कराड येथे ते पत्रकारांशी बोलत होते. हरयाणा विधानसभा निवडणुकीत जिंकण्याच्या स्थितीत असलेल्या काँग्रेसला भाजपाकडून आश्चर्यकारकरीत्या पराभव पत्करावा लागला. तथापि, या निकालाचा महाराष्ट्रातील निवडणुकीच्या निकालावर कोणताही परिणाम होणार नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

राज्यात विधानसभा निवडणुकीतील मविआच्या जागा वाटपात माझा प्रत्यक्ष सहभाग नाही. या प्रक्रियेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे माझ्या पक्षाचे नेतृत्व करीत आहेत. आतापर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार २८८ पैकी २०० जागांवर महाविकास आघाडीत मतैक्य झाले आहे, असे पवार यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

सातारा जिल्ह्यातील कोणती जागा तुमच्या पक्षाने मागितली आहे, असे विचारले असता, याबाबतचा निर्णय जयंत पाटील हेच घेणार आहेत.

सध्या आम्ही हरयाणा विधानसभा निवडणुकीतील आश्चर्यकारक निकालांचा अभ्यास करीत आहोत. त्याचवेळी आम्ही जम्मू-काश्मीर विधानसभा निकालांचेही विश्लेषण करीत आहोत. हरयाणातील निकाल धक्कादायक असेच होते. मात्र, त्याचा कुठलाही परिणाम महाराष्ट्रात होणार नाही, असे मी ठामपणे सांगू शकतो, असे पवार यांनी स्पष्ट केले. ◀ *(वृत्तसंस्था)*

लक्ष्मण ढोबळे शरद पवार गटात प्रवेश करणार?

सुप्रिया सुळेंच्या भेटीनंतर घडामोडींना वेग

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी गुरुवारी मुंबईत शरद पवार गटाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांची भेट घेतली. भाजपात आपल्याला डावलले जात असल्याची त्यांची भावना असून, भाजपातून बाहेर पडण्यासाठी त्यांचे समर्थक ढोबळे यांच्यावर दबाव आणत आहेत.



अशातच, ढोबळे यांनी सुप्रिया सुळे यांची भेट घेतल्याने ते लवकरच शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लक्ष्मण ढोबळे यांचा मुलगा अभिजित ढोबळे सध्या शरद पवार गटाकडून मोहोळ विधानसभेसाठी इच्छुक आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून लक्ष्मण ढोबळे शरद पवारांचे निकटवर्तीय म्हणून परिचित होते. नंतर त्यांनी भाजपात प्रवेश केला होता. आता पुन्हा लक्ष्मण ढोबळे शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले, अद्याप मी भाजपाचा राजीनामा दिलेला नाही. कार्यकर्त्यांनी माझ्यावर यासाठी दबाव आणला आहे. मी त्यांना दोन दिवसांचा वेळ मागितला असून, विचार करून निर्णय घेईल, असे ढोबळे म्हणाले. ◀ *(वृत्तसंस्था)*

मोहोळ विधानसभा मतदारसंघात चुरस वाढली

अभिजित ढोबळे यांनी विधानसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केल्यामुळे मोहोळ विधानसभा मतदारसंघात आता चुरस वाढली आहे. सध्या मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार यशवंत माने आहेत. ते अजित पवार गटाचे आमदार आहेत. यावेळीही अजित पवार गटाकडून यशवंत माने यांना तिकीट मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील आक्रमक झाले आहेत. त्यांनी यशवंत माने यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांनी शरद पवार यांची भेटही घेतली आहे. त्यामुळे मोहोळ तालुक्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ■

आचारसंहिता लागू झाल्यावर सरकारी विभागांनी हटवले जीआर

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्र सरकारच्या विविध विभागांनी अधिकृत संकेतस्थळावरून जीआर हटवले असल्याची माहिती आयोगाने दिली.

निवडणूक आयोगाची माहिती

निवडणूक आयोगाने राज्य विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केल्यानंतर मंगळवारी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतरही संकेतस्थळावर अनेक आदेश किंवा सरकारी ठराव टाकण्यात आले होते.

मंगळवारी साडेतीन वाजल्यानंतर संकेतस्थळावर टाकलेले जीआर हटवण्यात यावे, असे आम्ही विविध विभागांना सांगितले. मुख्य निवडणूक आयुक्तांनी राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा करताच आदर्श आचारसंहिता लागू झाली, त्या वेळेवर हे जीआर संकेतस्थळावर टाकण्यात आले होते, असे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुळकर्णी यांनी सांगितले.

हे जीआर केवळ संकेतस्थळावरून हटवण्यात येतील, ते मागे घेतले जाणार नाहीत आणि त्यांची छाननी केली जाईल. ज्या जीआरमुळे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत नसेल, ते राज्य सरकारच्या संकेतस्थळावर संबंधित विभाग टाकू शकतील, असे कुळकर्णी यांनी सांगितले. ◀ *(वृत्तसंस्था)*

सपामुळे वाढणार मविआची डोकेदुखी

◆ **लखनौ, १८ ऑक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक इंडिया आघाडीने एकत्र लढवावी, असा आमचा प्रयत्न असेल. आम्हाला जास्त जागा मिळण्याची अपेक्षा आहे. मी शुक्रवारी महाराष्ट्रात जाणार आहे. तिथे या मुद्यावर चर्चा होईल, असे समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी सांगितले. सूत्रांच्या मते, सपाचा महाराष्ट्रातील १० ते १२ जागांवर डोळा आहे.

यादव यांनी आज लखनौमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना, इंडिया आघाडी मजबुतीने एकत्र काम करत असल्याचे सांगितले. त्यांना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबत विचारले असता ते म्हणाले, मी शुक्रवारी मुंबईला जाणार आहे. इंडिया आघाडीत सहभागी होण्याचा आमचा प्रयत्न असेल. आमचे राज्यात दोन आमदार आहेत. आम्हाला आशा आहे की, यावेळी जास्त जागा मिळतील. आम्ही पूर्ण ताकदीने इंडिया आघाडीसोबत उभे राहू.

अखिलेश यादव आज मुंबईत

अबू आझमींचा महाविकास आघाडीला इशारा

महाविकास आघाडीतील नेत्यांनी समाजवादी पार्टीचा अपमान करू नये. आतापर्यंत महाविकास आघाडीच्या अनेक बैठका झाल्या. मात्र, सपाला फक्त एकाच बैठकीत बोलावण्यात आले. बैठकीत केवळ ५ मिनिटे चर्चा झाली. समाजवादी पार्टी हा देशातील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे, त्याला हलक्यात घेऊ नये. समाजवादी पार्टीला विश्वासात घेतले नाही आणि योग्य वाटा दिला नाही, तर समाजवादी पार्टीला इतर कोणत्याही आघाडीसोबत म्हणजेच तिसरी आघाडीसोबत जाणे भाग पडेल किंवा महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढवावी लागेल. यामुळे मतांची विभागणी झाली, तर त्याला समाजवादी पार्टी जबाबदार राहणार नाही, असा इशारा अबू आझमी यांनी दिला. ■

अखिलेश यादव दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. यादरम्यान त्यांचे मालेगाव आणि धुळे येथे कार्यक्रम होतील. यावरून उत्तरप्रदेशबाहेरही सपाचा विस्तार करण्याची अखिलेश यादव यांची भूमिका असल्याचे दिसून येते.

सपाचे राज्यात दोन आमदार

सध्या महाराष्ट्रात सपाचे दोन आमदार आहेत. त्यापैकी अबू आझमी हे शिवाजी नगरचे तर रईस शेख हे भिवंडीचे आमदार आहेत. अलिकडेच अखिलेश यादव यांनी लखनौमध्ये महाराष्ट्र युनिटच्या नेत्यांची बैठक घेतली होती, ज्यात निवडणुकीची रणनीती तयार करण्यात आली. ■

सपाचा महाराष्ट्रातील ज्या १०-१२ जागांवर डोळा आहे, त्यात त्या जागांचा समावेश आहे, जिथे मुस्लिम आणि परप्रांतातून येणारे लोक जास्त प्रमाणात राहतात. दरम्यान, महाविकास आघाडीत सपाला ३-४ जागा मिळू शकतात, अशी चर्चा आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

समीर वानखेडे निवडणुकीच्या रिंगणात!

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

राज्यात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू असतानाच आर्यन खान ड्रग्स प्रकरणी चर्चेत आलेले एनसीबीचे माजी अधिकारी समीर वानखेडे यांनी राजकारणात आपले भाग्य आजमावण्याचा निर्णय घेतला आहे. ते लवकरच शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता असून, त्यांना निवडणुकीचे तिकीट मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

समीर वानखेडे यांच्या पत्नी क्रांती रेडकर यांनी या बातमीला दुजोरा दिला आहे. ते आगामी काही दिवसांत शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

समीर वानखेडे सध्या चेन्नईत एनसीबी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. याआधी ते मुंबई एनसीबीचे विभागीय संचालक होते. आर्यन खान प्रकरणानंतर त्यांची चेन्नईत बदली करण्यात आली. समीर वानखेडे यांना समाजकारणात रस आहे. गेल्या काही वर्षांपासून ते समाजकारणात सक्रिय आहेत. त्यांनी अमली पदार्थविरोधी मोहीम राबवली. मुंबई आणि चेन्नईत ते समाजाला जागृत करण्याचे काम करीत आहेत. मुंबईतील तरुणांना अमली पदार्थांपासून वाचविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. राजकारणात येऊन मी हे काम अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतो आणि त्यामुळेच निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे ते सांगतात. ◀ *(वृत्तसंस्था)*

काही विद्यमान आमदारांना भाजपा तिकीट नाकारणार

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीत भाजपा अनेक विद्यमान आमदारांना तिकीट नाकारण्याची आणि नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता आहे.

ज्या आमदारांची कामगिरी सुमार राहिली, त्यांना भाजपा उमेदवारी देण्याची शक्यता नाही, असे सूत्रांनी सांगितले. मागील पाच वर्षांच्या काळात जे आमदार सक्रिय नव्हते, त्यांची यादी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे सोपविण्यात आली असून, त्यात राज्यातील काही बड्या नेत्यांची नावे असल्याचे सूत्रांनी सांगितले. या आमदारांना उमेदवारी नाकारून भाजपा त्यांच्या जागेवर नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

भाजपा आमदार आहेर यांची निवडणुकीतून माघार

कौटुंबिक कलह टाळण्यासाठी घेतला निर्णय

◆ **नाशिक, १८ ऑक्टोबर**

चांदवड-देवळा मतदारसंघातील भाजपाचे विद्यमान आमदार डॉ. राहुल आहेर यांनी निवडणुकीतून माघार घेतली. गेल्या काही दिवसांपासून राहुल आहेर यांचे बंधू केदा नाना आहेर निवडणूक लढवण्याची तयारी करीत होते. त्यामुळे राहुल आहेर यांची अडचण झाली होती. आता त्यांनी भावासाठी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. पक्षाने केदा नाना आहेर यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पत्रपरिषदेत आमदार राहुल आहेर म्हणाले की, मागील १० वर्षांत कुटुंब म्हणून पक्षाचे काम आम्ही केले. विधानसभा निवडणुकीत आम्ही या मतदारसंघात भाजपाचा झेंडा फडकवू. विरोधक यातही राजकारण करतील. राजकारणात आपण काम करतो, तेव्हा काही निर्णय घ्यावे लागतात. गेल्या २-३ आठवड्यांपासून पक्षात घालमेल सुरू झाली तेव्हा वरिष्ठांना आम्ही विनंती केली. मला निवडणूक लढवावी लागेल, असे पक्षाने सांगितले होते. परंतु, कुटुंब कलह होऊ नये, यासाठी आम्ही चर्चा करून निर्णय घेतला. आमच्या निर्णयाला पक्षाने मान्यता द्यावी. आपण सर्वांनी एकत्रित राहून महायुतीचा उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आणायचा आहे. प्रत्येक मतदारसंघात वातावरण तापायला सुरुवात झाली आहे. इच्छुक उमेदवार पक्षाकडे चाचपणी करीत आहेत. महिनाभरापासून चांदवड मतदारसंघात दादा उमेदवारी करणार की नाना, असा लोकांमध्ये संभ्रम होता. निवडणूक जवळ येत असताना हा संभ्रम आणखी वाढत होता. यातून बाहेर यायला हवे, यासाठी आज पत्रपरिषद बोलावली. आपल्या मतदारसंघात पर्याय देताना सर्वानुमते विचारविनिमय करून भूमिका घ्यायला हवी. १५ दिवस पक्ष नेतृत्वाला भेटत होतो. माझी भूमिका कायमच महायुतीचा उमेदवार विजयी झाला पाहिजे, अशी असल्याचे राहुल आहेर यांनी सांगितले.

आम्ही नेत्याकडे बघून राजकारण करतो. त्या नेत्याने महायुतीची सत्ता यावी यासाठी एका मिनिटांत मुख्यमंत्रिपद त्यागले. पक्षाने आदेश दिला म्हणून उपमुख्यमंत्रिपद घेतले. त्यानंतर अजित पवार गट महायुतीत सहभागी झाला, तेव्हा स्वत:चे उपमुख्यमंत्रिपद अर्धे केले. आमचा सर्वोच्च नेता स्वत:चे मुख्यमंत्रिपद त्यागतो, अशा देवेंद्र फडणवीसांसाठी आमदारकी त्यागायला आम्हाला १ मिनिटाचाही विलंब करण्याची गरज भासत नाही, असे राहुल आहेर यांनी सांगितले. ◀ *(वृत्तसंस्था)*

राजकारणापलीकडे कुटुंब

राजकारणापलीकडे कुटुंब असते, आम्ही चर्चेने हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राला नवीन संदेश जाईल. राजकारणात अनेक कुटुंब वेगळे होतात, पण नाशिक जिल्ह्यात आहेर कुटुंब आजही सत्तेच्या पलीकडे नाती, विचारधारा जपते, हा संदेश राज्यभरात जाईल, असे केदा आहेर म्हणाले. ■

बाबुलाल मरांडी झाले होते झारखंडचे पहिले मुख्यमंत्री

श्यामकांत जहागीरदार

◆ **नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

झारखंडमध्ये १३ आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात विधानसभा निवडणूक होत आहे. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना २००० मध्ये बिहारच्या दक्षिणेकडील काही जिल्हे मिळून झारखंड हे नवीन राज्य तयार करण्यात आले. यावेळी होत असलेली निवडणूक ही झारखंड विधानसभेची पाचवी आहे.

अविभाजित बिहार विधानसभेत ३२४ सदस्य होते. झारखंड राज्याची निर्मिती होण्याच्या आधीच बिहार विधानसभेची निवडणूक झाली होती. त्यामुळे झारखंड हे वेगळे राज्य झाल्यानंतर बिहार विधानसभेवर निवडून आलेले ८१ आमदार पहिल्या झारखंड विधानसभेचे अविरोध सदस्य झाले. झारखंड विधानसभेसाठी पुन्हा वेगळी निवडणूक त्यावेळी घेण्यात आली नव्हती. एका आमदाराची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्यपालांना होता, त्यामुळे झारखंड विधानसभेची सदस्यसंख्या ८२ होती.

झारखंड राज्य अस्तित्वात आल्यानंतर राज्यात त्रिशंकू विधानसभेसारखी स्थिती होती. कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नव्हते. भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला होता. त्यामुळे भाजपाने राज्यातील काही छोटे पक्ष आणि अपक्षांच्या पाठिंब्याने राज्यातील आपले पहिले सरकार स्थापन केले.

भाजपाजवळ ३२ आमदार होते. समता पक्षाच्या ५ तर जदयुच्या ३ आमदारांच्या पाठिंब्याने भाजपाने बहुमताच्या जवळ जाणारा ४० चा आकडा गाठला आणि सरकार स्थापन केले. झारखंड मुक्ती मोर्चाचे १२, काँग्रेसचे ११ तर राजदचे ९ आमदार होते. भाकपचेही ३ आमदार निवडून आले होते. सहा अपक्षांनाही विजय मिळाला होता. या सहा अपक्ष आमदारांनी पाठिंबा दिल्यामुळे बहुमतासाठी आवश्यक असणारा आकडा भाजपाने गाठला होता.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधीच भाजपाचे ज्येष्ठ नेते बाबुलाल मरांडी १९९९ मध्ये लोकसभेवर निवडून आले होते. अटलबिहारी वाजपेयी मंत्रिमंडळात त्यांचा पर्यावरण राज्यमंत्री म्हणून समावेश करण्यात आला. झारखंड राज्याची निर्मिती झाल्यानंतर बाबुलाल मरांडी यांना झारखंडचे पहिले मुख्यमंत्री म्हणून पाठविण्यात आले. मुख्यमंत्री झाले तेव्हा मरांडी आमदार नव्हते. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्यांना आमदार व्हायचे होते. कारण, खासदार असतानाच त्यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. ■

रामगड विधानसभा मतदारसंघात झाली पहिली पोटनिवडणूक

◆ **नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

झारखंडमधील विधानसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २००५ मध्ये झाली, पण त्याआधी राज्यातील विधानसभेची पहिली पोटनिवडणूक रामगड मतदारसंघात झाली.

बिहारच्या रामगड विधानसभा मतदारसंघात २००० मध्ये झालेल्या निवडणुकीत भाकपचे शब्बीर अहमद कुरेशी उर्फ भेडासिंह विजयी झाले होते. त्यांनी विद्यमान भाजपा आमदार शंकर चौधरी यांचा पराभव केला होता. झारखंड राज्याची निर्मिती व्हायच्या आधीच भेडसिंह यांचे निधन झाले. झारखंड राज्य स्थापन झाल्यानंतर रामगड झारखंडमध्ये आले. त्यामुळे तेथे पोटनिवडणूक घेणे आवश्यक झाले. दुसरीकडे बाबुलाल मरांडी यांनाही विधानसभेवर निवडून येथे आवश्यक होते. त्यामुळे रामगड येथे झारखंड राज्यातील पहिली विधानसभेची पोटनिवडणूक झाली, त्यात मुख्यमंत्री मरांडी विजयी झाले. भाकपाने आमदार भेडासिंह यांच्या पत्नी नादिरा बेगम यांना उमेदवारी दिली. मात्र, मरांडी यांनी ३० हजार मतांनी नादिरा बेगम यांचा पराभव केला. रामगड विधानसभा मतदारसंघातील ही पहिली पोटनिवडणूक चुरशीची झाली. मरांडी यांच्या विजयासाठी भाजपाने अनेक केंद्रीय मंत्री तसेच बिहारमधील भाजपाच्या नेत्यांना मैदानात उतरवले होते. बिहारमध्ये भाकपाने भाजपाकडून हिसकावून घेतलेला रामगड हा मतदारसंघ भाजपाने झारखंडमध्ये भाकपाकडून परत मिळवला आणि बिहारमधील आपल्या पराभवाचा बदला घेतला. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

नांदेडमधून रवींद्र चव्हाण काँग्रेसचे उमेदवार

लोकसभा पोटनिवडणूक

◆ **नांदेड, १८ ऑक्टोबर**

ज्येष्ठ नेते आणि खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम नुकताच जाहीर केला. विधानसभेसोबतच २० नोव्हेंबर रोजी नांदेड लोकसभेसाठी मतदान घेण्यात येणार आहे. या जागेसाठी काँग्रेसने आपल्या उमेदवाराची घोषणा केली असून, वसंत चव्हाण यांचे पुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली.

वसंत चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले होते. वसंत चव्हाण यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा पराभव केला होता. ही निवडणूक आटोपल्यानंतर त्यांच्या प्रकृतीबाबत समस्या निर्माण झाली होती. त्यांना उपचारांसाठी हैदराबाद येथे नेण्यात आले होते. मात्र, तिथे त्यांचे निधन झाले. वसंत चव्हाण यांच्या अकाली निधनामुळे रिक्त झालेल्या नांदेड लोकसभेच्या जागेवर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला उमेदवारी दिली जाईल, अशी चर्चा होती. अखेर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी वसंत चव्हाण यांचे पुत्र रवींद्र चव्हाण यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले. ◀ *(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

निवडणुक कालावधीत आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे-गोयल

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ आक्टोबर

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. सर्व विभागांनी या निवडणुकीत प्राधान्यक्रम आणि तातडीने करावयाची कार्यवाही करावी. तसेच संपूर्ण निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आचारसंहितेच्या अनुषंगाने सर्व विभागप्रमुख आणि जिल्हास्तरीय पथक प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड उपस्थित होते.

हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेपासून मतमोजणी विविध टप्प्यावर अनुषंगीक कार्यवाही करण्यात यावी. आदर्श आचारसंहितेच्या पहिल्या टप्प्यात लोकप्रतिनिधींचे छायाचित्र किंवा नाव हटविण्याची प्रक्रिया तातडीने करण्यात यावी. तसेच कार्यालयांनी त्यांच्याकडील सुरु असलेली कामे आणि पूर्ण झालेली कामे यांची माहिती तातडीने सादर करावी. निवडणुकीच्या अनुषंगाने वाहनांची व्यवस्था करण्यात यावी. निवडणूक कालावधीत शासकीय वाहनांचा दुरुपयोग होऊ नये, याची काळजी घ्यावी, असे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले.

निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया, मतमोजणीचे प्रशिक्षण देण्यात येतील. या प्रशिक्षणादरम्यान निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांना मतदानाची सोय करण्यात आली आहे. यावेळी सेवेत असणाऱ्या संपूर्ण कर्मचाऱ्यांचे मतदान करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशिनची पुरेशी उपलब्धता आहे. या मशिनची तपासणी केल्यानंतरच विधानसभानिहाय वाटप करण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर पुरेशा सोयी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. हिंगोली जिल्ह्यात ९२-वसमत विधानसभा मतदारसंघात ३२७, ९३-कळमनुरी ३४५ व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघात ३४३ असे जिल्ह्यात एकूण १ हजार १५ मतदान केंद्र राहणार असून यातील निम्म्या मतदान केंद्रांचे वेब कास्टिंग करण्यात येणार आहे.

मतदानाचा टक्का वाढावा आणि नागरिकांचा निवडणुकीत सक्रीय सहभाग नोंदवावा, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. प्रामुख्याने कमी मतदान झालेल्या मतदान केंद्राच्या भागात जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच ८५ वर्षे वय आणि दिव्यांग मतदार मतदान केंद्रावर येण्यास सक्षम नसल्यास त्यांना घरुन मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे रितसर मागणी नोंदवावी लागणार आहे. नियमानुसार चित्रिकरण करुन संबंधित व्यक्तीचे मतदान करुन घेण्यात येणार आहे. निवडणुकीदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. नागरिकांनी तक्रारीसाठी सी व्हीजील, व्होटर हेल्पलाईन, नो युवर कँडिडेट यासारखी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीची सर्व प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी संबंधित यंत्रणांनी वेगाने कामकाज पार पाडावे. निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व यंत्रणांनी त्यांच्यावर सोपविलेल्या कामकाजाची प्रभावी अंमलबजावणी सुरु करावी. सर्व भरारी पथकांचा प्रभावी वापर करणे आवश्यक असून, एसएसटी, एफएसटी अशी भरारी पथके तात्काळ कार्यान्वित करावीत. निवडणूक प्रक्रियेमध्ये सी- व्हिजील अँपचा प्रभावी वापर होणार असून, या पवर येणाऱ्या तक्रारींबाबत वेळेत कारवाई होणे आवश्यक आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने आचारसंहितेच्या काळात चोख कारवाई करुन, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सक्त कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी दिले.

सर्व समितीच्या पथक प्रमुखांनी वेगाने कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी दिले. आचारसंहितेच्या अनुषंगाने वेळेत कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. सर्व संबंधितांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय इमारती, होर्डींग्जवरील संदेश, पोस्टर, झेंडे, पताका त्वरीत काढून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. प्रभाग अधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रभागाची पाहणी करुन नव्याने, फलक लावले जाणार नाही, याची काळजी घ्यावी. सभेसाठी परवानगी देताना जो प्रथम येईल व आवश्यक ते शुल्क भरेल त्याच व्यक्तीला प्राधान्याने परवानगी देण्याची कार्यवाही करावी. सद्या सुरु असलेली कामे सुरु ठेवावीत, परंतु नवीन कामे सुरु करू नयेत.

ईव्हीएम, व्हीव्हीपॅट रॅण्डमायझेशनची प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार असून, सर्व संबंधित यंत्रणांना याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच सर्व मतदान केंद्रांना निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी भेटी देऊन ते सुव्यवस्थित असल्याबाबत आणि आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याबाबतची खात्री करुन घ्यावी. मतदान केंद्रांवरील फर्निचर, लाइट, पाणी, रॅम्प, खिडक्यांची दुरुस्ती करुन घ्याव्यात. तसेच मतदान केंद्र परिसरात स्वच्छता ठेवण्याचे निर्देश यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी दिले.

यावेळी आदर्श आचारसंहिता पथकाचे पथक प्रमुख नामदेव केंद्रे यांनी आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, यासाठी काय करावे आणि काय करु नये याबाबत माहिती दिली. तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी निवडणूक कालावधीत करावयाच्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. यावेळी सर्व विविध समित्यांचे जिल्हास्तरीय पथक प्रमुख आणि खाते प्रमुखांची उपस्थिती होती.

औंढा पोलिसांच्या सतर्कतेमुळे एटीएम फोडीचा डाव उधळला

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, १८ आक्टोबर

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथे एटीएम फोडण्यासाठी आणलेले पिकअप वाहन लातूर येथील असल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हट्टा पोलिसांचे पथक लातूरकडे रवाना झाले आहे. पोलिसांच्या सतर्कतेमुळे एटीएम फोडीचा डाव उधळण्यात यश मिळाले आहे.

औंढा नागनाथ अंतर्गत पोलीस चौकी जवळाबाजार येथे पोलीस जमादार इम्रान सिद्दिकी हे जवळाबाजार येथे रात्र गस्त करत असताना त्यांना एक पिकअप क्रमांक एमएच २४ बी ७६४५ ही जवळा बाजार बस स्टँड परिसरात एटीएमच्या पुढे उभी दिसल्याने जमादार सिद्दिकी यांनी सदर पिकअपची पाहणी केली असता त्यामध्ये तीन इसम काळ्या रंगाच्या माकड टोप्या घालून बसलेले दिसले

तेव्हा त्यांनी गाडी चालकास विचारपूस केली. गाडी चालकाने काही ऐक न बोलता गाडी घेऊन पळू लागले तेव्हा जमादार सिद्दिकी यांनी त्यांचा पाठलाग केला परंतु ते सुसाट वेगाने हट्ट्याच्या दिशेने निघाल्याने त्यांनी लागलीच सदरची माहिती पोलीस स्टेशन औंढा नागनाथ चे पोलीस निरीक्षक राहीरे यांना दिली. त्यांनी लागलीच कंट्रोल रूम हिंगोली येथे माहिती देऊन वसमत, हट्टा पोलीस स्टेशनला सतर्क केले. जमादार सिद्दिकी यांनी पोलीस स्टेशन हट्टा येथे संपर्क साधला व त्यांना सदरची गाडी अडवण्यासाठी सांगितले. हट्टा पोलिसांनी सदरची गाडी बस स्टँड येथे थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु सदर पिकअप चालकाने त्यांना कट मारून वसमतच्या दिशेने पळून गेले. त्यामुळे हट्टा पोलिस स्टेशनचे उपनि केंद्रे, चालक लाखाडे, पोलीस अंमलदार कांबळे यांनी त्यांचा पाठलाग केला असता पिकअप चालकाने सदरची गाडी बोराळा पाटीवर थांबून शेतात पळून गेले. हट्टा पोलिसांनी वाहन जप्त केले असून सदर वाहनांमध्ये एटीएम/घर फोडीसाठी वापरणारे कट्टर टॉमी, इत्यादी साहित्य जप्त केले असून पोलीस आरोपीचा शोध घेत असून सदरचे पिकअप हे लातूर येथून चोरी असल्याचे माहिती मिळाली असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांनी तसेच दसरा महोत्सव समितीच्या सदस्यांनी परिश्रम करून दसरा उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडला. या सर्व सदस्यांचे दसरा महोत्सव समितीच्यावतीने सत्कार करून त्यांना सन्मानचिन्ह मान्यवरांच्याहस्ते देण्यात आले. छाया- विजय गुंडेकर

महामंडळावर काम करण्यास भाजपच्या रामराव वडकुतेंचा नकार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ आक्टोबर

राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महराष्ट्र राज्य मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी काम करण्यास भाजपचे माजी आ. रामराव वडकुते यांनी नकार दिला असून या पदावर सर्वसामान्य कार्यकर्त्यांची नियुक्ती करून त्यांना काम करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली आहे. त्याऐवजी मला विधानसभा किंवा विधानपरिषदेवर संधी द्यावी जेणेकरून माझ्या समाजाला न्याय देता येईल.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्यांना महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. राज्यातील २७ जणांची विविध महामंडळावर नियुक्ती करण्यात आली. आचारसंहिता जाहीर होण्याच्या काही दिवस आधी या नियुक्त्या करून महायुतीने सावध पवित्रा धेत बंडोबांना थंड करण्याचा प्रयत्न केला असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, यासंदर्भात पत्र प्राप्त झाल्यानंतर रामराव वडकुते यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावे संदेश पाठविला असून त्यात मी सर्वांचा आभारी आहे. मी यापूर्वी दोन वेळा या पदावर काम केल्यामुळे हे पद मला न देता एखाद्या नवीन कार्यकर्त्याला द्यावे व त्याला काम करण्याची संधी द्यावी असे या संदेशात नमुद करण्यात आले आहे.

यावेळी बोलतांना माजी आ. रामराव वडकुते म्हणाले की, मला विधानसभा किंवा विधानपरिषदेवर काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी मी केली होती. विधानपरिषदेत आमच्या समाजाला स्थान मिळणे गरजेचे आहे. नुकत्याच झालेल्या राज्यपाल नियुक्त सदस्यात मला संधी मिळणार होती परंतु पक्षाची अडचण असल्यामुळे मला ती मिळू शकली नाही. मी ही हिंगोली विधानसभा लढविण्यासाठी इच्छुक आहे. पक्षाने मला संधी द्यावी अशी मागणीही यावेळी माजी आ. रामराव वडकुते यांनी केली आहे. माजी आ. रामराव वडकुते यांनी अहिल्यादेवी राज्य महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे अध्यक्षपद नाकारल्यानंतर भाजप त्यांची नाराजी कशी दूर करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

संक्षिप्त वृत्त

धरणे, मोर्चा, उपोषण करण्यावर निर्बंध

हिंगोली- भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित केला असून दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. हिंगोली जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून सभा, मिरवणुका, निवडणूक प्रचार इत्यादी बाबी नियंत्रित करणे आवश्यक असल्याने जिल्हा दंडाधिकारी अभिनव गोयल यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व शासकीय कार्यालये व विश्राम गृह या ठिकाणी सार्वजनिक व रस्त्यावर धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर घालण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश दि. २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

विभागीय मंडळाच्या सदस्यपदी विठ्ठल मुटकुळे

हिंगोली- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सदस्यपदी प्राचार्य विठ्ठल मुटकुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल मुख्याध्यापक संघाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे यांच्यासह छत्रपती शाहु महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दसरा महोत्सव समितीतील सदस्यांचा सत्कार

हिंगोली- येथील ऐतिहासिक सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या सदस्यांनी नवरात्रोत्सवात अहोरात्र परिश्रम करून दसरा महोत्सव यशस्वीपणे आणि शांततेत, उत्साहात पार पाडण्यासाठी मोलाची कामगिरी केली. या सर्व सदस्य, पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार महंत कौशल्यादास महाराज यांचेहस्ते करण्यात आला. दहा दिवस विविध स्पर्धा, कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी समितीचे सदस्यांनी काम केले. यावेळी सेवानिवृत्त नायब तहसीलदार मधुकर खंडागळे, मुर्तीकार बुमरे, गणेश साहू, विश्वास नायक, दौलत बनसोडे, नागेश धनमने, राजकुमार पांडे, राजेंद्र हलवाई, चंद्रकांत लव्हाळे, पिंटू टाले, गणेश बांगर, सुधीर गोगटे, विजय गुंडेकर, सुनील पाठक, निलेश गरवारे, रामलीला विभाग, कुस्ती विभाग, क्रिडा विभागात योगदान देणारे यांची उपस्थिती होती.

आचारसंहिता काळात शासकीय मिरवणुका, घोषणांवर निर्बंध

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ आक्टोबर

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालये, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा तसेच सभा घेण्यास निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी निवडणूक कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व मुक्त, न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसील कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणुकीसंदर्भातील पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्स लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, आवारात निवडणूकविषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे तसेच निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ सुधारणा कायदा भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत २५ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी श्री. गोयल यांनी दिले आहेत.

आदर्शमध्ये ग्राहक संरक्षण कायदा विषयावर व्याख्यान

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ आक्टोबर

आदर्श शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील 'वाणिज्य विभागा' अंतर्गत ॲड. कल्याणी कैलासचंद्र काबरा यांचे 'ग्राहक संरक्षण कायदा १९८६' याविषयीचे अतिथी व्याख्यान संपन्न झाले. ग्राहक संरक्षणासाठी या कायद्याअंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी, ग्राहकांचे हक्क, जबाबदारी व कर्तव्य याविषयीचे विस्तृत मार्गदर्शन विद्यार्थ्यांना ॲड. कल्याणी काबरा यांनी केले आहे.

नागरिक त्यांच्या दैनंदिन कामांसाठी विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा खरेदी करतात. एखादी व्यक्ती त्याला जे खरेदी करायचे आहे त्यासाठी पैसे देते आणि त्याचा वापर आणि वापर करून समाधानी होण्याची आशा बाळगते. जरी, कधीकधी, खरेदी केलेल्या उत्पादनांसह समाधानाची खात्री केली जाऊ शकत नाही. हे उत्पादनाची खराब गुणवत्ता, उत्पादनापेक्षा जास्त शुल्क, सामग्रीचे कमी प्रमाण, दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमुळे होऊ शकते. ग्राहक संरक्षणाच्या संकल्पना आणि सरावाने गैरप्रकार टाळता येऊ शकतात जे ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी कायदेशीर तरतुदी आणि यंत्रणेसह ग्राहकांचे हक्क आणि जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकत ॲड. कल्याणी काबरा मार्गदर्शन केले.

विद्यार्थी विकास योजनेअंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर विलास आघाव यांच्या दिशा निर्देश व मार्गदर्शनानुसार प्रस्तुत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आशिष गट्टानी हे होते. या व्याख्यानासाठी प्रा.गौरी जोशी, प्रा. सोनाली दाड, प्रा.शिवानी पारिख, प्रा. वैष्णवी काबरा यांच्यासह लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. दयाराम मस्के, डॉ. सुरेंद्र साहू आणि प्रा. राम देवडे हेही याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रस्तुत व्याख्यानाने विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले आणि त्यांच्या ज्ञानात कायद्यातील दुरुस्त्या आणि त्याचा वापर या अनुषंगाने वैधानिक व संवैधानिक स्वरूपातील माहिती नाविन्यपूर्ण उपलब्ध झाल्याने विद्यार्थी वर्गातही उत्साहाचे वातावरण होते.

वाचन प्रेरणा दिन साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १८ आक्टोबर

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही सहभाग नोंदवला. यावेळी वाचनाचे महत्व सांगण्यात आले.

हिंगोली येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन घेण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जे एस भट्ट यांचेहस्ते डॉ कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अनिल लोळेवार, डी पी डोईफोडे, एस पी गहेरवार, टी आर चिलमुल, श्रीमती खटाणे, बी बी शिंदे, आर टी इंगोले, सुभाष पवार आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ अंभोरे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून सांगितले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

इच्छुकांची भाऊगर्दी; सोशल मीडिया हाऊसफुल्ल

यतभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

नांदेड- विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानें नांदेड जिल्ह्यात रजाकीय वातावरण तापत चालले आहे. उमेदवारी जाहीर होण्यापिर्वीच भेटी गाठीवर भर देण्यात येत आहे. परंतु यापेक्षा अधिक जोरदार प्रचार सोशल मिडीयावर सुरु असल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी निश्चित झाली नसली तरी अनेकजण गुढघ्याला बाशींग बांधून भावी आमदारांची उपमा देत उमेदवारी जाहिर होण्यापुर्वीच निवडून देण्याचे आवाहन करत आहेत.

इच्छूकांच्या सोशल मिडीयावरील या भाऊगर्दीमुळे व्हॉट्स अप, फेसबु आदी समाजमाध्यमे हाऊसफुल झाले आहेत. विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर होताच प्रत्येकजण निवडणुक लढविण्यासाठी गुढघ्याला वाशींग बांधून तयार झाला आहे. प्रचारासाठी सोशल मिडीया है परिणामकारक साधन असल्याचे दाखवत अनकांनी उमेदवारी जाहिर होण्यापुर्वीच संबंधीत पक्षाचे निवडणूक चिन्ह, पक्षाच्या नावाखाली समर्थकामार्फत स्वतःला भावी आमदार उपमा देत व्हॅट्सॲप, फेसबुक व अन्य सोशल मिडीयावर जाहिरातबाजी सुरु केली आहे. मतदारसंघाचा विकास केवळ आपणच करू शकतो हा विश्वास दाखवत शक्ती प्रदर्शनासाठीही सोशल मिडीयाचा वापर करण्यात येत आहे. अनेक इच्छूक उमेदवारांनी फेसबुक, व्हॉट्सॲड वर निवडणुकीच्या अनुषंगाने नवीन ग्रुप तयार केले असून उमेदवारी जाहिर होण्यापुर्वीच प्रचारही सुरु केला आहे. गत काही

दिवसापासूनच इच्छुकांच्या सोशल मिडीयावरील भाऊगदीमुळे व्हॉट्स अप, फेसबुक आदी हाऊस फुल झाले आहेत. फेसबुक खाते उघडताच शहरातील एखाद्या इच्छूक उमेदवाराची विविध विकासाचे आश्वासन असलेली जाहिरात पहावसास मिळत आहे. तर या जाहिराती संबंधीत इच्छूक उमेदवार समर्थक टॅग करत येत असल्याने सर्व सामान्य नागरिक मात्र वैतागल्याचे दिसून येत आहे.

किनवट ते माहूर पदयात्रेचे आ.केराम यांच्याकडून जंगी स्वागत

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. १८ ऑक्टोबर

श्रीराम पदयात्रा समिती किनवटद्वारा श्री हभपसभ दिनेशगुरु कुलकर्णी महाराज यांच्या किनवट ते माहूर पदयात्रेस १८ ऑक्टोबर रोजी पासून प्रारंभ होताच पहाटे ५ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार भीमराव केराम यांनी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करत या पदयात्रेचे जंगी स्वागत केले.

श्रीराम पदयात्रा समिती किनवट च्या वतीने संभाजीनगर येथील श्री ह भ प स भ दिनेशगुरु कुलकर्णी यांनी नियोजित किनवट ते दत्तशिखर संस्थान माहूरपर्यंतच्या पदयात्रेस प्रारंभ केला असून १८ ऑक्टोबर २०२४ रोजी रोजी पहाटे ५ वा.श्री संत गजानन महाराज मंदिरातून पदयात्रेस प्रारंभ झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार भीमराव केराम यांनी ध्वजारोहण केले व छत्रपतीं शिवरायांच्या प्रतिमेला अभिवादन करून फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करत या पदयात्रेचे जंगी स्वागत केले.

यावेळी आ. केराम यांनी दिनेश गुरु कुलकर्णी महाराज व त्यांच्या समवेत पदयात्रेत सहभागी झालेल्यांना पदयात्रेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. किनवट ते श्रीक्षेत्र माहूर पदयात्रेचे हे चौथे वर्ष असून या पदयात्रेत किनवट तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

संक्षिप्त वृत्त

विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष पथसंचलन व शस्त्र पूजन

बिलोली-विजयादशमीनिमित्त बिलोली शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष पथसंचलन व शस्त्र पूजन संपन्न झाले बिलोली शहर येथिल महाशक्तीशाली दुर्गा माता मंदिर लघुळ रोड बिलोली येथून संचलन सुरु होऊन शहरातील मुख्य मार्गावरुन चालत जाऊन बागेतील हनुमान मंदीर येथे विजयादशमी उत्सव संपन्न झाला. या संचलनात तालुक्यातील स्वयंसेवक मोठ्या संख्येने गणवेशात सहभागी झाले. संचलनाच्या मार्गावर नागरिकांनी फुल टाकून स्वागत केले. या उत्सवास तालुका संघचालक विश्वनाथअण्णा दाचावर, ॲड. मनोज आरलीकर, संघ पूर्व प्रचारक राजेश कोंडिबा मेहत्रे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि त्यांच्या १७ सहकाऱ्यांनी १९२५ च्या विजयादशमीला नागपुरातील महाल भागात या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. शिस्तबद्धता आणि सेवाकार्यासाठी जगभर ओळखल्या जाणाऱ्या या संघटनेकडे मार्च २०२४ च्या प्रतिनिधी सभेनुसार - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ९२२ जिल्ह्यांमधील ६५९७ खंड आणि २७,७२० मंडळांमध्ये ७३,११७ दैनिक शाखा आहेत. प्रत्येक मंडळात १२ ते १५ गावांचा समावेश आहे. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातून संघाच्या प्रेरणेने विविध संघटना कार्यरत आहेत, ज्या राष्ट्र उभारणीत आणि हिंदू समाजाला संघटित करण्यात योगदान देत असुन भारत मातेला परम वैभवापर्यंत घेऊन जाण्यासाठी हिंदु समाजाने संघटित झाले पाहिजे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

रब्बी हंगामातील पिकांसाठी १५ नोव्हेंबरपर्यंत पाणी अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड-शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाच्या धरणामध्ये उपलब्ध पाणीसाठा विचारात घेता चालू रब्बी हंगाम सन २०२४-२५ मध्ये अटीच्या अधीन राहून नमुना नंबर ७ वर पाणी अर्ज पुरवठा करण्यात येणार आहे. ज्या लाभधारकांना रब्बी हंगामात नमुना नं. ७ वर भुसार पिके, चारा पिके इत्यादी पिकांना पाणी घ्यावयाचे आहे, त्यांनी आपले नमुना नंबर ७ चे पाणी अर्ज जवळच्या शाखा कार्यालयात १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह भरुन द्यावेत. मुदतीनंतर येणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग उत्तरचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे. रब्बी हंगामी पिकांसाठी कालव्याचे प्रवाही/मंजूर उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहित नमुन्यात १५ नोव्हेंबर २०२४ पूर्वी संबंधित शाखा कार्यालयात माहिती भरुन सादर करावेत. मुदतीनंतर आलेले पाणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पाणी अर्ज दिला म्हणजे परवानगी मिळाली असे गृहीत धरु नये याची नोंद घेण्यात यावी. नमुना नं. ७ चे कोरे पाणी मागणी अर्ज शाखेत विनामुल्य उपलब्ध आहेत. पिकाचे मागणी क्षेत्र २० आर च्या पटीत असावे. कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी न भरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजूर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस कार्यालय जबाबदार असणार नाही. लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामूळे पाणी नदीनाल्यास वाया जावून ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. शासन निर्णयात नमूद दरानुसार सन २०२४-२५ साठीचे पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील. थकीत व चालू पाणीपट्टी वेळेत भरणे आवश्यक आहे. पाणी पाळी सुरु असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टरद्वारे पाणी उपसा करणे अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसुली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही असे पाटबंधारे विभागाने कळविले आहे.

सहशिक्षक राधाजी कौठकर यांचा आज सेवापूर्ती सोहळा

आदमपूर-बिलोली तालुक्यातील मौजे खतगांव येथील सौ.मंजुळाबाई माध्यमिक विद्यालयातील कार्यरत मराठी विषयाचे सहशिक्षक कौठकर राधाजी ब्रह्मानंद हे नियत वयोमानानुसार आज दि.१९ ऑक्टोबर रोजी ३१ वर्ष ४ महिने सेवा देऊन सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापूर्ती सोहळा खतगांव संस्थेत सकाळी ११:३० वाजता होणार आहे. सहशिक्षक कौठकर राधाजी हे मूळचे शेवाळा,ता. देगलूर येथील रहिवासी आहेत.

राज्यस्तरीय शालेय स्पोर्टडान्स स्पर्धेसाठी क्रीडा विभागाची तयारी

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

राज्यस्तरीय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धे साठी जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत नुकतीच पूर्वतयारीची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. या वेळी वेळेत व नियमानुसार सर्व स्पर्धांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले.

आयुक्त क्रीडा विभाग सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यावतीने व जिल्हा क्रीडा परिषद नांदेड अंतर्गत सन २०२४-२५ मधील स्पोर्टडान्स क्रीडा स्पर्धा आयोजन व नियोजना संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सन २०२४- २५ मधील राज्यस्तरीय क्रीडा राज्यस्तरीय खेळ स्पोर्टडान्स तसेच इतर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा वयोगट १९ वर्षे मुले मुली स्पर्धेचे आयोजन करण्याची जबाबदारी नांदेड जिल्ह्याकडे आहे. त्याअनुषंगाने या स्पर्धेमध्ये स्पोर्ट्स डान्स कामाचा आढावा घेण्यात आला. राज्यस्तरीय स्पोर्ट डान्स संदर्भात स्पर्धेमध्ये १ (क्लासिकल डान्स) शास्त्रीय नृत्य, २ (फोक डान्स) लोकनृत्य, ३ (वेस्टर्न डान्स) पाशात्य नृत्य, ४ (हिप हॉप), ५ (बॅटल) या नृत्य प्रकारांचा स्पोर्टडांस स्पर्धेत समावेश आहे. तसेच विविध स्तरावर या स्पर्धा होणार आहेत. तरी नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुका व शहरातील शाळांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा व स्पर्धकांना विद्यार्थी मुले व मुलींना शाळेमार्फत संधी उपलब्ध करावी असे निर्देश देण्यात आले. या बैठकीस कृषी उपसंचालक एच. एम. नागरगोजे, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक रामचंद्र पाचंगे, जिल्हा समन्वयक शिक्षण विभाग प्राथमिक डॉ. डी. टी शिरसाट, जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र चंदा रावळकर, संचालक, राष्ट्रीयसेवा विभागाचे समन्वयक डॉ. मल्लिकार्जुन काराजगी, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे , क्रीडा अधिकारी संजय बेतीवार, राहुल श्रीरामवार, बालाजी शिरसीकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक बाळासाहेब डोंगरे व विविध खेळ संघटनेचे पदाधिकारी वर्षा पाटील जोगदंड, बालाजी जोगदंड, विष्णु शिंदे, आनंदा कांबळे उपस्थित होते.

हे आदेश १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी अंमलात आला असून हे आदेश २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत अंमलात राहतील.

पाच वर्षाच्या मुलीवर नराधमाने केला बलात्कार;आरोपी अटक

तभा वृत्तसेवा
सोनखेड,दि. १८ ऑक्टोबर

सोनखेड येथून जवळच असलेल्या दापशेड येथे एका पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार केल्याच्या घटनेने गाव हादरले असून पोलिसांनी नराधमाच्या तात्काळ मुसक्या आवळल्या. सदरील घटनेने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दापशेड येथील उमेश रावसाहेब टोणगे या वीस वर्षाच्या नराधमने गावातील एका पाच वर्षिय चिमुकलीवर बलात्कार केल्याची घटना दि १७ ऑक्टोबर रोजी ११ ते दिड च्या दरम्यान घडली. पीडित मुलीच्या आईस समजताच घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितल्यावर सर्वांनी सोनखेड पोलीस ठाण्यात धाव घेतली. पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून उमेश रावसाहेब टोणगे वय २० याला अटक करून त्याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ६४ (क्ष), ६५ (२) व सह कलम ४, ६, १२, बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे या करीत आहेत.

'मुख्यमंत्री माझी शुळा सुंदर शाळा' स्पर्धेत विष्णुपूरी जि.प. शाळेला विभागातुन प्रथम पारितोषीक

तभा वृत्तसेवा
नविन नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत नांदेड तालुक्यातील विष्णुपुरी जिल्हा परिषद शाळेने लातूर विभागांत प्रथम क्रमांक पटकावला असुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर, शिक्षण आयुक्त सुरेश मांढरे, प्रधान सचिव आय.ए. कुंदन यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेला २१ लाख रुपये पारितोषक जमशेद भाभा थिएटर नरिमन पॉइंट मुंबई येथे पारितोषक वितरीत करण्यात आले.

माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जिल्हा परिषद विष्णुपुरी लातूर विभागांतुन स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेत शाळेने दुसऱ्या टप्प्यात अभियानाच्या माध्यमातून पायाभुत सुविधा, शासन अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्ता, विध्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकसीत करण्यासोबतच अध्ययन व अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञान वापर, पर्यावरण संवर्धन जाणीव,सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मता भावना व्दृगिंत

करण्यासाठी प्रयत्न, व्यवसाय शिक्षण तोंड ओळख, अंगभूत कला क्रीडा गुणांचा विकास, शासकीय योजना लाभ, इत्यादी घटक व उदिष्ट काम केल्याने हे यश मिळाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत १४ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे पारितोषक वितरण करण्यात आले. २१ लाख रुपये, सन्मान चिन्ह ,सन्मान पत्र पारीतोषीकाचे स्वरूप आहे. शिक्षण अधिकारी प्राथमिक सविता बिरगे, शालेय समिती अध्यक्ष विलास देशमुख, मुख्याध्यापक उज्वला जाधव, पर्यवेक्षक शिवाजी वेदपाठक, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, शंकरराव हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे, माणिकराव हंबर्डे, राजेश हंबर्डे व शिक्षक उदय हंबर्डे, कृष्णा बिरादार, डि. के.केद्रे, एम.ए.खदीर, कांचन माला पटवे, चंद्रकला इदलगावे, संतोष देशमुख, अर्चना देशमुख यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रथम विभागीय पारितोषिक मिळाल्या बद्दल नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी योजना बनसोडे, गटविकास अधिकारी अमित राठोड, सहाय्यक गटविकास अधिकारी पांडुरंग नारवटकर, गटशिक्षणाधिकारीनागराजबनसोडे, विस्तार अधिकारी बालाजी शिंदे, ग्रामविकास अधिकारी संजय कानोडे, पोलीस पाटील प्रविण हंबर्डे यांनी अभिनंदन केले आहे.

तसेच नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ आमदार मोहन हंबर्डे, सरपंच संघ्या हंबर्डे, उपसरपंच अर्चना हंबर्डे, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य व शाळेतील शिक्षक व शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

माणिक नगर नायगांव येथे कोजागिरी महोत्सव संपन्न

भजन सम्राट भोगले यांच्या गायनाने, कवी वर्याच्या काव्य चंद्रमाने रंगत भरली

तभा वृत्तसेवा
नायगाव,दि. १८ ऑक्टोबर

कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून नायगांव येथील माणिक नगरातील रुद्र मुखी दुर्गा मंडळाच्या वतीने दि.१६ ऑक्टो रोज बुधवारी रात्री ९ वाजता भजन सम्राट विश्वनाथ भोगले व संस्कृती भेदेकर,कविवर्य चंद्रमाने यांच्या काव्य गायनाने कोजागिरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नायगांव येथील माणिक नगरातील रुद्र मुखी दूर्गा मंडळ कमिटीच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून दिनांक १६ ऑक्टोबर रोज बुधवारी रात्री ९ वा. येथील नगरातील भव्य प्रांगणात प्रसिध्द कलाकार रेडीओस्टार ,भजन सम्राट विश्वनाथ भोगले, संस्कृती भेदेकर, कविवर्य चंद्रमाने यांचे काव्य गायन,व भक्तीसंगीत, लोकसंगीत, पोवाडे भजन संध्याचा कार्यक्रम घेण्यात आला आहे.

या वेळी कार्यक्रमांचे नियोजन व सुत्रसंचलन बाळासाहेब पांडे यांनी केले,स्वर

दिनाची साथ संगीत शिक्षक शंकर बिरादार यांनी केले तर तबला वादनाची साथ नामदेव पांचाळ,यांची लाभली आहे

कोजागिरी पौर्णिमेच्या आयोजित केलेल्या कार्यक्रमात चंद्र पुनवेचा या अंतर्गत गायिका कुमारी.संस्कृती भेदेकर,वैष्णवी सांगवे, माधव भेदेकर शंकर बिरादार सर सह या कलावंतांनी एकापेक्षा एक सरस अशी बहारदार सुगम गीते,गझल,भक्ति गीतांचे सादरी करण करण्यात आले.ढोलकीची साथ चिरंजीव विवेक भोगले यांनी दिली. तर महाराष्ट्रराज्याने तुर्तास मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याच्या प्रित्यार्थ मराठ कवीचा काव्यचंद्रमा चा गौरव कार्यक्रम घेण्यात आला तर कविवर्य ज्ञानेश्वर शिंदे, बालाजी पेटेकर सर,वेंकट आणेराये ,भा.ग.मोरे, व अन्य कवि मंडळीच्या या वेळी कविता सादर करण्यात आल्या.

या वेळी च्या कोजागिरी महोत्सव हा माणिक नगर नायगांव येथील प्रतिष्ठित नागरिक, रुद्र मुखी दुर्गा महोत्सव समिती व युवा माणिक मोती मित्रमंडळ माणिक नगर नायगाव बाजार यांनी परिश्रम घेऊन हा महोत्सव यशस्वी केला. तद्नंतर दुधाच्या प्रसादाच महिला प्रतिनिधी यांच्या हस्ते पूजन व आरती करून प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता ही विश्वनाथ भोगले यांनी गायीलेल्या गोंधळाने करण्यात आली.

लोकनेते चिखलीकर यांच्या जीवास धोका करणाऱ्या शरद कोळीला बेड्या ठोका : साहेबराव गायकवाड

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

जिल्ह्यातील कणखर राजकीय नेतृत्व तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या बद्दल अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत त्यांच्या जीवितास धोका करण्याची भाषा करणाऱ्या शिवसेनेचा उपनेता शरद कोळी याला तात्काळ अटक करा अशी मागणी भाजपाचे नांदेड जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी आज पोलीस अधीक्षकांकडे केली आहे . नांदेड जिल्ह्यातील स्वाभिमानी आणि स्वकर्तुत्वावर जनसामान्यांच्या मनात कायम रुजलेली नेतृत्व म्हणून माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्याकडे पाहिले जाते. तळागळातील आणि शेवटच्या घटकातील प्रत्येकाला न्याय मिळवून देण्यासाठी माजी खासदार चिखलीकर यांनी मोठी भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेत प्रचंड वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत ते पुन्हा एकदा लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. या निवडणुकीच्या तयारीमुळे त्यांच्या लोकप्रियता अधिकाधिक वाढ होत असल्याने राजकीय विरोधकांना आता पोटशूळ उठला आहे. त्यामुळे चिखलीकर यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करणे किंवा त्यांच्या जीवितास धोका निर्माण करण्याची भाषा केली जात आहे . याच प्रकारानुसार शिवसेनेचे उपनेते शरद कोळी यांनी नुकतीच एक पत्रकार परिषद घेऊन चिखलीकर यांच्या जीवतास धोका आणि इजा पोहोचण्याचे अनुषंगाने धमकी दिली आहे. अश्लील भाषेत शिवीगाळ केली होती. सदर पत्रकार परिषदेचा व्हिडिओ फेसबुकवर त्यांनी अपलोड केला होता. याप्रकरणी शरद कोळी याच्याविरुद्ध लोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद कोळी याच्यावर केवळ गुन्हा दाखल करून भागणार नाही तर त्याला तात्काळ अटक करा अन्यथा नाईलाजाणे आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल असा इशाराही जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

नांदेड उत्तरच्या उमेदवारावरून वंचितमध्ये नाराजी

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

वंचित बहुजन आघाडीने नांदेड उत्तर मतदार संघातील उमेदवार जाहीर केला आहे. परंतु या उमेदवारावरून समाजमाध्यमावर नाराजी व्यक्त होत आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात अन्य पक्षाच्या तुल्यबळ वंचितचा उमेदवार असावा अशी भावना व्यक्त होत आहे. निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच वंचित बहुजन आघाडीने नांदेड दक्षिण व लोहा- कंधार मतदारसंघासाठी उमेदवार जाहीर केले होते. आता नुकतेच नांदेड लोकसभा मतदारसंघातील तीन विधानसभेचे उमेदवार जाहीर केले आहेत. परंतु नांदेड उत्तर मतदारसंघात सक्षम इच्छुकांची संख्या लक्षणीय असतानाही वंचित बहुजन आघाडीने शैक्षणिक क्षेत्रातील उमेदवार पुन्हा दिला आहे. वंचितने दिलेला उमेदवार अनेकांना रुचला नाही. समाजमाध्यमावर या उमेदवाराविषयी तसेच वंचित बहुजन आघाडीने घेतलेल्या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. नांदेड उत्तर मतदार संघातून सर्व बाबींनी सक्षम असलेल्या तसेच दांडगा जनसंपर्क असलेल्या अनेकांनी वंचित बहुजन आघाडीकडे उमेदवारीची मागणी केली होती. नांदेड उत्तर मतदार संघात प्रमुख राजकीय पक्षांचे उमेदवार ठरले नसले तरी वंचितने दिलेल्या उमेदवारामुळे मात्र जनतेमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तर ही नाराजी सोशल माध्यमावर देखील पसरू लागली आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत वंचीत बहुजन आघाडीला मते मिळविण्यात यश मिळाले होते. परंतु विजय मात्र मिळवता आला नाही. त्यामुळे पुन्हा तोच प्रकार वंचित बहुजन आघाडीकडून करण्यात आला आहे. त्यामुळे या उमेदवाराचा पुन्हा अप्रत्यक्षरीत्या अन्य उमेदवारांनाच फायदा होणार असल्याचेही बोलल्या जात आहे.

'ज्ञानतीर्थ-२०२४' युवक महोत्सवाच्या शोभा यात्रेतून मराठवाड्याच्या कला आणि संस्कृतीचे दर्शन

तभा वृत्तसेवा
नविन नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णुपुरी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानतीर्थ-२०२४' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या दि. १८ ऑक्टोबर रोजी सकाळी शोभा यात्रेस प्रारंभ झाला. या शोभा यात्रेत विविध महाविद्यालयातून सहभागी स्पर्धक कलावंतानी सहभाग घेतला.

या शोभा यात्रेत नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयाने सहभाग नोंदविला. शोभायात्रेमध्ये मराठवाड्याची लोककला, लोकसंस्कृती, दिंडी, ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथक या बरोबरच मतदान जनजागृती करीत 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' असा संदेश शोभा यात्रेतून दिला. शोभा यात्रेची सुरुवात विष्णूपुरी गावातील मारुती मंदिरापासून

करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, ईंजि. नारायण चौधरी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर, प्राचार्य सुनील हंबर्डे, आदींची उपस्थिती होती. शोभायात्रेत वै. धुंडा महाराज देगलूर महाविद्यालयाच्या संघांनी 'पंढरीची दिंडी' देखावा सादर करत टाळ मृदुंगाच्या जय घोषात अभंग सादर केले. तर इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी विष्णुपुरी च्य संघाने 'माळेगाव यात्रेच्या देखाव्यातून माळेगाव दक्षिण भारतातील यात्रेची ओळख शोभा यात्रेतून करून दिली. येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषात पारंपारिक वेशभूषा धारण करून गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. पारंपारिक ढोल ताशांच्या गजरात विष्णुपुरी चा परिसर दुमदुमून गेला. जळकोट येथील संभाजी केंद्रे महाविद्यालय संघाने मराठवाड्याची कला आणि संस्कृती देखावा शोभायात्रेतून सादर केला. तर वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाने 'मतदान जनजागृती' करत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करत लोकशाहीला मजबूत करण्याचे आवाहन केले. शोभा यात्रेचे परीक्षण डॉ. विजया साखरे, डॉ. सुनील व्यवहारे, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. राजपाल चिखलीकर, डॉ. शिल्पा शेंडगे यांनी केले.

कंधारमध्ये अनोळखी इसमाविरुद्ध भेटवस्तू वाटल्याचा गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

१५ ऑक्टोबरला जिल्ह्यामध्ये विधानसभा व लोकसभा पोटनिवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असताना कंधार शहरात भेटवस्तू वाटप करतानाचे एक छायाचित्र व्हायरल झाले.व्हायरल झालेल्या या छायाचित्रावरून कंधार येथे आचारसंहिता भंग करण्याचा अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंधार येथील संभाजी नगर परिसरात पिकअप व्हॅन क्रमांक नंबर एमएच १४ जीयू ७७५१ मधील अनोळखी इसमाने कंधार येथील संभाजीनगर कंधार येथे आदर्श आचारसंहिता आदेशाचे उल्लंघन करून नागरिकांना भेटवस्तू वाटप करीत असल्याचे फोटो व्हाट्सअपवर व्हायरल झाला. सकाळी साडेआठ ते नऊच्या सुमारास समाज माध्यमावर या संदर्भातील फोटो व्हायरल झाला. त्यानंतर या परिसरात शासनाच्या वतीने फिर्यादीने प्रत्यक्ष भरारी पथकाद्वारे पाहणी केली असता सदर पिकअप व्हॅन आढळून आली नाही. मात्र या संदर्भातील छायाचित्र समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानुसार कंधार पोलीस ठाण्यात शासनाच्या वतीने श्री. राम ज्ञानोबा वारकड वय ४० वर्षे व्यवसाय नोकरी कृषी पर्यवेक्षक तालुका कृषी अधिकारी कार्यालय कंधार राहणार संगुचीवाडी तालुका कंधार यांनी दुपारी तीनच्या सुमारास गुन्हा दाखल केला.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १९ ऑक्टोबर २०२४

अमित जैन व सुजय एस. मुंगीकर यांची नियुक्ती

औरंगाबाद : हयात प्लेस औरंगाबाद विमानतळ हॉटेलने अमित जैन यांची नवीन जनरल मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे. अमित जैन यांना १८ वर्षांपेक्षा अधिक अनुभव असून, त्यांच्या अनुभवामुळे हयात प्लेस औरंगाबाद विमानतळ हॉटेलमध्ये अतिथींना उच्च दर्जाची सेवा मिळणार आहे. हॉटेलने सुजय एस. मुंगीकर यांना नवे हेड शेफ म्हणून नियुक्त केले आहे. त्यांना १७ वर्षांचा अनुभव असून, अतिथींना वैविध्यपूर्ण पाककृतींचा मिळणार आहे.गेल्या काही वर्षांमध्ये, अमित जैन यांनी अंदाजपत्रक, ग्राहक धारणा, अंदाज, वित्त आणि व्यवस्थापन यामधील ज्ञान आणि कौशल्य जमा केले आहे. सिमला येथील ओबेरॉय ग्रुपमध्ये फायनान्स एक्झिक्युटिव्ह म्हणून त्यांचा पहिला व्यावसायिक कार्यकाळ झाल्यापासून, ते द लीला पॅलेस केम्पिंस्की, बंगलोर आणि द लीला केम्पिंस्की, मुंबई यांच्येकडे कार्यरत होते. त्यानंतर ते मॅरियट ग्रुपमध्ये सामील होते आणि १३ वर्षांपासून व्यवस्थापकीय स्तरावर भारतातील त्यांच्या अनेक हॉटेलमध्ये कार्यरत होते.

डेटॉल बनेगा स्वस्थ इंडिया जागतिक हँडवॉशिंग दिवस

छत्रपती संभाजीनगर - रेकिटची महत्वपूर्ण मोहीम असलेल्या डेटॉल बनेगा स्वस्थ इंडिया (बीएसआय) ने जागतिक हँडवॉशिंग दिवस २०२४ साजरा केला, ज्यामध्ये निरोगी भविष्यासाठी ३० दशलक्ष भारतभरातील मुलांना हात धूण्याचे महत्त्व शिकवण्यात आले. 'सर्वांसाठी हात धूवा: स्वच्छतेमधून आरोग्य समानता आधुनिक करणे' या थीमवर आधारित या इव्हेंटमध्ये डेटॉल बीएसआयच्या वचनबद्धतेवर भर देण्यात आली जी आहे, कोणालाही न वगळता.मागासवर्गीय भागातील सर्व मुलांना स्वच्छतेचे अत्यावश्यक ज्ञान उपलब्ध व्हावे.

महावितरणच्या डीपीतून हजारोंचे ऑइल चोरीला

छत्रपती संभाजीनगर : महावितरण कंपनीच्या २५ किवीए क्षमतेच्या दोन सिंगल फेज डीपीतून अज्ञाताने विविध साहित्यासह हजारोंच्या ऑईलची चोरी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना मारुती मंदिराजवळ डवागाव परिसरात १६ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी सहायक अभियंता प्रदीप गोपीनाथ श्रेष्ठ यांनी दिलेल्या तक्रारीवरून महावितरण कंपनीच्या २५ किवीए क्षमतेच्या दोन सिंगल फेज डीपीतून ३८ हजार रुपयांची कॉईल, वीस हजार रुपयांचे ऑइल असा एकूण ५८ हजार रुपये किमतीच्या साहित्याची चोरी करण्यात आल्याची तक्रार देण्यात आली असून याप्रकरणी वाळूज पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तू माझ्यासोबत चल, म्हणत लावला चाकू

छत्रपती संभाजीनगर : तू माझ्यासोबत चल असे म्हणून चाकूचा धाक दाखवून तरुणीला घराबाहेर नेऊन मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना १६ ऑक्टोंबर रोजी महादेव मंदिरासमोर सावित्रीनगर परिसरात घडली. प्रज्वल चंद्रकांत इंगळे (रा. जय भीमनगर) असे आरोपीचे नाव आहे.

खट्याळ पिट्या...

मतदानाचे महत्व स्वत: ओळखा आणि इतरांनाही सांगा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

देवगिरी महाविद्यालयात युवकांशी संवाद

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ (जिमाका):- मतदान हे आपले कर्तव्य आहे. युवकांनी स्वतः मतदानाचे महत्त्व ओळखावे आणि मतदान करावेच मात्र त्यासोबत त्यांनी इतरांनाही मतदानाचे महत्व सांगावे व आपल्या आसपासच्या मतदारांमध्ये जनजागृती करुन आपले योगदान द्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

देवगिरी महाविद्यालयात आयोजित युवासंवाद या कार्यक्रमातून आज मतदार जनजागृती करण्यात आली. उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, स्वीप नोडल अधिकारी दीपाली थावरे, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर तसेच प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, लोकशाहीमुळे आपल्याला ज्या सामाजिक जीवनात विविध अधिकार आणि हक्क मिळतात त्यामुळे आपण स्वातंत्र्य उपभोगू शकतो. आपला देश त्यामुळे प्रगती करु शकतो. त्यासाठी योग्य प्रतिनिधीत्व असणे आवश्यक आहे. जास्त मतदान झाल्यास योग्य प्रतिनिधित्व होते. कमी मतदान झाल्यास कमी प्रतिनिधीत्व होते. त्यासाठी मतदानाचे प्रमाण अधिक असणे आवश्यक आहे. युवकांनी स्वयंस्फूर्तीने मतदानासाठी पुढे यावे व आपला लोकशाहीचा हक्क बजवावा,असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी स्वामी पुढे म्हणाले की, आपल्या आयुष्यात आपण सुसंस्कारित होणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण स्वतःपासून सुरुवात करावी. आपल्या आई वडील गुरुजनांचा आदर करणे, व्यसनांपासून दुर राहणे, चांगल्या सवयींचा अंगिकार करणे, पर्यावरण रक्षण, वृक्षरोपण अशा विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः चे योगदान दिले पाहिजे,असेही त्यांनी आवर्जून सांगितले. मतदार जनजागृती उपक्रमाविषयी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी माहिती दिली. प्राचार्य डॉ. तेजनकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालयाच्या संगित विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीसाठी पोवाडा व गीते सादर केली.

मिडटाऊन लायन्स मेडिकल सर्व्हिसेस ट्रस्टच्या माध्यमातून ११ वर्षे सेवा

छत्रपती संभाजीनगर- लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर मिडटाऊनला मिडटाऊन लायन्स मेडिकल सर्व्हिसेस ट्रस्टचा ११ वा वर्धापनदिन साजरा करण्यात येत असून या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत सागरल लॉन्स एपीआय कॉर्नर येथे योगा, मेडिटेशन शिबिर ठेवण्यात आले आहे. २०१३ मध्ये स्थापना झाल्यापासून, किडनी डायलिसिस सेंटर गरजूंना परवडणारी आणि सुलभ आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी समर्पित आहे, विशेष लक्ष वंचित रुग्णांना आधार देण्यावर आहे.

गेल्या ११ वर्षात, केंद्राने १५,००० हून अधिक डायलिसिस रुग्णांना सेवा दिली आहे, अनेकांना मोफत उपचार देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

रुग्णांना येणारा आर्थिक भार ओळखून, अलीकडच्या काही वर्षांमध्ये प्रति डायलिसिस खर्च ४०० पर्यंत कमी केला आहे. आत्तापर्यंत आम्ही २.०० कोटी रुपयांच्या सेवा त्याच्या सदस्यांकडून निधी उभारणीद्वारे, उड्ठ, अनेक लोकांकडून मदतीचे हात प्रदान केले असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले. यावेळी एडवोकेट राजगोपाल मालपाणी, लॉ. नंदकिशोर मालपाणी,लॉ. राजदीप सिंग चावला,लॉ. प्रदीप तायल, शेखर ते सरडा हिमांशू गुप्ता आदी उपस्थित होते.

महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे लघु उद्योजक त्रस्त

नियमित बिल भरूनही विज मिळेना

वाळूज महानगर (प्रतिनिधी) वाळूज औद्योगिक परिसर हा कारखानदारांमुळे ओळखला जातो आज या ठिकाणी हजारो संख्येने उद्योजक तयार झाले असून, त्या कारखान्याद्वारे लाखो कामगारांचा उदरनिर्वाह सुरू आहे. वडगाव कोल्हाटी भागामध्ये काही उद्योजक गट नंबर परिसरात आपले छोटे उद्योग थाटून शर्यतीच्या दुनियेत तग धरून आहेत. मात्र या उद्योजकांना एमआयडीसी कडून कोणत्याही प्रकारच्या सुख सुविधा मिळत नसल्याने येथील उद्योजक मेटाकुटीला आला आहे. त्यात भरीस भर म्हणून महावितरणनही याठिकाणी अखंडित वीजपुरवठा करत नाही. त्यामूळे या उद्योजकांची कोंडी होत आहे.

या परिसरात जवळपास ७००ते ८०० लघु उद्योजक असून कच्चा माल घेऊन तयार करून मोठ्या कारखानदारांना पुरवठा करीत आहेत. हे कारखानदार सध्या कोणत्याही सुविधा विना मोठ्या चिकाटीने या शर्यतीच्या दुनियेत लढा देत आहेत. त्यातच महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे दररोज अर्ध्या अर्ध्या तासाला वीज पुरवठा खंडित होत असून त्यामुळे मशीन बंद पडल्यास त्यामध्ये अडकलेला जॉब रिजेक्ट होत आहे. त्यामुळे रोजच नुकसानीचा भार उचलावा लागत आहे. काल गुरुवारी दिवसभर लाईट नसल्याने आज बऱ्याचशा कारखानदारांनी सुट्टीच्या दिवशी कारखाना सुरू ठेवला होता परंतु आजही सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी चार वाजेपर्यंत लाईट बंद असल्याने कामगारांना पगारी सुट्टी देऊन घरी पाठवावे लागले. त्यामुळे येथील उद्योजक चहू बाजूने भरडला जात असून आम्हाला कोणीतरी साथ द्या असा आर्त टाहो सध्या येथील लघु उद्योजक फोडत आहेत.

माझ्याकडे सात मशीन असून दहा कामगार आहेत, मी महावितरणचा नियमित ग्राहक असून, महिन्याला ६० हजार रुपये बिल भरतो परंतु बिल भरूनही मला नेहमीच अखंडीत विज मिळत नाही, त्यामुळे मला दररोज हजारों रुपयांचे नुकसान होत आहे. मी मसिहा संघटनेचा सदस्य आहे. त्या माध्यमातूनही आम्हाला सहकार्य मिळत आहे . आम्हाला अखंडित वीजपुरवठा मिळावा, हीच आमची मागणी असल्याचे वेदांत गुजर, नियोगी इंजिनियरिंग वर्क्स यांनी म्हटले आहे.

मी गेल्या कित्येक वर्षांपासून हा त्रास सहन करत असून, अनेक वेळात महवितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या परंतु आश्वासनाशिवाय आमच्या हाती काहीही पडले नाही अनेक वेळा आंदोलने मोर्चे निवेदने देऊनही गेंड्याचे कातडे पांगरलेले महावितरणचे अधिकारी याकडे लक्ष द्यायला तयार नाही मीही मसिआचा चार वर्षापासून सक्रिय सदस्य आहे. मला दररोज हजार रुपयांचे नुकसान सहन करावे लागत असून बारा कामगारांना घरी बसून पगार देण्याची वेळ येत आहे त्यामुळे फायदाच सोडा कारखानदारांना माल वेळवर पुरवणेही कठीण होऊन बसले आहे. असे विजय चंदनसे, केशरदीप प्रेस चे मालक यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी घेतला निवडणूक तयारीचा आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ (जिमाका):- विधानसभा निवडणूक प्रक्रियेमध्ये नागरिकांचा मतदान प्रक्रियावरील विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी निपक्षपातीपणे आणि पारदर्शकतेने काम करावे असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सर्व नोडल अधिकारी यांना दिले. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात भेट देऊन विधानसभा निवडणूकीसाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी भेट देऊन पाहणी केली व आढावा घेतला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड, उपायुक्त जगदीश मिनीयार, पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी, मनपा अपर आयुक्त रणजीत पाटील व सर्व नोडल अधिकारी या बैठकीस उपस्थित होते .

आदर्श आचारसंहितेचे पालन होण्याबाबत सर्व काही नियमांचे पालन होणे गरजेचे आहे. कोणत्याही मतदारसंघांमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी कायदा सुव्यवस्था व निवडणूक संबंधित प्रत्येक हालचालीवर बारीक लक्ष ठेवून दक्ष राहणे आवश्यक असल्याचे विभागीय आयुक्त गावडे यांनी सांगितले. आचारसंहितापालन करीत असताना वाहन, मनुष्यबळ, इतर व्यवस्था जिल्ह्याच्या ठिकाणी व विधानसभा मतदारसंघनिहाय केलेल्या निवडणूक प्रक्रियेच्या नियोजनाविषयीचा आढावा सादर करण्यात आला. सर्व नोडल अधिकारी आणि मतदारसंघातील यंत्रणा यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. रोख रक्कम बाळगणे व त्याबाबतचे नियम,संवेदनशील मतदान केंद्र, तसेच तक्रारदारास तक्रार करण्यासाठी विविध प्रकारच्या सुविधा प उपलब्धता याविषयी जाणिव जागृती करण्याचे निर्देशही श्री. गावडे यांनी दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये स्थापन करण्यात आलेल्या आचारसंहिता कक्ष, मीडिया कक्ष ,मनुष्यबळ कक्ष, टपाली मतपत्रिका कक्ष, मतदार मदत कक्ष इ.ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

महायुती सरकारच्या माध्यमातून राज्यात साकारण्यात आलेले महत्त्वकांक्षी प्रकल्प विकास कामे व मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी घेतलेल्या जनहितार्थ निर्णयाचा महायुती सरकारची कामगिरी या रिपोर्ट कार्डचे पत्रकार परिषदेत विमोचन करताना शिवसेना नेते पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार सोबत माझी जि.प अध्यक्ष श्रीराम पाटील महाजन ,शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्रीरंग पाटील साळवे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, शंकरराव खांडवे, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल , सयाजी वाघ ,प्रताप प्रसाद आदी दिसत आहेत.

'खिंवसरा प्रॉपर्टी शोकेस'चे आयोजन

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - ग्राहकांना त्यांच्या बजेटमध्ये बसणार्या प्लॉट, घरांचे अनेक पर्याय खिंवसरा ग्रुप 'खिंवसरा प्रॉपर्टी शोकेस'च्या माध्यमातून प्रगतीचा नवीन पत्ता व नवीन उपक्रमाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्राहकांच्या आग्रहास्तव खिंवसरा ग्रुपने चौथे प्रॉपर्टी शोकेस प्रदर्शन दि. १९ व २० ऑक्टोबर २०२४ दरम्यान भरविणार असल्याची माहिती खिंवसरा ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक रविंद्र खिंवसरा यांनी दिली. येणार्या आगामी सण, उत्सवासाठी योग्य घर, बंगलो, प्लॉट्स, फार्म हाऊस किंवा गुंतवणुकीसाठी उत्तम पर्याय नागरिकांना मिळावा, याकरिता खिंवसरा ग्रुपच्या वतीने सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत 'खिंवसरा हेडक्वार्टर्स, प्लॉट नंबर १६, एमआयडीसी चिकलठाणा, विमानतळासमोर जालना रोड येथे प्रॉपर्टी शोकेस प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. स्मार्ट सिटी असलेल्या छत्रपती संभाजीनगर स्वता:चे घर असावे असे स्वप्न बाळगणार्या नागरीकांना प्रदर्शनात भेट देता येईल. प्रत्येकाला हवे असलेले बजेट होम्सचे पर्याय या प्रदर्शनाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार असून हे प्रदर्शन ग्राहकांसाठी पर्वणी ठरणार आहे. प्रदर्शनाच्या माध्यमातून प्रॉपर्टी बुक करणार्यांना मोठ्या प्रमाणात डिस्काउंट देण्यात येणार आहे.

खिंवसरा ग्रुपची ६६ वर्षांची एकनिष्ठा

रिअल इंस्टेट आणि मनोरंजन क्षेत्रातील नाव म्हणजे 'खिंवसरा ग्रुप' होय. गेल्या ६६ वर्षांच्या अनुभवातून हजारो कुटुंबियांचे घराचे स्वप्न पुर्ण करण्यात आले आहे. शहरी जीवन शैलीनुसार लक्झुरिअस घरापासून बंगलो ते सर्व सामान्यांना परवडतील अशा प्रकारचे घरे खिंवसरा ग्रुपने उपलब्ध करुन दिली आहे. यासोबतच त्यानी थ्री डी अद्ययावत सिनेमागृह, बिझनेस सेंटर, हॉटेल्स अशा विविध क्षेत्रांतही आपली वेगळी छाप उमटवली असून समाजकारणातही खिंवसरा ग्रुपचे मोठे योगदान आहे.

शस्त्र बाळगण्यास मनाई

छत्रपती संभाजीनगर, दि.१८(जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. निवडणूक आचारंहितेची अंमलबजावणी सुरु झाली आहे. या कालावधीत निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यास निर्बंध लागू केलेले आहेत. त्यानुसार भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती (दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी, बँक सुरक्षा व्यवस्थेतील अधिकारी) वगळून अन्य व्यक्तिंना परवाना दिलेले शस्त्र बाळगण्यास मनाई करण्याचे आदेश जारी केले आहेत. याबाबत कुणास आक्षेप असल्यास त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात छाननी समिती समोर लेखी अर्ज सादर करुन आपले म्हणणे मांडावे, असे कळविण्यात आले आहे. तसेच या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अन्वये कार्यवाही करण्यात येईल . हे आदेश दि.२५ नोव्हेंबर पर्यंत अंमलात असतील असे कळविण्यात आले आहे.

आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी; जिल्हाधिकाऱ्यांकडून मनाई आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर, दि.१८(जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यासोबतच जिल्ह्यात निवडणूक आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी सुरु झाली असून त्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी विविध मनाई आदेश जारी केले आहेत.

खाजगी इमारत, भिंत इ. चा निवडणूक प्रचार वापरास पूर्व परवानगी आवश्यक

निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तिगत जागा, इमारत, आवार, भिंत इ. चा वापर संबंधित मालकाच्या परवानगी शिवाय तसेच संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय वापर करण्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) (घख)अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

नमूना मतपत्रिका छपाईस निर्बंध

निवडणूक प्रचारा दरम्यान राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने, त्यांच्या प्रतिनिधींनी, हितचिंतकांनी, मुद्रणालयाच्या मालकांनी, प्रकाशकांनी नमुना मतपत्रिका छापतांना उमेदवाराचे नाव, नेमून देण्यात आलेली चिन्हे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद, आकार वापरणे इ. करण्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १२७ (क) अन्वये निर्बंध घालण्यात आले आहे.

ध्वनीक्षेपकाच्या वापरास निर्बंध

निवडणूक प्रचारादरम्यान ध्वनीक्षेपकाचा वापर करण्याबाबत निर्बंध घालण्यात आले आहे. त्यात संबंधित पोलीस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करणे, सकाळी ६ वाजण्यापूर्वी व रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर करण्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे ३३ (एन) अन्वये निर्बंध असून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ति यांनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपक वापर करण्याबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस देणे बंधनकारक आहे.

प्रचार साहित्यामुळे रहदारीस अडथळा करण्यास निर्बंध

निवडणूक प्रचारादरम्यान लावण्यात येणाऱ्या पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट, कटआऊट, पेंटिंग, होर्डिंग, कमानी, घोषवाक्य लिहिणे इ. रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने लावण्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे ३३(१)(घक) अनवये निर्बंध घालण्यात आले आहेत.

शासकीय इमारत, आवार, परिसराचा प्रचारासाठी वापर करण्यास निर्बंध

निवडणूक प्रचारादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, विश्रामगृहे यांच्या इमारत, आवार व परिसरात निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही प्रकारे वापर करण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

नामनिर्देशन दाखल करतांनाचे निर्बंध

उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशन दाखल करतांना, पाच पेक्षा जास्त व्यक्ति निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उपस्थित असणे, नामनिर्देशन दाखल करते वेळी कार्यालय परिसरात मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देणे, वाद्य वाजवणे इ. प्रकारे प्रचार करण्यास तसेच कार्यालयाच्या १०० मिटर परिसरात तीन पेक्षा जादा वाहने आणण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

शस्त्र बाळगण्यास निर्बंध

निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत शस्त्र परवानाधारकांना शस्त्र बाळगण्यास- वापरण्यास, शस्त्र परवाना देण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये हे निर्बंध घालण्यात आले आहेत.

कार्यालय परिसरात आंदोलन करण्यास निर्बंध

निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जिल्हाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तहसिलदार या सर्व कार्यालयांच्या परिसरात उपोषण , मोर्चा, निदर्शने, घेराव इ. आंदोलने करण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये मनाई करण्यात आली आहे.

सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वाहनांवर झेंडे, बॅनर इ.लावण्यास निर्बंध

निवडणूक प्रचारादरम्यान सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वाहनांवर झेंडे, बॅनर, बोधचिन्ह इ. लावणे, घोषवाक्य लिहिण्यास मनाई करण्यात आली आहे.

वरील सर्व निर्बंध, मनाई आदेश हे निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (दि.२५ नोव्हेंबर) पर्यंत अंमलात राहतील,असेही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.

निवडणूक प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ (जिमाका):- मतदान केंद्रावर सुविधा उपलब्ध करणे, मतदारामध्ये जाणीव जागृती निर्माण करुन मतदानाची टक्केवारी वाढविणे अशा निवडणूक प्रक्रियेत शिक्षकांचा महत्त्वाची भूमिका आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आज शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व यांची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना ,शिक्षण अधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती लाटकर, शिक्षणाधिकारी (योजना) श्रीमती अरुणा भूमकर यांच्यासह जिल्ह्यातील विविध शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. जिल्ह्यात मतदान प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त मतदान केंद्र हे शाळेतच असल्यामुळे शाळेमध्ये असणाऱ्या सर्व सुविधांचा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला. शाळेमध्ये असलेले सुरक्षित वातावरण, स्वच्छता, पिण्याचे पाण्याची सुविधा, संरक्षण भिंत, सीसीटीव्ही यंत्रणा आणि आवश्यक फर्निचर या उपलब्धतांबाबत आढावा यावेळी घेण्यात आला. ज्या शाळेमध्ये सुविधा उपलब्ध नाही तेथे तात्काळ सुविधा तयार करून घ्याव्या,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. तसेच आदर्श मतदान केंद्र स्थापन करण्यासाठीही शिक्षकांनी योगदान द्यावे. मतदारांना आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करण्यासाठी योग्य ते नियोजन व खबरदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्ष व तलाठी ग्रामसेवक यांनीही घ्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. निवडणूक प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या शिक्षक व अधिकारी कर्मचाऱ्यांनी निवडणूक कालावधीमध्ये मुख्यालय सोडू नये. याबाबत शिक्षण विभागाने खबरदारी घ्यावी व सर्व शिक्षकांपर्यंत ही सुचना शिक्षण विभागामार्फत सर्व शिक्षक व संबंधित यंत्रणा यांच्या पर्यंत पोहोचवावी असे, निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

रावण का म्हणालास? म्हणून मारहाण

छत्रपती संभाजीनगर : मला रावण का म्हणाला, असे म्हणून मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना पिसादेवी रोड हसूल परिसरात १६ ऑक्टोंबर रोजी घडली. धनसिंग बकले उर्फ रावण (रा. हर्सल गाव) असे आरोपीचे नाव आहे. रामलाल विठ्ठल दुधे (४१ रा.हसूल पिसादेवी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार फिर्यादी हे आरोपीच्या ओळखीचे असून त्यांनी आरोपीला भेटल्यानंतर म्हणाले की, काय रावण काय चालले, त्यावरून आरोपीने फिर्यादीस म्हणाला की, मला रावण का म्हणाला असे म्हणून रस्त्यावर पडलेल्या दगडाने फिर्यादीच्या कपाळावर मारून जखमी केल्या प्रकरणी हसूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

बहिणीला नांदवत नसल्याने केली मारहाण

छत्रपती संभाजीनगर : तु आमच्या बहिणीला का नांदवत नाहीं. असे सांगून मोहसिन शेख इब्राहिम (वय ३७, रा. खासगेट) याला मोहसिन शेख यांचे राईदा बेगम शेख सलीन (वय ५९), साला नामे समीर शेख सलीन शेख, दूसरा साला नामे अबरार शेख सलीन शेख (सर्व रा. कैंसर कॉलनी) तसेच चुलत सासरा मोईन यांनी शिवीगाळ करून हाताचापटाने तसेच लोखंडी गजाने मारहाण केली. ही मारहाण १४ ऑक्टोबर रोजी १.३० दुपारी खासगेट येथे घडली. या प्रकरणी मोहसीन शेख इब्राहिम यांच्या तक्रारीवरून मारहाण करणाऱ्या चौघांच्या विरोधात जिन्सी मोलिस खाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धमकी का दिली? विचारले म्हणून मारहाण

छत्रपती संभाजीनगर- मला फोनवर का धमकी दिली. अशी विचारणा चैतन्य बंडू बोरसाने (वय ३७, रा. अंबीकानगर, मुकुंदवाडी) यांनी कारभारी बन्सी भगुरे यांना केली. या कारणावरून कारभारी बन्सी भगुरे, निर्मला कारभारी भगुरे (दोघे रा. बाझही, शेंद्रा एमआयडीसी), रामेश्वर कारभारी भगुरे, रवी प्रल्हाद पिंपळे (दोघे रा. एन ७ पोलिस चौकीजवळ) यांनी बेल्टने नारहाण केली. तरोच दगहाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या दरम्यान घडली. या प्रकरणी चैतन्य बोरणाने यांच्या तक्रारीवरून मारहाण करणाऱ्या चौघांच्या विरोधात मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शटर उचकटून २४ हजाराच्या मालाची चोरी

छत्रपती संभाजीनगर : पुंडलिकनगर भागातील गल्ली नंबर २ येथे असलेल्या कोमल साडी सेंटर ॲण्ड ब्यूटी पार्लर नावाच्या दुकानाचे शर्टर उचकटून दुकानातून ३०-४० साठ्या, आर्टीफिशीयल ज्वेलरी, तसेच मल्ल्यातील पैसे असा एकुण २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरण्यात आला. ही चोरी १३ ऑक्टोबर रोजी रात्री १०.३० पासून ते १४ ऑक्टोबरच्या सकाळी ७ वाजेच्या दरम्यान करण्यात आली या प्रकरणी पुजा विष्णु काटे (वय ४०, रा. गजाननगर) यांच्या तक्रारीवरून पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अग्रवाल जैन मंदिरातील अखंड चोवीस तास अनुष्ठान महायज्ञास प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर : अग्रवाल दिगंबर जैन मंदिर सुदर्शननगर हडको येथे आचार्य कुशाग्रनंदी गुरुदेव, मुनी अजयऋषी, डॉ. देवेंद्रकिर्ती स्वामी यांच्या सानिध्यात कल्याणमंदिर उवसग्गहरण स्तोत्र, महाअनुष्टान, अखंड २४ तास महायज्ञ धार्मिक कार्यक्रमास बुधवारी सकाळी उत्साहात प्रारंभ झाला. सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांचे महागुरू अंतिम श्रुतकेवली आचार्य भद्रबाहू तसेच कलिकाल सर्वज्ञ कुमुदचंद्र यांच्या अंतरंग भावनेतून प्रकट झालेले चमत्कारी महाकाव्य तसेच कारंजा पिठाधिश्वर भूमंडलाचार्य स्वस्तिश्री भट्टारक देवेंद्रकिर्ती महास्वामी यांचे मंत्र यंत्र तंत्र साधनेच्या महास्तुतीमध्ये २४ तास तिर्थंकर आराधना, अखंडपाठ, महायज्ञ, साधना, अनुष्ठान अखंड २४ तास चालेल. यामध्ये असंख्य भाविकांनी सहभाग घेलला अशी माहिती प्रशांत शहा यांनी दिली.

ॲड. अनघा पेडगावकर यांना गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीमधून पीएचडी प्रदान

छत्रपती सभाजीनगर : ॲड. अनघा पेडगावकर यांना गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मधून पीएचडी प्रदान करण्यात आली. अनघा यांनी अतिशय लहान वयात ॲनालिसिस - ऑफ लॉ ॲप्लिकेबल टू विच हंटिंग इन इंडिया विथ स्पेसिअल रेफेरेंस टू छत्तीसगढ़ स्टेट या विषयावर संशोधन केले. त्यांना बुधवारी भारतातील नामांकित विधी विद्यापीठातून गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मधून पीएचडी प्रदान करण्यात आली. त्यांनी यापूर्वी दिली येथे लॉ कमिशन ऑफ इंडिया नॅशनल ह्यूमन राईट्स कमिशन अँड मिनिस्ट्री ऑफ लॉ अँड जस्टीस येथे पण काम केले आहे. आणि सध्या त्या मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे वकील म्हणून काम करतात आणि महाराष्ट्र विधी विद्यापीठ येथे मुलांना सुद्धा शिकवतात.

जिल्ह्यातील ५ विधानसभा मतदार संघ निवडणूकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

३३ हजार ४७ नवीन मतदारांचा समावेश- डॉ.पांचाळ

जालना/प्रतिनिधी

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी जालना जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीकांत हदगल यांची उपस्थिती होती. विधानसभा मतदानासाठी यावेळी पहिल्यांदाच आपला हक्क बजावणार्या नव मतदारांमध्ये ३३ हजार ४७ उमेदवारांचा समावेश आहे त्यामध्ये २०८०९ पुरुष, १२३३६ स्त्री, तर दोन तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

जिल्ह्यात एकूण पाच मतदारसंघ आहेत. त्यामध्ये परतुर विधानसभा मतदारसंघात तीन लाख १७ हजार ६४०, घनसावंगी विधानसभा मतदारसंघात तीन लाख २४ हजार ६५०, जालना ३ लाख३६ हजार ४४७, बदनापूर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. तिथे तीन लाख २८ हजार १०९, भोकरदन तीन लाख १७ हजार ९७ अशा एकूण १६ लाख २३ हजार ९४३ मतदारांमध्ये आठ लाख ४७ हजार ७७७ पुरुष, सात लाख ७६ हजार १२६ स्त्री तर ४० तृतीयपंथी मतदार आहेत. दरम्यान अजूनही ज्या मतदारांची नावे यादीत आलेली नाहीत अशा मतदारांनी २० ऑक्टोबर पर्यंत आपली नावे तपासावीत आणि यादीमध्ये लावून घ्यावीत असे आवाहन जिल्हाधिकार्यांनी केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत

जालना, दि.१८ : इयत्ता अकरावी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाहभत्ता व इतर आवश्यक सुविधावर खर्च करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू केली आहे. तरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांनी hrrqt://hmar.mahait.org या पोर्टलवर दि. ३१ नोव्हेंबर २०२४ पर्यत ऑनलाईन सादर करावेत. असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. योजनेतंर्गत जालना महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावी तसेच बारावी नंतर व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात शिकणार्या विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार देय असलेली रक्कम मंजुर केली जाते.

भाजपचे नेते देविदास राठोड मोठा निर्णय घेणार?

महाराष्ट्रात बंजारा समाजाची भूमिका निर्णायक ठरणार- विशाल पवार

तभा वृत्तसेवा
देगलूर,दि. १८ ऑक्टोबर

भाजपचे प्रदेश सचिव व बंजारा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष देविदास राठोड गेल्या तीस वर्षांपासून भाजपमध्ये निष्ठापूर्वक सक्रिय असून, लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील वाडी, तांड्यापर्यंत भाजप पोहोचवण्याचं काम देविदास राठोड यांनी केले असून, भाजपने मात्र कायम त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. वेळोवेळी विधान परिषदेवर घेण्याचे आश्वासन देऊन ऐनवेळी त्यांना भाजपने डावळले असल्यामुळे नाराज असलेले भाजपचे नेते देविदास राठोड हे मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असून, बंजारा क्रांती दलाच्या पदाधिकाऱ्यांची राज्यव्यापी बैठक दि. २० ऑक्टोबर रोजी नांदेड येथे आयोजित केली आहे, अशी माहिती बंजारा क्रांती दलाचे प्रवक्ते तथा माजी पंचायत समितीचे सदस्य उत्तम चव्हाण यांनी दिली.

बंजारा क्रांती दलाच्या माध्यमातून समाजकारणातून राजकारणात देविदास राठोड सक्रियपणे महाराष्ट्रभर काम करत आले आहेत. तत्कालीन केंद्रीय ग्रामविकासमंत्री, लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात भाजप वाडी, तांडा पर्यंत नेण्याचं काम भाजपचे प्रदेश सचिव देविदास राठोड यांनी केले आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या निधनानंतरही त्यांच्या पाश्चात भाजप नेत्या आमदार पंकजाताई मुंडे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, एकनाथराव खडसे, विनोद तावडे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, माजी मंत्री व खासदार रावसाहेब दानवे यांच्यासोबत भाजपचे काम करत राहिले.

त्यांचा फायदा कर्नाटक, आंध्रा, तेलंगणा, गुजरात, मध्य प्रदेश या राज्यातही भाजपला झाला. पक्षाचे जेव्हा जेव्हा आदेश आले. तेव्हा लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत देविदास राठोड यांनी जीवाचे रान करून भाजपच्या उमेदवाराला निवडून आणण्याचे काम केलं. गेल्या ३० वर्षांपासून भाजपमध्ये एकनिष्ठेने सक्रिय असताना सुद्धा भाजपने त्यांना राजकीय फायदा कुठेच करून दिला नाही. वेळोवेळी त्यांना विधान परिषदेवर घेऊ असे आश्वासित करून त्यांना प्रत्येक वेळी भाजपने व भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी देविदास राठोड यांना डावळण्याचं काम केल्यामुळे भाजप नेते देविदास राठोड हे प्रचंड नाराज आहेत. काल परवा झालेल्या राज्यपाल नियुक्त विधान परिषदेच्या आमदारांमध्ये त्यांचा समावेश न झाल्यामुळे राज्यभरातील बंजारा समाजाचे कार्यकर्ते आणि बंजारा क्रांती दलाचे पदाधिकारी यांच्यात असंतोष पसरला आहे. देविदास राठोड यांनी ठोस निर्णय घेतलाच पाहिजे याकरिता २० ऑक्टोबर रोजी नांदेड येथील गुरुद्वारा सभागृहात राजव्यापी पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील बैठक बंजारा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष देविदास राठोड यांच्या नेतृत्वाखाली होणार असून या बैठकीसाठी राज्यातील बंजारा समाजाचे महंत त्याचबरोबर माजी खासदार हरिभाऊ राठोड, बंजारा क्रांती दलाचे युवकाचे प्रदेश उपाध्यक्ष विद्यानंद राठोड, क्रांती दलाचे प्रदेशाचे उपाध्यक्ष सुंदरसिंग जाधव, सर्व जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीस देगलूर तालुक्यातील बंजारा समाज हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विशाल पवार यांनी केले आहे.

आदिवासी कोळी महादेव जमातीकडून देव-देवता व महापुरुषाचे स्मरण

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ ऑक्टोबर

मौजे वडेपुरी ता. लोहा येथे आदिवासी कोळी महादेव जमातीच्या देव देवता व महापुरुष यांचे स्मरण करून त्यांच्या विचारांची पूजा करण्यात आले. मराठवाड्यातील आदिवासी महादेव कोळी जमातीच्या इतिहासावर सुद्धा प्रा डॉ भगवान गुंजलवाड प्रकाश टाकला. मराठवाड्यातील बालाघाट हेआदिवासी कोळी महादेव जमातीचे पारंपारिक वसतीस्थान असताना सुद्धा येथील लोकांना जातीच्या प्रमाणपत्र पासून वंचित रहावे लागते. ही खेदाची बाब आहे. चौदाव्या शतकात दुष्काळ पडला आणि हळूहळू पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः अहमदनगर पुणे, नाशिक जुन्नर भागात मराठवाड्यातील कोळी महादेव जमातीचे स्थलांतर झाले. अशा प्रकारच्या नोंदी ब्रिटिश अधिकारी, इतिहासकार, विविध सरकारी गॅझेट यांनी घेतल्या आहेत.पण काही आदिवासी कोळी महादेव जमातीच्या लोकांनी स्थलांतर केले नाही, ते म्हणजे मराठवाड्यातील आत्ताचे आदिवासी महादेव कोळी/मल्हार कोळी जमात होय. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी, डोंगर कोळी, टोकरे कोळी या तत्सम जमातीची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र या जमातीला सुलभतीने जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी जाणून बुजून अडचणी आणल्या जात आहेत. याबाबतचे मुख्य कारण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी आहेत. त्यांच्या आदेशाप्रमाणेच जात पडताळणी समितीचा कारभार चालत असतो. या संशोधन समितीवर त्याच प्रवर्गातील अधिकार्यांची नेमणूक गेल्या अनेक वर्षापासून असल्यामुळे महाराष्ट्रातील ठराविक जमातीला सवलतीचा लाभ मिळत आहे. तर या प्रवर्गातील अन्य जमातीवर सातत्याने अन्याय होत असल्याने भेदभावाची भावना निर्माण झाली आहे. सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित केलेल्या ६ ऑगस्ट २०२४ रोजीच्या बैठकीतच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे येथील आयुक्त यांनी महादेव कोळी जमातीबद्दल अपशब्द वापरले. म्हणून मा. मुख्यमंत्र्यांनी सभा पुढे ढकलली. मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी, डोंगर कोळी यासह तत्सम जमातीच्या प्रतिनिधींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्राच्या अधिसूचित क्षेत्रात राहणारी आदिवासी कोळी महादेव व तत्सम जमातीची लोकसंख्या सात लाख आहे आणि अधिसूचित क्षेत्राच्या बाहेर राहणारी आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे कोळी जमातीची लोकसंख्या १० लाख असून यांना त्यांचा लाभ मिळू दिला जात नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन आणि आदिवासी विभागाने याकडे लक्ष घालून वर्षानुवर्षे प्रलंबित असणाऱ्या प्रश्नाला त्वरित वाचा फोडावी. मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील कोळी महादेव, कोळी मल्हार व टोकरे कोळी इत्यादी तत्सम जमात बांधवांना समानतेच्या दृष्टिकोनातून न्याय मिळवण्यासाठी त्या संशोधन व प्रशिक्षण समिती पुणे येथे आणि उपसंचालक, जात प्रमाणपत्र तपासणी या समितीवर बिगर आदिवासी (नॉन ट्रायबल) अधिकाऱ्याची नेमणूक करणे. अशा प्रकारची मागणी पुढे येत आहे. याप्रसंगी माझी उपसरपंच शिवाजीराव दळवी, बंटी दळवी, चेअरमन शेवाळे, वैजनाथ दळवे, ग्रामपंचायत सदस्य नारायण गुंजलवाड, पोलीस पाटील संतोष गुंजलवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रा.डॉ. भगवान गुंजलवाड, अमृता संकेवाड, बळीराम तंगडपलेवाड, दिगंबर यलपुलवाड, पिंटू यलपूलवाड, प्रभू यलपुलवाड, तानाजी शेटेवाड, पांडुरंग तंगडपल्लेवाड, बालाजी यलपुलवाड, विश्वनाथ गुंजलवाड, आनंदा बोंडलवाड, संभाजी बोईनवाड, इत्यादी जमात बांधव उपस्थित होते.

मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस् बँकेच्यावतीने सभासदांना लाभांष वाटप

जालना/प्रतिनिधी

१६ ऑक्टोबर २०२४ रोजी बँकेच्या न्यु मार्केट यार्ड शाखेत अडतीया असोसिएशनचे अध्यक्ष श्री ओमप्रकाश मंत्री प्रमुख अतिथी यांचे स्वागत बँकेचे अध्यक्ष सीए श्री गोपाल अग्रवाल यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष श्री अनिलजी सोनी, पालक संचालक श्री अंकुशजी राऊत, श्री विरेंद्र रूणवाल यांच्या उपस्थितीत सभासदांना प्रतिकात्मक लाभांष वाटप करण्यात आले. यावेळी शाखा सल्लागार श्री नरेशजी गुप्ता, श्री रमेश तोतला, श्री नंदकिशोरजी अग्रवाल, श्री निवृत्ती महाराज पाचफुले, श्री गेंदालालजी झुंगे उपस्थित होते. बँकेचे अध्यक्ष सीए श्री गोपाल अग्रवाल यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना न्यु मार्केट यार्ड येथील सभासद व्यापारी यांचे सहकार्यामुळे शाखा व बँकेची उत्तरो-उत्तर प्रगती झाली आहे व असेच सहकार्य शाखेस मिळत राहील ही अपेक्षा व्यक्त केली. प्रमुख अतिथी श्री ओमप्रकाश मत्री यांनी बँकेची प्रगती व कामकाजा विषयी प्रशंसा केली. व्यापार्यांनी या बँकेत जास्तीत जास्त खाते उघडावी व डिपॉझिट ठेवावीत असे सुचविले.

यावेळी प्रतिकात्मक लाभार्थी म्हणुन सभासद व्यापारी श्री ताराचंदजी कुचेरीया, श्री प्रदिपजी बजाज,

श्री जयकुमारजी अग्रवाल, श्री राजेशजी भंडारी, श्री जयलालजी सावजी, श्री राजेंद्रजी भरतीया यांना लाभांषाचा धनादेश मान्यवरांचे हस्ते देण्यात आला. यावेळी श्री परिमल हिस्वनकर, श्री संजयजी कानडे, श्री घोडकेजी, श्री रामेश्वरजी बोडखे, श्री रमेशजी सावजी, श्री हरीरामजी मिसाळ, रविंद्र संचेती , बँकेचे महाव्यवस्थापक श्री राजेंद्र टोकशा उपस्थित होते.

श्री नरेंद्रजी अग्रवाल यांनी सुत्र संचलन केले व आभार प्रदर्शन उपाध्यक्ष श्री अनिलजी सोनी यांनी केले.

रिक्षा चालकाच्या मदतीने वाचले विद्यार्थिनींचे प्राण

छत्रपती संभाजीनगर : शाळेतच अत्यवस्थ झालेल्या विद्यार्थिनींना तात्काळ इस्पितळात घेऊन जात रिक्षाचालक अशोक कांबळे यांनी त्यांचे प्राण वाचवले. संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

१५ ऑक्टोबर रोजी शारदा मंदिर कन्या प्रशालेच्या इयत्ता आठवीच्या शेरनी राठोड आणि हर्षदा कुलकर्णी या दोन विद्यार्थिनी अचानक अत्यावस्थ झाल्या. शेरनी राठोड हीच्या तब्येतीची परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ताबडतोब वैद्यकीय उपचारासाठी प्रशालेतील परिवहन सेवेतील अशोक कांबळे यांनी आपल्या वाहनातून तत्पर सेवा उपलब्ध करून दिली. यांच्या तत्परतेमुळे विद्यार्थिनीला वेळेवर उपचार मिळाले. सरचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर यांनी शेरनी या विद्यार्थीनी वर तात्काळ प्राथमिक वैद्यकीय उपचार केल्यामुळे विद्यार्थिनींच्या प्रकृतीत सुधारणा झाली. यासाठी प्रशालेतील ग्रंथपाल महेश कुलकर्णी तसेच क्रीडा शिक्षिका हेमलता पवार, श्रावणी तुलसी आणि चतुर्थ श्रेणी मानधन कर्मचारी अभिषेक कोठुळे, श्रीमती सोनवणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांनी दाखविलेल्या या माणुसकी बद्दल प्रशालेच्या मुख्याध्यापिका डॉ. सविता मुळे यांनी सर्वांचे कौतुक केले व इथून पुढेही अशाच सहकार्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मनपा कर्मचाऱ्यांनी केला 'त्या' घटनेचा निषेध; महापालिकेत उमटले संतप्त पडसाद

छत्रपती संभाजीनगर : महापालिकेच्या झोन क्रमांक १ मधील कनिष्ठ अभियंता संजय कुलकर्णी यांना ठेकेदार न्यू सागर एस. कन्स्ट्रक्शनचे सलोकसिंग कलानी यांनी मारहाण केली. ड्रेनेज लाइन कामाची पाहणी करण्यास गेलेल्या कुलकर्णीसोबत मोजणीवरून वाद घालून कलानीने शिवीगाळ करून लाकडी दांड्याने मारहाण केली.

विनयभंगाच्या प्रकरणात अडकविण्याची व जीवे मारण्याची धमकीही दिली. त्यामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांनी महापालिकेत निषेध आंदोलन करून या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. कनिष्ठ अभियंता संजय कुलकर्णी यांनी छावणी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, की पडेगावातील फिरदोस गार्डन येथे कलानी यांनी ड्रेनेज लाइनचे काम केले. कामाची पाहणी करण्यास ते आणि कर्मचारी सचिन परदेशी गेले होते.

मोजणीवरून वाद वाढत गेला. ठरलेल्या कामापेक्षा ठेकेदाराने कमी काम केले होते. तशी नोंद कुलकर्णी घेत असताना कलानी याने विरोध केला. त्यानंतर शिवीगाळ करत लाकडी दांड्याने मारहाण केल्याची घटना घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. कुलकर्णी यांना कंत्राटदाराने केलेल्या मारहाणीची घटना महापालिकेत कळताच

सर्व अधिकारी, कर्मचारी संतप्त झाले. त्यांनी मुख्यालयात जोरदार निदर्शने केली. ब्लॅकमेल करणाऱ्या कंत्राटदारांना ब्लॅक लिस्ट करण्याची मागणी प्रशासकांकडे केली.

नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

जालना/प्रतिनिधी - भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ साठी कार्यक्रम दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणार्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणार्या मालकांनी तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमुन देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे तसेच आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे आदिवर निर्बंध घालण्यात आले आहेत. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता महातोले यांनी स्वीकारला पदभार

छत्रपती संभाजीनगर : महावितरण छत्रपती संभाजीनगर शहर विभाग क्रमांक ०१ येथे कार्यकारी अभियंतापदी प्रसाद महातोले रूजू झाले आहेत. मूळचे संभाजी नगर निवासी असलेले महातोले हे या पुर्वी प्रकाशगड मुख्यालयी देयके आणि महसुल विभागात कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांनी जिंतूर, परभणी, जळगाव येथे महावितरणच्या विविध क्षेत्रीय कार्यालयात भरीव कामगिरी केलेली आहे. तसेच त्यांनी वीज वितरण क्षेत्रातील खाजगी कंपनी टोरंट पॉवर आग्रा, भिवंडी आणि क्रॉम्प्टन ग्रीव्हज जळगाव येथे काम केलेले आहे.

सहारा व्यसनमुक्ती केंद्राकडून मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती जनजागृती

छत्रपती संभाजीनगर : शहरातील कर्णपुरा यात्रेमध्ये सहारा व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून व्यसनमुक्ती विषयक व मानसिक आरोग्य संबंधित घोषवाक्याची फलक हातात घेऊन घोषणा देऊन गर्दीच्या ठिकाणी तरुण-तरुणी नागरिकांमध्ये जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने १० ऑक्टोबर रोजी जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी व्यसनमुक्ती व मानसिक आरोग्य संदर्भातील पत्रक वाटण्यात आली. रॅलीत केंद्राचे संचालक सुनील बढे, संचालक के. के. सोनवणे, आरोग्य कीर्तनकार डॉ. एम. डी. संकपाळ समवेत केंद्राचे समुपदेशक शिल्पा थोरात, सोशल वर्कर ऋषिकेश काकर, सागर काळे, संदीप इंगळे, सौरभ ढोणे, निवृती तांगडे, रोशन पाटील, कल्पना गायकवाड, सविता येवले तसेच बहुसंख्य तरुणांनी सहभाग नोंदविला.

पिआर कार्डसाठी नागरी विकास समितीने घेतली विरोधी पक्षनेते यांची भेट

छत्रपती संभाजीनगर : विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना नागरी विकास समिती वतीने निवेदन दिले. यावेळी त्यांनी ज्या घर मालकाकडे रजिस्ट्रीमुळे मालकाकडून झाली असेल त्याला पिआर कार्ड देणे आवश्यक आहे. अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची भेट घेऊन केली.

क्रांती चौक कार्यालय येथे नागरी विकास समिती व नागरी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने निवेदन व पुरावे सादरीकरण केले. आठ दिवस आधी आंदोलन केले. मालकी हक्क पिआर कार्ड संबंधित चर्चा केली. यावेळी बोलताना सांगितले की, जर मुळं रजिस्ट्री मालकीची असेल तर पिआरकार्ड दिले पाहिजे. त्यावर एल. डी. ताटू यांनी सांगितले की, नगर भूमापन अधिकारी कार्यालय याचं पत्र सिटी सर्व्हे विभागात गुंठेवारी भाग हस्तांतरित झालेला नाही. त्यावर मनपा व जिल्हाधिकारी यांनी अद्यादेश काढून निर्णय घेतला पाहिजे. अशी मागणी अध्यक्ष एल. डी. ताटू, कल्याण शिंदे, अविनाश सोनवणे आदीनी केली आहे.

छठ पूजेसाठी जागा उपलब्ध व तलाव स्वच्छ करा; उत्तर भारतीय नागरिकांनी केली मागणी

छत्रपती संभाजीनगर : रांजणगाव शेणपुंजी ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या संख्येने उत्तर भारतीय लोक राहतात. त्यांचा सर्वात मोठा सण उत्सव म्हणजे छठ पूजा. ज्यामध्ये लोक आपल्या कुटुंबासह तीन दिवस उपवास करतात आणि नंतर संध्याकाळी तलावामध्ये मावळत्या सूर्याची आणि सकाळी उगवत्या सूर्याची पूजा करतात. त्यासाठी छठ पूजेसाठी जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच तलावाची स्वच्छता करण्यात यावी. अशी मागणी उत्तर भारतीय नागरिकांनी केली आहे.

ग्रामपंचायत रांजणगाव शेपू अंतर्गत उत्तर भारतीय नागरिकांच्या छठ पूजा उत्सवासाठी परिसरात तलाव बांधावा.

अशी मागणी भाजपा उत्तर भारतीय मोर्चाचे नरेंद्रसिंग यादव, कैलाश यादव, राजेश सिंह, मनोज तिवारी, अरुण गौड, रमेश गिरी, प्रमोद सिंग, अमोघ प्रजापती, राम कुमार, सूर्यभान माळी, राजेश कुशवाह, राजाराम यादव, बच्चा सिंग, शिव शंकर भरतवाज, अरविंद सिंग, उपेंद्र श्रीवास्तव, पादिपसिंग, प्रमोद सिंग, सुनील सिंग, धर्मेंद्र प्रसाद, अजय सिंग, राजेश कुंवर, बहादूर सिंग, जयकुमार सिंह, जयदेव सिंग, कुमार बाजपेयी, राजेश सुनील सिंग, पार्थनाथ सिंग, रमेश शर्मा, वैद्यनाथ दास, कोषाध्यक्ष महेंद्र पाठक राहुल सिंग, सुरेंद्रसिंग ढेक, अनिलकुमार सिंग, अजय राजपूत आदीनी केली आहे.

संक्षिप्त वृत्त...

जिल्ह्यात रविवारी होणार मतदार याद्यांचे चावडी वाचन

धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे.त्या अनुषंगाने गेल्या दोन महिन्यापासून मतदार याद्यांचे पुनरीक्षण कार्यक्रम करण्यात आला.या पुनर्नरीक्षण याद्यांचे जिल्ह्यात रविवार २० ऑक्टोबर २०२४ रोजी चावडी वाचन करण्यात येणार आहे. ग्रामीणस्तरावर ग्रामपंचायत कार्यालय व शहरी भागात वार्डनिहाय चावडी वाचन घेवून त्यामध्ये मतदार यादीचे वाचन करण्यात येणार आहे.मतदार यादीचे चावडी वाचन करते वेळी संबंधीत केंद्रस्तरीय अधिकारी, केंद्रस्तरीय पर्यवेक्षक,ग्रामसेवक, तलाठी यांच्यासह राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व राजकीय पक्षांचे म तदान केंद्रावरील प्रतिनिधी यांची उपस्थिती महत्वाची राहणार आहे. चावडी वाचनाच्या वेळी मतदार यादीतील नावास आक्षेप असल्यास मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार यांना कळविण्यात यावे.चावडी वाचनात प्राप्त होणाऱ्या तक्रारीची चौकशी करून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. रविवारी २० ऑक्टोबर रोजीच्या चावडी वाचनास गावातील व शहरातील वार्डातील मतदारांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

खाजगी/सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध

धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या प्रक्रियेस १५ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीसाठी आदर्श निवडणूक आचार संहिता लागू केलेली आहे. भारत निवडणूक आयोगास भारतीय राज्यघटनेचे कलम ३२४ खाली प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन ही निवडणूक विनाअडथळा व शांततेने पार पाडण्यासाठी निवडणूकीच्या काळात राजकीय पक्षांनी,निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी निवडणूकीच्या प्रचारासाठी झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहिणे, इत्यादीकरिता कोणत्याही व्यक्तीची जागा, इमारत, आवार व भिंती इत्यादीवर संबंधित मालकाची परवानगीशिवाय व संबंधित परवाना प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वापर करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या शक्तीचा वापर करुन निवडणूकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा,इमारत , आवार व भिंत इत्यादीचा संबंधित जागा मालकाचे परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वापर करण्यास २५ नोव्हेंबरपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

नमुना मतपत्रिका छापतांना काही बाबींवर निर्बंध

धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या प्रक्रियेस १५ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर ते दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीसाठी आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू केली आहे. ही निवडणूक विना अडथळा व शांततेने पार पाडण्यासाठी निवडणूकीच्या काळात राजकीय पक्षांनी,निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे म ालकाने व इतर सर्व माध्यमांद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना खालील बाबींवर निर्बंध घातले आहे. इतर उमेदवाराचे नाव व त्यांना नेमुन देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे,नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे २५ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घातले आहेत.हे आदेश १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबरपर्यंत संपूर्ण धाराशिव जिल्हयात लागू राहणार आहे.

राष्ट्रवादी आग्रही; उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे कार्यकर्त्यांचे साकडे

धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघ महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडावा अशी भूमि का कार्यकर्त्यांनी घेतली आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन धाराशिव-कळंब विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष मोहन मुंडे यांनी केली आहे. दरम्यान हा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसला नक्की सोडवून घेण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

१५ दिवसात ८८ गुन्हे दाखल,१५ लाखाचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग धाराशिवच्या वतीने जिल्ह्यात विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली.या कारवाईत १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.जिल्ह्यात विविध ठिकाणी १ ऑक्टोबरपासून ८८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भारत निवडणूक आयोगाद्वारे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक - २०२४ कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून,आचारसंहिता १५ ऑक्टोबरपासून लागू करण्यात आली आहे.

आचारसंहिता सुरु होण्यापूर्वी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग धाराशिव कार्यालयाच्या वतीने अवैध मद्य निर्मिती,वाहतूक व विक्रीवर पूर्ण प्रतिबंध करण्याकरिता कठोर कारवाई करणे सुरु केले आहे. ही कारवाई १ ऑक्टोबरपासूनच सुरू करण्यात आली आहे.

१५ ऑक्टोबरपर्यंत ८८ गुन्हे नोंदविले आले आहेत.या गुन्ह्यांतील ८० जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.२ वाहने जप्त करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन विभागाच्या जिल्हयात करण्यात आलेल्या कारवाईत हातभट्टी तयार करण्यासाठी लागणारे २७ हजार ३०० लिटर रसायन जप्त केले आहे. तर १८४५ लिटर हातभट्टी जप्त करण्यात आली आहे.यात देशी दारु २०९.७८ लिटर,विदेशी दारु ९५.७६ लिटर,ताडी १५६५ लिटर असा सर्व मिळून १५ लाख २९ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसचे आचारसंहिता कालावधीमध्ये अवैध मद्य,अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर कठोर कारवाई करण्याच्या सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्नाटक राज्याच्या सिमेवरील तलम ोड ता.उमरगा येथील सिमा तपासणी नाक्यावरील अधिकाऱ्यांना अत्यंत दक्ष राहून परराज्यातून येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करणेबाबत,सिमावर्ती भागातील मद्य विक्रीच्या अनुज्ञप्त्यावर पाळत ठेवणेबाबत तसेच निवडणूक आचारसंहिता कालावधीत परराज्यातून बेकायदेशीरपणे मद्य जिल्हयात येणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हयातील महत्वाच्या अनुज्ञप्तीमधील व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याकरिता या अनुज्ञप्तीमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

तसेच सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्तींच्या दैनंदिन व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हयात कार्यरत असणारे मद्य निम र्माण घटक व मद्यार्क निर्मिती करणारे घटक यांचे व्यवहारांवर देखील नियंत्रण ठेवण्याकरिता अनुज्ञप्तीमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच सदर अनुज्ञप्तीवरील पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना अनुज्ञप्तींच्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री इ.वर कारवाईकरिता तसेच परवानाधारक मद्यविक्री अनुज्ञपतींच्या निरीक्षणाकरिता एकूण ४ निरीक्षकांच्या अधिपत्याखाली ४ पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.

त्यांच्या मदतीकरिता मद्य निर्माणी घटकावरील व मद्यार्क निर्मिती करणाऱ्या घटकांवरील एकूण ६ अधिकाऱ्यांची नेम णूक करण्यात आली आहे.

पथकातील सर्व अधिकाऱ्यांना अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री इ.वर कठोर कारवाई करण्याच्या तसेच जिल्हयातील हॉटेल्स/ढाबे यांची तपासणी करुन अवैध मद्य विक्री करणाऱ्या ढाबा चालक/मालक व सदर ठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत .

अनियमितता आढळून येणाऱ्या परवानाधारक मद्यविक्री अनुज्ञप्तीवर नियम ातील तरतूदीनुसार कारवाई करण्याच्या सूचना देखील पथकातील सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.हॉटेल्स / ढाब्यांवर अवैधरित्या मद्यविक्री करणे त्याचप्रमाणे या ठिकाणी जाऊन मद्य सेवन करणे हा मुंबई दारुबंदी कायदा १९४९ नुसार गुन्हा आहे.

कोणीही अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स/ढाब्यांवर जाऊन मद्य सेवन करु नये. अवैध मद्य विक्री करणाऱ्या हॉटेल्स / ढाब्याबाबत माहिती असल्यास तसेच अवैध मद्य निर्मिती,वाहतूक व विक्रीबाबत माहिती असल्यास राज्य उत्पादन शुल्क,विभागाकडील टोल फी क्रमांक १८००२३३९९९ अथवा व्हॉटस् प क्रमांक ८४२२००११३३ वर माहिती द्यावी.माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव गोपनिय ठेवण्यात येईल.असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक गणेश बारगजे यांनी केले आहे.

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात टेबल टेनिस स्पर्धा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.चंद्रजीत जाधव, प्रा.डॉ.उमेश सलगर, म हाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.समीर बाविकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेमधून धनंजय देशमुख, सुशांत मगर, प्रतीक संकपाळ, प्रथमेश पाटील हे हे खेळाडू पुढील फेरीसाठी पात्र ठरले आहेत. यशस्वी ठरलेल्या खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले, तसेच पुढील फेरीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दोन महिला लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

आई राजा उदो उदो..च्या जयघोषाने येरमाळा नगरी दुम दूमून गेली असुन श्री.येडेश्वरी देवीच्या कोजागीरी पौर्णिमा म होत्सवानिमित्त रविवारी दि.१७ रोजी रात्री नऊ वा.देविच्या तांदळावर शोभणिय चंद्राची महापुजा काढण्यात आल्यानंतर पुजारी व मानकरी यांच्या हस्ते विधिवत महापंच्चोपचार पुजा, म हाआरती करण्यात आली. देविचा पालखीसह छबिना काढण्यात आला. अशाप्रकारे येडेश्वरी देवीचा कोजागीरी पौर्णीमा शारदीय नवराञ महोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येऊन शारदीय नवराञत्सवाची सांगता करण्यात आली.

कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेची धाकटी बहीन म्हणून ओळख असणाऱ्या आई येडेश्र्वरी देवीच्या नवराञ महोत्सवातील आज अश्विन पौर्णिमा निमित्त दि.१७ गुरूवारी रात्री नऊ वा. कोजागिरी पौर्णिमेनिमीत्त देवीची विधिवत महाआरती करण्यात आली.

देवीस आवड असलेल्या नागवेलीच्या व बकाड्या लिंबाच्या पानाने देवीच्या तांदळावर बारवाची विधिवत महापुजा म हापंच्चौपचार महापुजा, महाआरती केल्यानंतर पालखीसह धबिना काढण्यात आला यावेळी आराधी गाण्याचा मेळा, भारुड्याने मंदीर परिसर भक्तीगणाने दुमदुमुन गेला होता. तसेच देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, पुजारी मंडळीकडून पोत खेळण्यात आला.

दोन महिला लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

तुळजापूर येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक आणि अंगणवाडी सेविका या पदावर काम करणाऱ्या दोन महिला कर्मचाऱ्यांना दहा हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या पथकाने रंगेहात पकडले असून त्यांच्यावरतुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदला आह

अधिक माहिती अशी की तुळजापूर येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयातील क.सहाय्यक मई बळीराम खांडेकर आणि अंगणवाडी सेविकास सोनाली संदीप कदम महिला कर्मचाऱ्यांनी तुळजापूर तालुक्यातील चिंचोली येथील तक्रारदाराच्या पत्नीस अंगणवाडी मदतनीस म्हणून नियुक्ती पत्रावर वरिष्ठांची सही घेऊन ऑर्डर देण्यासाठी १५ हजारांच्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती दहा हजार रुपये लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहात पकडले. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे

फ्रीस्टाइल फुटबॉल खेळामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित होण्यास मदत

पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये जगातील अव्वल फ्रीस्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईटची कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

फ्रीस्टाइल फुटबॉल खेळामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित करण्यात मदत होत्रे तसेच मानसिकतेचे महत्त्व शिकवते. याम ुळे पोदार एज्युकेशन नेटवर्कचा सर्वांगीण शिक्षणाला भक्कम असा पाठिंबा मिळून विद्यार्थ्यांना जीवन कौशल्ये विकसित करता येतील आणि भविष्यात भारताचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकेल, असा विश्वास अंतरराष्ट्रीय फ्रीस्टायलर फुटबॉलपटू जेमी नाईट यांनी धाराशिव येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे भेटदरम्यान दिला. त्यांनी आपली कौशल्ये दाखवत क्रीडा उपक्रम ाचा भाग म्हणून कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

यावेळी प्राचार्या रम्या टुटिका, उपप्राचार्य निलेश जाधव, प्रसाद पोंक्षे, स्कील डेव्हपलमेंटच्या प्रमुख ज्योती गाला, ॲकॅडमिक प्रमुख जीवन कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जेमी नाईट म्हणाले, पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल इतका उत्साह, प्रतिभा आणि आवड आहे हे पाहून खूप आनंद झाला. भारत फुटबॉल खेळात जागतिक खेळाडू बनू शकतो आणि कदाचित फुटबॉल विश्वचषकात लवकरच भाग घेईल अशी मी अशा बाळगतो. मला इथे यायला खूप आवडले आणि आशा आहे की मी लवकरच परत येईन .

पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक हर्ष पोदार यांनी विद्यार्थ्यांच्या उर्जा आणि उत्कटतेबद्दल आनंद व्यक्त केला. जेमी ने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाविषयी फोकस ठेवणे महत्वाचे आहे हे लक्षात आले. ग्रेड्सपेक्षा जास्त या आमच्या विश्वासावर ठाम राहून, आमच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेतून शिकलेल्या गोष्टींचे अनुकरण करावे अशी आमची इच्छा आहे मग ती शैक्षणिक असो किंवा गैर-शैक्षणिक असो. आम्हाला आशा आहे की आमच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सुरुवातीच्या काळात अशा रोमांचक संधी त्यांना अखेरीस सर्वात मोठ्या टप्प्यावर देशाचे प्रतिनिधित्व करण्यास मदत करतात.

पोदार इंटरनॅशनल स्कूलतर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रित करण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी प्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून त्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनवणे होते. यावेळी शाळेचे शिक्षक, कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयात
जाहीर प्रगटनाद्वारे समन्स (नियमकम ५. नियम १,५)
एच.एम.पी.क.५१/२०२४
शितल / नितीन **निशाणी क. ७**
प्रति, गैरअर्जदार,
नितीन सुर्यकांत हिरमेठ, रा. ८१३, नॉर्थ कसबा, बाळीवेस, सोलापूर, ता. जि. सोलापूर. मो.नं. ८४५९३००९१९/७७४१०९९४३२.

ज्याअर्थी अर्जदार शितल नितीन हिरमेठ, रा. ८१३, नॉर्थ कसबा, बाळीवेस, सोलापूर, ता. जि. सोलापूर, हा.मु. बोरी (मातोळा) ता. उमरगा, जि. धाराशिव, यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केल्या आहे त्याऊ हया वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ने सांगण्यासाठी दिनांक १२/१२/२०२४ रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाची उत्तर देवू शकेल अशा वकिठामार्फत किवा अशा सर्व प्रश्ने देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी यादर नमन्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे कि, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल कराने त्याग दिवशी तुमचा बनाव किला उलट वाद (सेंट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर कलेम) ज्या दस्त आभारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्त ऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम पृष्ठयर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर निसवून असाल तः अशा दस्ताऐवजाने एक सूची करून ती सूची तुमच्या यनावाच्या लेखी निवदनाय जोडाल

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावुन त्याच्या निर्णय केला जाईल आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, तर तमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुत्रों बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल कगण्यात तुम्ही कसुरल्या मानाला आयाम पात्र रेल

आज दि. १६/१०/२०२४ रोजी माइया सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- **स्वाक्षरित/-**
(एस.एच.जाधव) **(अ.ज.सय्यद)**
कनिष्ठ लिपीक **सहा. अधिक्षक**
सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, उमरगा

CHANGE IN NAME

I have changed my name from ANANT DATTATRAY MULE to ANAND DATTA MULE. Hence for this decleretion in future.
OLD NME :- ANANT DATTATRAY MULE
NEW NME :- ANAND DATTA MULE
dress: MAULI NAGAR, TULJAPUR-413601
Adhar No:- 881535806888
Mobile No:- 9766437737

कुरनूर प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी २९ कोटी, दहा गावांतील साडेतीन हजार हेक्टर क्षेत्राला होणार लाभ

कामाची निविदा जाहीर : आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -

तुळजापूर तालुक्यातील कुरनूर मध्यम प्रकल्पातील पाणी वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी आहे. दुरूस्तीअभावी अनेक ठिकाणी कालव्याला गळती लागली आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाण्याचे वितरण होत नाही. परिणामी साडेतीन हजार हेक्टर क्षेत्राला त्याचा फटका सहन करावा लागत आहे. वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी अस्तरीकरण आणि बांधकाम दुरूस्तीसाठी २९ कोटी रूपये मिळाले आहेत.

या कामाची निविदाही प्रसिध्द झाली असून १० गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कुरनूर मध्यम प्रकल्पाचा मुख्य कालवा आणि वितरिकेमार्फत प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील नळदुर्ग, अणदूर, चिवरी, गुजनूर, खुदावाडी, सराटी, शहापूर, वागदरी आणि बाभळगाव आदी दहा गावांना शेतीसाठी कालव्याद्वारे पाणी दिले जाते.

दहा गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्र या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र प्रकल्पाची सध्या अस्तित्वात असलेली ही वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी आहे. आजवर झालेला वापर, कालव्याची वेळेवर न झालेली दुरूस्ती, अशा अनेक कारणांमुळे पाण्याचा विसर्ग ५० टक्क्यांवर आला आहे. कालवा भरावातून, बांधकामातून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाण्याला गळती लागली आहे. त्यामुळे कालव्याच्या शेवटच्या भागात असलेल्या शेतकर्यापर्यंत उपलब्ध असलेले पाणी पोहोचण्यास म ोठी अडचण निर्माण झाली आहे. सिंचन अवर्तनाचा कालावधी वाढल्याने सिंचन क्षेत्रातही मोठी घट झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

अनेक ठिकाणी शेवटच्या टोकाला कालवा बुजविला गेल्याचे निदर्शनास आले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

मागील ५५ वर्षांत या कालव्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे परिसरातील गावांना आता तोटा सहन करावा लागत आहे. अनेक शेतकरी बांधवांनी उपोषण केले. अनेकांनी आत्मदहनाचे पत्र दिले. रब्बी आणि उन्हाळी हंगामात कालव्याच्या नादुरूस्तीमुळे अनेकांच्या पिकाला पाणी मिळू शकले नाही. त्यामुळे या प्रकल्पातून पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली घट दूर होवून सिंचन क्षेत्र वाढावे, याकरिता वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरण आणि त्यावरील बांधकाम दुरूस्तीसाठी महायुती सरकारकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी तब्बल २९ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे कालव्याच्या लाभ क्षेत्रातील वरील १० गावांमधील शेकडो शेतकरी बांधवांची मागणी महायुती सरकारमुळे पूर्ण झाली आहे.

अस्तरीकरण आणि बांधकामाच्या कामाची निविदा ७ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली आहे. मागील ५० वर्षांपासून दुरूस्तीअभावी रखडलेल्या कुरनूर मध्यम प्रकल्पाच्या कामाला लवकरच सुरूवात होईल आणि या क्षेत्रात पुन्हा एकदा शेतकर्यांना हक्काचे पाणी मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daniktarunbharat.com

वेरूळ येथील पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात चोरी; लाखोंचा ऐवज लंपास

तभा वृत्तसेवा दि १८

वेरूळ येथील पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात चोरीची घटना गुरुवार दिनांक १७ ऑक्टोंबर रोजी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास घडली असून या घटनेमध्ये पार्श्वनाथ भगवान यांच्या विविध भावमुद्रेतील सात पितळी मुर्त्या व दहा किलोचे चांदीचे छत हे चोरट्यांनी चोरून नेले असल्याची माहिती पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष दिनेश गंगवाल यांनी दिली. चोरीच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाडी खुलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्यासह फिंगरप्रिंट पथक व डॉग पथक तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन तपास सुरू केला आहे.

वर्षवासानिमित्त धम्म रॅली व कठीण चिवरदान संपन्न

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : वडगाव कोल्हाटी येथील आनंद बुद्ध विहारमध्ये तीन महिन्यापासून सुरू असलेल्या भगवान गौतम बुद्ध व त्यांचा धम्म या धम्मग्रंथाचा सांगता समारोह विविध कार्यक्रमाने संपन्न झाला. यावेळी भिक्खू संघ व श्रामनेर संघाच्या उपस्थितीमध्ये पंचशील झेंडा दाखवून धम्मरॅली सुरुवात करण्यात आली ही रॅली आनंद बुद्ध विहार येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार छत्रपती शिवाजी महाराज स्मारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सावित्रीबाई फुले नगर संपूर्ण परिसर साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक भोंडवे पाटील पब्लिक स्कूल दिशा कुजबन मार्गे आनंद बुद्ध विहार या ठिकाणी धम्म रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी संतोष लाठे, आनंद बुद्ध विहाराचे संस्थापक प्रकाश निकम , अशोक निकम , भगवान नरवडे , गौतम सरोदे, विकास सावतकर, शांतीलाल दिवेकर , कैलास दळवी, विनायक साळवे, भानुदास चोतमल , विनायक रनयेवले , भानुदास कीर्तीकर, बाबासाहेब परकारे , मुकुंद जोगदंडे , ईश्वर लोखंडे , रवी लोंढे, कचरू दळवी ,भगवंतराव निकम , भाऊसाहेब मांदळे, वाल्मीक त्रिभुवन , विनोद वाकोडे , काकासाहेब गायकवाड, शंकर शेळके , राजू वाघमारे, दिलीप साळवे, जीवन पुंडगे, विशाल खरात, अमन इंगळे, राहुल राऊत, अजय जाधव , सुमित परकारे, ऋतिक साळवे, किशोर परकारे ,अतुल नरवडे ,विशाल बनकर,राहुल लोंढे, सुरज जाधव,संकेत जोगदंडे, संगम निकम , मनोहर मगर, संविधान निकम, आदींची उपस्थिती होती. यावेळी प्रास्ताविक व आभार आनंद बुद्ध विहाराचे अध्यक्ष प्रकाश निकम यांनी मानले.

देगलूर-बिलोली विधानसभेसाठी शहरी व ग्रामीण मिळून ३५१ मतदान केंद्र

देगलूर,दि. १८ ऑक्टोबर - १७ देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून दि.३० ऑगस्ट २०२४ रोजी मतदार यादीचा तपशील जाहीर करण्यात आला याप्रमाणे देगलूर ग्रामीण १५२, शहरीभागात ४६ एकूण १९८, तर बिलोली ग्रामीण भागामधे १२८ आणि शहरी भागात २५ असे एकूण १५३ असून देगलूर -बिलोली मतदारसंघात ग्रामीण व शहरी मिळून एकूण ३५१ मतदान केंद्र असणार आहेत. देगलूर बिलोली मतदारसंघात पुरुष मतदाराची संख्या १५७९४ तर स्त्री मतदारांची संख्या १५०४३० व इतर १६ असे एकूण ३०८३९० मतदारांची संख्या आहे. जेष्ठ नागरिक ज्यांचे वय ८५ च्या वर आहे असे४०२७वय वर्ष वयोगटाचे ६६७६ मतदार आहेत. तर २८४२ पीडब्लूडी, यात पुरूष १६५८ स्त्री ११८० व ईतर तृतीयपंथी ४ मतदारांची सख्या आहे. देगलूर विधानसभा मतदारसंघात एस. एस. टी चे ७ पथक कार्यान्वित केले आहेत. आर टी ओ चे हणेगाव, सांगवीउमर,भुतन हिप्परगा, येसगी, नागणी भक्तापूर, येथे चेकपोस्ट,आणि एफ एस टी चे ४, व्ही. एस. टी चे ६ पथक आणि व्ही. व्ही. टी चे २ पथक गठीत करण्यात आल्याची माहिती दिली. या निवडणुकीसाठी ३४ झोनल अधिकारी नेमण्यात आले आहेत तर १२ परदानशील मतदान केंद्र नेमण्यात आले आहेत अशी माहिती देगलूर -बिलोली विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भरत सूर्यवंशी ,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली तहसीलदार गजानन शिंदे, देगलूर निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार एस एस मामिलवाड, बिलोली निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार दीपक मरळे,नायब तहसीलदार रघुनाथसिंह चौहाण, पोलीस निरीक्षक मारूती मुंडे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे.

युवक-युवतींनी मतदानाचा उत्सव साजरा करावा; तहसीलदार प्रविण पांडे

नांदेड,दि. १८ ऑक्टोबर - लोकशाहीमध्ये मतदान करणे हा आपला हक्क व कर्तव्य आहे. विशेषतः युवक-युवतीनी भरभरून मतदान करणे व इतर पात्र मतदारांना मतदानास प्रेरित करणे हे त्यांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत. एक एक मत राष्ट्र घडवण्यास आवश्यक असते. याच उद्देशाने युवक-युवतीनी येत्या विधानसभा व लोकसभेच्या पोट निवडणुकीत उत्साहाने मतदान करुन लोकशाहीचा हा उत्सव साजरा करावा, असे प्रतिपादन तहसीलदार प्रविण पांडे यांनी केले.आज नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातून मतदार युवकांसाठी ०८७ नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने मतदान जनजागृतीची सुरुवात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ आणि नायब तहसीलदार नितेशकुमार बोलेलू यांच्या प्रेरणेतून झाली. जवळपास तीनशे मतदार युवकांना मतदानाचे महत्त्व उपप्राचार्या प्रा.कल्पना कदम यांनी विशद केले. प्रा.अनंतराव कौसडीकर यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात राजेश कुलकर्णी यांनी मतदाराच्या प्रतिज्ञेतून केली. नवमतदार युवक युवतींनी आपल्या परिसरातील मतदारांच्या भेटी घेवून मतदान करण्याची गरज व आवश्यकता पटवून देऊन मतदान करावे, असे सांगावे या बाबींचा उल्लेख स्वीप सदस्य संजय भालके यांनी आपल्या आभार प्रदर्शनातून व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.जी.कुलकर्णी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.एम.वाय.कुलकर्णी, लोक प्रशासन विभाग प्रमुख प्रा. अनंतराव कौसडीकर, बालासाहेब कच्छवे, सारिका आचमे,एस. व्हि.भालके, सुनील मुत्तेपवार, शिवराज पवार, लोक प्रशासन अभ्यास मंडळाचे डॉ. शेख हनीफ, करीयर कट्टा चे समन्वयक डॉ संतोष शेंबाळे, लोक प्रशासन विभागातील डॉ. विजय तरोडे, डॉ. सुरेश गजभारे, प्रा. शशिकांत रामगिरवार, प्रा. शिवानंद साखरे, डॉ. निलंगेकर शरणकुमार यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थिनींना परीक्षेपासून रोखले!

तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.१८ ऑक्टोबर -शैक्षणिक शुल्क न भरल्याच्या कारणावरून चौथ्या वर्गातील ४ विद्यार्थिनीला परिक्षागृहातून बाहेर काढण्याचा धक्कादायक प्रकार तालुक्यातील रेल-कनकावती येथील फातिमा कॉन्व्हेंट प्रायमरी स्कुलमध्ये दि.१८ शुक्रवार रोजी सकाळी हा धक्कादायक प्रकार घडला आहे.

या प्रकरणी पालकांनी शिक्षण विभागाचे दरवाजे ठोठावणार आहेत. संबंधित विद्यार्थिनी इंग्रजी माध्यमात शिकत आहे. शुक्रवारपासून प्रथम सत्राची परीक्षा सुरू झाली. बहुतांश पालक गेल्या अकरा वर्षापासून शेतीचे उत्पन्न निघाल्यानंतर शुल्क भरतात. परंतु शेतीमाल निघाले नसल्याने ४ विद्यार्थिनीच्या पालकांनी शैक्षणिक शुल्क भरले नाही, या कारणावरून विद्यार्थिनीला शाळेने परीक्षा देण्यापासून परावृत्त करत त्या ४ विद्यार्थिंना परिक्षा खोलीबाहेर हुसकावल्याचा आरोप विद्यार्थिनीच्या पालकांनी केला आहे.

शाळेवर तात्काळ कारवाई करणार

संबंधित प्रकरणाची पालकांकडुन तक्रार प्राप्त होताच संबंधित शाळेवर तात्काळ आम्ही कारवाई करणार आहोत. विद्यार्थ्यांना कुठल्याही कारणास्तव परीक्षेपासून वंचित ठेवता येत नाही.

जयश्री चव्हाण, (शिक्षणाधिकारी प्राथमिक)

शाळेकडून शुल्क वसूलीची मनमानी

एकीकडे सरकार आणि शिक्षणविभाग सर्व शिक्षा अभियानाचा आणि मुलींना मोफत शिक्षणाचा ढोल बडवत असले तर विद्यार्थिनीला परीक्षागृहातून शैक्षणिक शुल्क न भरल्याच्या कारणावरून बाहेर काढून फातिमा शाळेने नेमके काय साधले, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. शाळेकडून मनमानी पध्दतीने शुल्क वसूल केले जात असल्याचा आरोप देखील अनेक पालकांनी केला आहे.

शाळेचे शुल्क न भरल्याने विद्यार्थ्यांना सूचना देण्यासाठी बाहेर थांबवले होते. राहिलेल्या त्या चार विद्यार्थींना उद्या पुन्हा परीक्षेसाठी परवानगी देणार आहोत.

प्रमिला मनभट, प्राचार्या फातिमा कॉन्व्हेंट प्रायमरी स्कुल रेल-कनकावती

११ वर्षांपासून माझ्या मुली या फातिमा कॉन्व्हेंट प्रायमरी स्कुलमध्ये शिक्षण घेत आहे. शैक्षणिक शुल्क भरण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी कल्पना देण्यात आली नाही. प्रत्येकवर्षी दिवाळी आगोदर माझ्या शेतीतून पिकवलेला माल विकून मुलींचे शैक्षणिक शुल्क भरत असतो. परंतु यावर्षी उशीर झाल्यामुळे मी दिवाळीच्या आगोदर शुल्क भरले नाही. परीक्षा सुरू असताना विद्यार्थिनीला परीक्षागृहाबाहेर काढणे योग्य नाही. त्यामुळे मुलीचे मानसिक धैर्य ढासळले असून तिने जर काही कमी-जास्त केले, तर त्याला शाळा जबाबदार असेल.

नवनाथ राठोड (पालक)

कोजागिरी पौर्णिमा निमित्त नाथ आश्रम, श्री क्षेत्र वेरूळ येथे भाविक भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : श्री क्षेत्र वेरूळ येथील प.पु. सद्गुरू श्री अक्काताई महाराज यांच्या नाथ आश्रमात यंदाची कोजागिरी पौर्णिमा अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. आश्रमाच्या प्रांगणात भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून, चांदण्यांच्या प्रकाशात आणि अध्यात्मिक वातावरणात पवित्र रात्र मंगलमय वातावरणात अनुभवली.

संपूर्ण कार्यक्रम प.पु. श्री अक्काताई महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सकाळपासून विविध धार्मिक अनुष्ठान, हवन, कीर्तन, भजन, प्रवचने यांचा समावेश करण्यात आला होता. कीर्तनकारांनी गोड आवाजात भक्तिरसाची वर्षाव केली, तर प्रवचनातून प.पु. श्री अक्काताई महाराजांनी भक्तांना जीवनातील शांती आणि समर्पणाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच, भक्तांच्या जीवनात आध्यात्मिक प्रगती आणि सकारात्मकता कशी आणता येईल याबद्दल त्यांनी विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपस्थितांच्या वेरूळ गावचे सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील, सोमेश्वर चौबे, अर्चना चौबे, गजानन पिंपळे, कीर्ती पिंपळे, प्रकाश वाकळे संतोष करपे माजी सभापती दिनेश अंभोरे शेखनाथ भाऊ नागे कल्पना कदम विठ्ठल गोम लाडू तसेच इतर प्रतिष्ठित भक्तांचा समावेश होता. भाविकांनी या कार्यक्रमात भाग घेऊन आपला विश्वास आणि समर्पण व्यक्त केले. विशेषतः, श्री क्षेत्र वेरूळच्या या उत्सवाने परिसरातील लोकांमध्ये अध्यात्मिक ऊर्जा निर्माण केली.

रात्रीच्या कार्यक्रमात चंद्राच्या मंद प्रकाशात कोजागिरीच्या महत्त्वावर आधारित प्रवचन झाले, ज्यात श्रीमहालक्ष्मीच्या कृपेने सुख-समृद्धी प्राप्त करण्याच्या सल्ल्यांचे वर्णन करण्यात आले. चंद्रप्रकाशात दूध आणि प्रसादाचे वितरण हे उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. प्रत्येक भक्ताने प्रसाद ग्रहण करुन आपल्या मनःशांतीसाठी प्रार्थना केली.

कार्यक्रमाच्या शेवटी प.पु. श्री अक्काताई महाराजांनी सर्व भक्तांना आशीर्वाद दिले आणि आश्रमात पुढील वर्षी पुन्हा कोजागिरी साजरी करण्याचे निमंत्रण दिले.

दापशेड अत्याचार घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा करा : प्रणिताताई देवरे

तभा वृत्तसेवा
लोहा,दि. १८ ऑक्टोबर

तालुक्यातील दापशेड येथील पाच वर्षीय मुलीवर तिच्या नात्यातीलच नराधम आरोपीने तिच्यावर अत्याचार केला.ही घटना नात्याला माणुसकीला काळीमा फासणारी आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपीला कठोरातील कठोर शासन करावे अशी मागणी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ . प्रणिताताई देवरे - चिखलीकर यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे . दरम्यान दापशेड येथील पीडितेच्या कुटुंबीयांची प्रणीताताई चिखलीकर यांनी भेट घेऊन त्यांना धीर दिला.लोहा तालुक्यातील दापशेड येथील एका पाच वर्षीय चिमुकलीवर त्यांच्याच नात्यातील नराधमाने अत्याचार केला.या घटनेनंतर नातेवाईकांनी सोनखेड पोलीस ठाणे घालून गाठून गुन्हा दाखल केला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अवघ्या पाच तासांत अटक केली.या घटनेची माहिती समजताच भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ. प्रणितताई देवरे - चिखलीकर यांनी दापशेड येथे जाऊन पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेतली त्यांना मानसिक धीर दिला.सोनखेड पोलीस ठाण्यात जाऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांच्याशी सविस्तर चर्चा करून आरोपीला कोठोरातील कठोर शासन झाले पाहिजे या अनुषंगाने कारवाई करावी हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालून आरोपीला फासावर लटकवावे अशी मागणी केली.त्यानंतर त्यांनी मोबाईल वरून जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी संवाद साधला व आरोपीला कडक शिक्षा व्हावी. दोषारोप पत्र (चार्ज सीट) कोर्टात लवकर दाखल करावी , यातील दोषींला फाशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली .शिवाय समाजात अशा घटना घडू नयेत यासाठी कुटुंबियानी व ग्रामस्थांनी जागरूक असावे.जेणेकरून अत्याचाराने लेकरं,मुली म्हणजे महिला बळी ठरणार नाहीत याची काळजी घेणे काळाची गरज आहे अशाही त्या म्हणाल्या.

महायुतीच्या शासनाकडून जनसमान्यांसाठी भरघोस कामे : विलास भुमरे

तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ :- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारच्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात जनसमान्यांसाठी भरघोस कामे झाली असून या कामांचा जोरावर पैठण विधानसभेवर महायुतीचा उमेदवार रेकॉर्ड ब्रेक मतांनी निवडून येणार असल्याचा विश्वास रेणुकादेवी शरद साखर कारखाण्याचे चेअरमन विलास बाप्पू भुमरे यांनी व्यक्त केला. महायुती तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत भुमरे बोलत होते.

महायुती शासनाच्या कार्यकाळात लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ योजना, शेतकरी सम्मान योजना,कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आधार योजना, तसेच रोजगार हमी फलोत्पादन मंत्री तसेच पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्या विशेष प्रयत्नातून पैठण तालुक्यात खेर्डा प्रकल्प, संत ज्ञानेश्वर उद्यान, पैठण छत्रपती संभाजीनगर रस्ता चौपदरीकरण,अंतर्गत येणारे सर्व रस्ते,१०० खाटांचा दवाखाना,जलजीवन मिशन,वाटर ग्रीड योजना,महापुरुषांचे पुतळे, सभामंडप, शदिखाना, मौलाना दर्गा विकास, डीएमआयसी मध्ये झालेली गुंतवणूक, मार्केट कमिटी तर्फे कादा खरेदी तसेच पाचोड येथील कोल्ड स्टोरेज, ईसारवाडी येथील सिट्रेस, प्रसकीय इमारत,पाणंद रस्ते, शेती रस्ते, गायगोठे, फळबाग अनुदान, सुशोभीकरण, सुरक्षा भिंती, नदीघाट योजना, ग्रामीण भागात आरोग्य केंद्र, पाचोड येथे उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा न्यायालय, रोजगार मेळावे, संत एकनाथ महाराज मंदिराचा विकास,पंढरपूर येथे भक्त निवास, व्यापारी भक्त संकुल अशी विविध कामे तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामामुळे पैठण विधानसभेवर महायुतीचाच भगवा फडकणार असल्याचे चेअरमन विलास बाप्पू भुमरे यावेळी म्हणाले याप्रसंगी भाजपच्या प्रदेश सदस्या रेखाताई कुलकर्णी, राज्य दूध महासंघाचे नंदलाल काळे,महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख पुष्पाताई गव्हाणे,तालुकाप्रमुख अण्णासाहेब लबडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जितू परदेशी,महिला आघाडीच्या ज्योती काकडे, कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे, नगरसेवक भूषण कावसणकर,तुषार पाटील, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, नामदेवराव खराद, अजित पगारे, ज्ञानेश्वर गोरे,राजेश माणधने,संदीप मडके, गजू ईच्छय्या, बाबा घटे,रितेश नागोरी सह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

समाज प्रबोधनकार विष्णु मापारी यांना राष्ट्रीय कर्मयोगी अवॉर्ड -२०२५ जाहीर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

येथील समाजसेवक तथा समाज प्रबोधनकार विष्णु विनायकराव मापारी सोयगावकर यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था (संघ) नाशिक यांचे वतीने राष्ट्रीय कर्मयोगी अवॉर्ड -२०२५ डॉ.महेंद्र देशपांडे राष्ट्रीय अध्यक्ष दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर संघ नाशिक यांनी जाहीर केला असुन पत्रकार दिन २०२५ सन्मान सोहळ्यात रविवार दि.५ जानेवारी २०२५ नाशिक येथे अनेक मान्यवरांचे उपस्थितीती रोटरी क्लब हॉल गंजमाळ नाशिक येथे अवॉर्ड प्रदान करण्यात येत आहे.विष्णु मापारी यांची परीस्थिती जेमतेम जरी असली तरी दरवर्षी ते २५ फेब्रुवारी रोजी आई महोत्सव आयोजित करुन मुला मुलींनी निर्व्यसनी राहुन आई वडील व जेष्ठ व्यक्तींचा सन्मान करावा.मुला मुली मध्ये भेद न करता दोघांनाही समान लेखा मोफत आरोग्य शिबीर,युवक मेळावा,पथनाट्यद्वारे आई वडिलांचे महत्व सांगतात.दिवाळी भाऊबीजेला ज्या भगिनींना भाऊ नाही अश्या भगिनी आर्थिकदृष्ट्या गरीब , दिव्यांग,आशा ताई,स्वच्छता करणाऱ्या महिला यांना माणुसकीची भाऊबीज म्हणुन साडी चोळी,फराळ व त्यांच्या मुला मुलींना शालेय साहित्याचे वाटप करतात. समाज सेवा हीच ईश्वर सेवा समजुन मापारी हे अंभई ते मुंबई आणी गल्ली ते दिल्ली पर्यंत लोककलेद्वारे समाज प्रबोधन करीत नाट्यपंढरीच्या नावलौकीकात भर टाकतात.त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल ग्रामीण भागातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

संत ज्ञानेश्वर उद्यानाच्या गेट जवळील बार चालकांना येणार चांगले दिवस

तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ :- मैसूर वृंदावन गार्डनच्या धर्तीवर विकसित झालेले पैठणचे जगविख्यात संत ज्ञानेश्वर उद्यान हे पुढील आठवड्यात पर्यटकांसाठी उघडण्यात येत असल्याची माहिती अभियंता तुषार विसपुते यांनी दिली. मात्र उद्यानाचे गेट क्रमांक १ उघडावे अशी मागणी असतांना जलसंपदा विभाग गेट क्रमांक २ उघडून तेथून पर्यटकांना प्रवेश देणार असल्याने परिसरातील राजकीय व्यक्तींच्या बार ला चांगले दिवस येणार आहे.

तीन वर्षांपासून बंद असलेले संत ज्ञानेश्वर महाराज उद्यान हे पुढील आठवड्यात उघडणार असून यासाठी संगीत कारंजे तसेच ईतर कामे जलदगतीने आटोपली जात आहे. उद्यान उभारणी पासून गेट क्रमांक १ वरून पर्यटकांना उद्यानात प्रवेश दिला जात होता.

परंतु राजकीय वजन वापरून परिसरातील व्यक्तीने गेट क्रमांक १ बंद करून प्रवेशासाठी गेट क्रमांक २ उघडल्याचे बोलले जात आहे. अश्यात आताही हेच गेट उघडणार असल्याने राजकीय व्यक्ती असलेल्या बार चालकांना चांगले दिवस येणार आहे.

रांजणगावात गांजा विक्री करणारे गजाआड

वाळूज महानगर (प्रतिनिधी) रांजणगाव शें. पू. हे अवैध धंद्याचे माहेरघर बनत असून , दिवसेंदिवस या परिसरात अवैध धंद्यांमध्ये वाढ होत आहे. पोलिसांनी भाड्याने खोली घेऊन गांजा विक्री करणाऱ्यांना २ किलो गांजासह गजाआड केले आहे.

एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज शिंदे यांना मिळालेल्या गोपणीय माहितीवरून रांजणगांव शे.पु. येथील दत्तनगर भागात एका रुमवर छापा मारला असता ३७,८९० /- रु.कि.चा ०२ किलो १०५ ग्रॅम वजनाचा उग्रट वासाचा हिरव्या रंगाचे ओलसर झाडपत्ता, फुले, शेंडे, (गांजा) वनस्पती प्लास्टीक पिशवनी मध्ये किलो १८०००/- रु.किं. अं. २)००.०० रु कि.चे गांजा भरण्याकरीता वापरण्यात येणारे ६३ नग प्लास्टिकचे छोटे पाउच, ३) ५०.०० रु.कि.चे स्टपलर असा एकुण ३७,९४० /- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आले. दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करून जप्त करण्यात आला. सदरचा गांजा कोठून आनला याबाबत विचारणा केली असता करण राजू धोजे याने व त्याचा ओळखची विक्रम रामदास गायकवाड वय ३४ वर्ष, रा. दत्तनगर गल्ली नं. ९, विक्की साळवे रा.वडार गल्ली दत्तनगर रांजनगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर मुळ पत्ता संजयनगर मुकुंदवाडी याच्याकडून खरेदी केला असल्याचे सांगीतले. पोलीस उपनिरिक्षक दिनेश बन यांच्या तक्रारी वरून करण राजू धोजे वय २३ वर्ष, हरिओमनगर (दत्तनगर) राममंदीराच्या पाठीमागे रांजनगांव शे.पु. एक अल्पवयीन मुलगा , विक्रम रामदास गायकवाड वय ३४ वर्ष, रा. दत्तनगर गल्ली नं. ९, रांजनगांव शे.पु. विक्की साळवे रा.वडार गल्ली दत्तनगर रांजनगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर मुळ पत्ता संजयनगर मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संजय गित्ते हे करत आहेत.

ही कामगिरी सपोनि मनोज शिंदे, सपोनि संजय गित्ते, पोउपनि प्रविण पाथरकर, दिनेश बन , पोह बाळासाहेब आंधळे, जालिंदर रंधे, पोअं राजाभाऊ कोल्हे, हनुमान ठोके, पोअं. गणेश सागरे, यशवंत गोबाडे, विशाल पाटील, समाधान पाटील, नितीन इनामे, विनोद नितनवरे, सुरेश कचे, चालक बबलू थोरात यांनी पार पाडली.

गंगापुर खुलताबाद मतदार संघात उमेदवारीवरुन प्रचंड रस्सीखेच, उमेदवारीवरुन वातावरण चांगलेच तापले

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१८ ऑक्टोबर:

गंगापूर खुलताबाद विधानसभेच्या आ. प्रशांत बंब यांच्या विरोधात तुल्यबळ उमेदवार देण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारीवरुण प्रचंड रस्सीखेच बघायला मिळत आहे. विधानसभेच्या उमेदवारीसाठी महाविकास आघाडीतून इच्छुक उमेदवार आणि दुसऱ्या पक्षातून येणाऱ्या उमेदवाराचा देखील यावेळी विचार करण्यात येत आहे त्यामुळे जर ऐनवेळी उमेदवारी बाहेरील पक्षातून येणाऱ्यांना मिळाल्यास पक्षाचे एकनिष्ठ असलेले इच्छुक उमेदवारांच्या हाती पक्षाच्या झेंडा आणि वाटाण्याच्या अक्षता मिळणार अशी स्थिती निर्माण होऊ शकते जर असे झाल्यास गंगापूर खुलताबाद मतदार संघात अनेक पक्षात गटबाजी नाराजी नाट्य दिसून येणार आहे याउलट गंगापूर खुलताबाद विधानसभेसाठी महायुतीचे मतदार संघात विद्यमान आमदार प्रशांत बंब चौथ्या टर्मसाठी मोर्चे बांधणी करून प्रचार यंत्रणा सज्ज केली आहे आमदार प्रशांत बंब प्रथम अपक्ष म्हणून निवडून आले होते त्यानंतर त्यांनी भाजपकडून दोन टर्म निवडणूक लढवून प्रचंड मताधिक्य मिळवून निवडून आलेले आहेत त्यामुळे त्यांची उमेदवारी निश्चित मानले जात आहे. त्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली आहे. तसेच महायुतीचे लोकसभेचे खासदार संदिपान भुमरे यांना गंगापूर खुलताबाद तालुक्यातून निवडून येण्यासाठी बंब यांनी प्रचंड मदत केल्याने दोन्ही तालुक्यातून चांगले मतदान भुमरे यांना मिळाले असे खासदार संदिपान भुमरे यांनी जाहीरपणे म्हटले आहे आता विधानसभेसाठी बंब यांना निवडून आणण्यासाठी घुमरे देखील सर्व शक्ती पणाला लावणार आहेतच तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार कैलास पाटील हे देखील गंगापूर येथीलच असल्याने आमदार प्रशांत बंब यांच्यासाठी प्रयत्न करणारच असा विश्वास देखील महायुतीकडून व्यक्त करण्यात येत आहे.

गंगापूर खुलताबाद मतदार संघात तीन टर्म प्रचंड मताधिक्याने निवडून आलेलो आहे. निवडणूक म्हटल्यावर समोर कोण उमेदवार उभा आहे त्याचा विचार मी करत नाही विकास आणि कार्यकर्ते ही माझ्यासाठी भक्कम बाजू आहे. मी ठामपणे निवडणूकीसाठी सज्ज आहे.

- आ. प्रशांत बंब.

महाविकास आघाडी कडून स्थानिकांना उमेदवारी मिळावी यासाठी जोरदार प्रयत्न करावे लागत आहे याकरिता पक्षश्रेष्ठींना साकडे घालण्यात चालू आहे हा विषय एवढा पुरता थांबत नसून मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांनी देखील गंगापूर मधून निवडणूक लढणारच असा ठाम निर्णय घेतल्याने उमेदवारी मिळावी यासाठी त्यांनी देखील मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू केलेले आहेत ऐनवेळी उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष निवडणूक लढण्यावर ठाम आहेत.

महाविकास आघाडीतून उमेदवारी मिळाल्यास त्यांना महाविकास आघाडीच्या निष्ठावान कार्यकर्ते तसेच पदाधिकारी मदत करणार की तटस्थ राहणार हा महत्त्वाचा विषय असून या अगोदरच महाविकास आघाडीने संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आयात उमेदवाराला उमेदवारी दिल्यास वेगळा विचार करणार असल्याचे ठामपणे जाहीर भूमिका मांडली होती त्यामुळे महाविकास आघाडी कडून अगोदरच शिवसेना उबाठा गटाचे सौ देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर, कृष्णा पाटील डोणगावकर, काँग्रेसकडून किरण पाटील डोणगावकर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून विलास चव्हाण डॉक्टर ज्ञानेश्वर निळ एडवोकेट महिंद्र राऊत यांनी देखील पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारीसाठी मागणी केलेली आहे त्यामुळे पक्षश्रेष्ठींना निर्णय घेणे अधिकच अवघड झाले आहे.